CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, १० जानेवारी २०२५ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ६५ । पाने १२ । किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### परकीय गुंतवणूकदारांमुळे बाजारात घसरण

**मुंबई** : परकीय गुंतवणूकदारांनी हात आखडता घेतल्याने देशांतर्गत बाजारांमध्ये आज मोठी घसरण झाली.



निफ्टी १६२ अंकांनी घसरून २३,५२६ वर बंद झाला, तर निर्देशांक ५२८ अंकांनी खाली येत ७७,६२० वर स्थिरावला. एफएमसीजी वगळता सर्व शेअर्स मंदीच्या सावटाखाली होते. निर्देशांकातील टाटा स्टीलचे शेअर्स २.०७ टक्क्यांनी खाली आले तर झोमॅटो, लार्सन ॲण्ड टूब्रो, टाटा मोटर्स आणि अदानी पोर्ट्सचे शेअर्सही घसरले होते. या घसरणीमुळे बाजारातील भांडवल ३.८५ लाख कोटींनी कमी झाले.



अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या वर्षपूर्तीच्या कार्यक्रमाची एकीकडे धामधूम असतानाच मंदिरातील उर्वरित बांधकाम वेगाने पुढे जात आहे. मंदिर परिसरातील परकोटा, सप्त मंदिर, कुबेर टिला आदींची उभारणी केली जात असून, वर्षअखेरपर्यंत यापैकी बहुतांश काम पूर्णत्वास जाणार आहे

# आरक्षणातून कुणाला वगळायचे, हे कायदेमंडळ ठरवणार

### सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केली भूमिका

**नवी दिल्ली, ९ जानेवारी**

सात दशकांपासून आरक्षणाचा लाभ घेणारे समाजात असे अनेक वर्ग आहेत, ज्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागास वर्गात मोडत असलेले आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांची मुले सुद्धा आरक्षणाचा लाभ घेत असून, त्यांना आरक्षणातून वगळण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली. आरक्षणातून कुणाला वगळायचे आणि ते कुणाला द्यायचे, हे आमच्या कार्यक्षेत्रात नसून, हे ठरविण्याचा अधिकार कायदेमंडळला असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

मागीलवर्षी ऑगस्टमध्ये सात न्यायाधीशांच्या घटनापीठाच्या निकालाचा संदर्भ देत न्या. भूषण गवई आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या न्यायासनाने असे स्पष्ट केले की, गेल्या ७५ वर्षांपासून ज्या व्यक्ती किंवा समुहाने आरक्षणाचा लाभ घेतला आहे आणि इतरांशी स्पर्धा करण्याच्या स्थितीत आहे, त्यांना आरक्षणातून वगळावे, असा निर्णय दिला आहे. यासंदर्भात विधिमंडळ आणि कार्यपालिकेला निर्णय घ्यायचा आहे. राज्यांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचीत जमातींसाठी नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र सक्तीचे करण्याचे धोरण निश्चित करायचे आहे. उपवर्गीकरणासंदर्भात आम्ही यापूर्वीच भूमिका स्पष्ट केल्याचे न्यायासनाने म्हटले.

यावर याचिकाकर्ते संतोष मालवीय यांचे वकील म्हणाले, सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने राज्यांना उपवर्गीकरणाबाबत धोरण ठरविण्याचे आदेश सहा महिन्यापूर्वी देऊनही त्याची अंलबजावणी केली जात नाही. यावर न्यायासनाने हस्तक्षेप करावा आणि राज्यांना पुन्हा आदेश द्यावा. मात्र, न्यायासनाने नकार देत यासंदर्भात कायदा करण्याची जबाबदारी कायदेमंडळाची असून, हस्तक्षेप करण्यास नकार दिला. (वृत्तसंस्था)

### स्विगी आता १५ मिनिटांत करणार फूड डिलिव्हरी

**नवी दिल्ली** : भारतात फूड डिलिव्हरी आणि ई-कॉमर्स क्षेत्रात वेगाने बदल होत आहे. सध्या क्विक कॉमर्सचा ट्रेंड वाढत आहे. अशातच स्विगीने आपले नवीन ॲप स्नॅक लाँच केले आहे. या ॲपद्वारे १५ मिनिटात फूड डिलिव्हरीचा दावा कंपनीकडून केला जातो. हे ॲप स्मार्टफोनद्वारे डाऊनलोड करता येते. याचा उद्देश ग्राहकांना झटपट डिलिव्हरी सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. स्विगीचे हे पाऊल वेगाने वाढणाऱ्या क्विक कॉमर्स ट्रेंडचा एक भाग आहे.

### महसूल सचिव अरुणीश चावला यांची बदली

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारचा वार्षिक अर्थसंकल्प जाहीर करण्याच्या काही आठवड्यांपूर्वी अर्थ मंत्रालयातील विभागात फेरबदल झाले आहेत. काही दिवसांपूर्वी महसूल सचिवपदावर नियुक्त करण्यात आलेले अरुणीश चावला यांची गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभागात बदली करण्यात आली. त्यांच्या जागेवर दीपमचे सचिव तुहिन कांता पांडे यांची नियुक्ती करण्यात आली. कार्मिक मंत्रालयाने बुधवारी रात्री बदलीचा आदेश काढला. पांडे यांनी अर्थ सचिवपदावर काम केले आहे. ते मागील पाच वर्षांपासून दीपमच्या सचिवपदी कार्यरत होते.

# १२ आमदारांच्या नियुक्तीबाबत हायकोर्टाचा महायुतीला दिलासा

### ठाकरे गट, मविआला धक्का

**मुंबई, ९ जानेवारी**

राज्यपाल नामनिर्देशित विधान परिषदेच्या १२ आमदारांच्या नियुक्तीबाबत मुंबई उच्च न्यायालयाने महायुतीला गुरुवारी दिलासा दिला. कॅबिनेटमध्ये यादी मागे घेण्याचा निर्णय कायदेशीर असल्याचे न्यायालयाने नमूद करीत, सरकारच्या निर्णयाला आव्हान देणारी ठाकरे गटाची याचिका फेटाळली.

#### सुप्रीम कोर्टात जाणार

या निकालानंतर याचिकाकर्ते सुनील मोदी म्हणाले, मी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाणार आहे. उच्च न्यायालयाने कोणत्या आधारावर याचिका फेटाळली, हे तपासणार आहे.



ठाकरे गटाचे कोल्हापूर शहराध्यक्ष सुनील मोदी यांनी ही याचिका दाखल केली होती. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि महाविकास आघाडी सरकारमध्ये विधान परिषदेच्या १२ आमदारांच्या नियुक्तीवरून वाद होता. महाविकास आघाडी सरकारने ६ नोव्हेंबर २०२० रोजी भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे १२ आमदारांच्या नावाची यादी पाठवली होती. ती महायुती सरकारने ५ सप्टेंबर २०२२ रोजी मागे घेतली. यादी मागे घेण्याचा निर्णय कॅबिनेटच्या बैठकीत घेण्यात आल्याचा दावा महायुती सरकारने त्यावेळी हायकोर्टात केला होता.

यावर आज सुनावणी करताना, मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय आणि न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने कॅबिनेटचा निर्णय योग्य असल्याचा निर्वाळा दिला. हा निकाल म्हणजे, ठाकरे गटासह महाविकास आघाडीलाही धक्का मानला जात आहे. (वृत्तसंस्था)

# भारतीय खो-खो संघात सोलापूरचा रामजी कश्यप व धाराशिवची शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.९ जानेवारी,**



रामजी कश्यप



आश्विनी शिंदे

नवी दिल्ली येथे १३ जानेवारीपासून सुरू होणाऱ्या पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेसाठी वेळापूरच्या रामजी हरिश्चंद्र कश्यपची पुरुष संघात व धाराशिवच्या आश्विनी आप्पासाहेब शिंदे हिची महिला संघात निवड झाली. आश्विनी ही खंडोबाची वाडी (ता. मोहोळ) येथील आहे. शिक्षणसाठी ती धाराशिव येथे असल्यामुळे धाराशिवकडून प्रतिनिधित्व करते. आश्विनी ही किशोरी गटातील राष्ट्रीय खो-खो स्पर्धेतील जानकी पुरस्कार विजेती खेळाडू आहे.

**११ राष्ट्रीय स्पर्धा खेळलेला रामजी**

रामजीने आतापर्यंत ११ राष्ट्रीय स्पर्धेत १० सुवर्ण तर १ रौप्य पदक मिळविले आहेत. त्याला सलग दोन वर्षे अल्टीमेट खो खो लीगमधील दुर्नामेंट ऑफ द बेस्ट प्लेअरचा पुरस्कार मिळविला. सध्या तो सेंट्रल रेल्वेमध्ये तिकीट निरीक्षक या पदावर काम करत आहे. त्याने सेंट्रल रेल्वेला अखिल भारतीय आंतर रेल्वे स्पर्धेत ३० वर्षांनंतर प्रथमच विजेतेपद मिळवून दिले. यामध्ये त्याला बेस्ट प्लेअरचा पुरस्कार मिळाला. त्याला पुरुष खो खो स्पर्धेत धाराशिव येथे उत्कृष्ट संरक्षकाचा पुरस्कार मिळाला. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण इंग्लिश स्कूल वेळापूर मध्ये झाले. त्याला राष्ट्रीय प्रशिक्षक सोमनाथ बनसोडे, नारायण जाधव, शिवाजी जाधव, सतिश कदम, जावेद आतार व श्रीनाथ खटके यांचे मार्गदर्शन लाभले.

(सविस्तर वृत्त क्रीडा पान ६)

### कुलगाममध्ये तीन अतिरेक्यांना अटक

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दलाने राबलेल्या मोहिमेत लष्कर-ए-तोयबाच्या तीन अतिरेक्यांना अटक करण्यात यश आले. त्यांच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. लष्कराच्या चिनार कॉर्प्सने दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक पोलिस आणि सुरक्षा दलाने कुलगाम जिल्ह्यातील ठोकरपुरा, कैमोह भागात संयुक्त शोधमोहीम राबवली. यावेळी तीन अतिरेक्यांना पकडण्यात आले. उबैद खुर्शीद, मकसूद अहमद आणि अमर बशीर अशी अटक करण्यात आलेल्या अतिरेक्यांची नावे आहे. त्यांच्याकडून दोन एके ४७ रायफल, ४ एके मॅगझीन, हातगोळे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला.

# तीन नक्षल्यांचा चकमकीत खात्मा

### सुकमा जिल्ह्यात सुरक्षा जवानांचे मोठे यश

**सुकमा, ९ जानेवारी**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलाच्या जवानांनी गुरुवारी तीन नक्षलवाद्यांना चकमकीत ठार मारले. अलिकडेच नक्षल्यांनी घात लावून केलेल्या आयईडी स्फोटात आठ जवान हुतात्मा झाले होते. त्यानंतर जवानांना मिळालेले हे मोठे यश आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी याबाबतची माहिती दिली. तिन्ही नक्षलवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेण्यात आले असून, घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत.

आठ जवानांच्या हौतात्म्याचा बदला घेण्यासाठी जवानांनी जंगलात व्यापक मोहीम हाती घेतली आहे. जवानांच्या मनात नक्षलवाद्यांविरोधात प्रचंड संताप आहे, असे विजय शर्मा यांनी सांगितले. सुकमा आणि बिजापूरच्या मधोमध असलेल्या जंगलात काही नक्षलवादी आले असल्याची माहिती मिळाल्यानंतर जवानांनी जंगलाची नाकेबंदी केली. जवानांना पाहताच नक्षल्यांनी गोळीबार केला. यावेळी झडलेल्या चकमकीत तीन नक्षल्यांना ठार मारण्यात आले.



यासोबतच, नवीन वर्षांत ठार झालेल्या नक्षल्यांची संख्या आता ९ झाली आहे. दोन आयईडी निष्क्रिय अन्य एका घटनेत बिजापूर जिल्ह्यात जवानांनी दोन शक्तिशाली आयईडी जप्त करून ते तत्काळ निष्क्रिय केले. आवापल्ली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मुरांडा डर्ट ट्रॅकवर हे आयईडी ठेवण्यात आले होते, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

# वाल्मिक कराडवर ईडीची कारवाई का नाही? : सुप्रिया सुळे

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ९ जानेवारी**

संतोष देशमुख हत्याप्रकरणाचा मास्टरमाईंड आरोपी वाल्मिक कराडला मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीने यापूर्वीच नोटीस दिली होती. मात्र, कुठलीही कारवाई न झाल्याने वाल्मिक कराड बिनधास्त असून वेळेवर ईडीने कारवाई केली असती तर सरपंच हत्याप्रकरण घडलंच नसते, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा खा. सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना केली.



त्या म्हणाल्या की, गेल्या एक महिना बीड आणि परभणी घटनेबाबत आमचे लोक बोलत आहेत. आरोपींना फाशीची शिक्षा व्हायला हवी, अशी मागणी पहिल्यादा संसदेत बजरंग सोनवणे यांनी केली. संदीप क्षीरसागर , जितेंद्र आव्हाड यांनी अधिवेशनात हा विषय मांडला. मागील ३० दिवस ते बोलत आहेत. माणुसकीच्या नात्याने आपण सर्वजण एकच म्हणत आहोत की, पीडित देशमुख कुटुंबाला न्याय मिळायला हवा. मी अनेक वर्षे संसदेत काम करत आहे. पीएमएले कायदा आला, यामधे खंडणी प्रकरणी कायद्यात तरतुदी आहेत. मला सरकारला प्रश्न विचारायचा आहे की, इडी हे केंद्रासाठी काम करत. वाल्मिक कराड यांच्या नावाने एक कागद आहे, पीएम एलए कायद्याअंतर्गत एक नोटीस यांना आली आहे, असे म्हणत सुळेंनी ती नोटीसच पत्रकार परिषदेत दाखवली. मात्र, अद्यापही त्या अंतर्गत कारवाई होत नसल्याचं त्यांनी सांगितलं.

पुढे बोलताना सुळे म्हणाल्या की , वाल्मिक कराडची अटक खंडणी प्रकरणी झाली असून गुन्हा दाखल आहे. मग पीएमएलए कायदा का लागू केला नाही? ११ डिसेंबर एफआयआर आहे, त्यात वाल्मिक कराडच नाव आहे. आवादा कंपनीने हा गुन्हा दाखल केला आहे. त्यासंदर्बात ईडीकडून नोटीस आहे. मग, खंडणीची नोटीस असताना त्यांच्यावर कारवाई का नाही? एकीकडे तुम्ही नुसत्या आरोपांवर गुन्हा दाखल करता आणि इथ केस आहे, तिसरी एफआयआर दाखल केली आहे. मग वाल्मिक कराडवर ईडीची कारवाई का झाली नाही? जर आधीच वाल्मिक कराडवर कारवाई झाली असती, तर संतोष भाऊ यांची हत्याच झाली नसती असे सांगून त्या म्हणाल्या, लाडली बहीण योजना परळी तालुका अध्यक्ष वाल्मिक कराड आहे. ज्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल आहे,






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर : दाजीपेठेतील श्री वेंकटेश्वर मंदिरात वैकुंठ एकादशी पुत्रदा एकादशीनिमित्त मंदिरात फुलांची व फळांची सजावट करण्यात आली. (छायाचित्र- नागेश दंतकाळे)

# आहेरकर यांना विश्वस्त पदावरुन काढल्याचा बदल अहवाल फेटाळला

## शेठ सखाराम नेमचंद जैन औषधालय व रुग्णालय ट्रस्ट

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी -**

येथील शेठ सखाराम नेमचंद जैन औषधालय व रुग्णालय ट्रस्टचे मानद सचिव आणि विश्वस्त दीपक शंकरराव आहेरकर यांना विश्वस्त पदावरुन काढून टाकण्याची कृती ही बेकायदेशीर असल्याचा निर्वाळा देवून त्या अनुषंगाने दाखल केलेला बदल अहवाल हा धर्मादाय उपायुक्त प्रविण कुंभोजकर यांनी फेटाळून लावला आहे.

या ट्रस्टच्या शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद महाविद्यालयातील एका विद्यार्थीनीचे मेरीट डावलून तत्कालीन प्राचार्यांनी कॉलेजमधील एका कर्मचाऱ्याच्या मुलाला पदव्युत्तर वर्गात प्रवेश दिला. त्याची तक्रार त्या विद्यार्थिनीने व्यवस्थापनाकडे केली. त्यावेळी व्यवस्थापनात आहेरकर हे मानद सचिव-विश्वस्त होते. त्यांनी या तक्रारीची गंभीर दखल घेवून संस्थेचे अध्यक्ष अरविंद दोशी व इतरांना प्राचार्यांविरुध्द कारवाई करण्याविषयी आग्रह धरला होता.

दरम्यान, आहेरकर यांच्याविरुध्द खोटे आरोप करुन त्यांनाच ठराव करुन मानद सचिव आणि विश्वस्त पदावरुन काढून टाकून त्याचा बदल अहवाल धर्मादाय उपायुक्त यांच्याकडे दाखल केला. आहेरकर यांच्या जागी मानद सचिव म्हणून डॉ. प्रदिप कोठाडिया यांना आणि विश्वस्त म्हणून डॉ. आदर्श मेहता यांना घेवून त्याचे बदल अहवाल देखील दाखल केले. यावर सुनावणी होऊन सदरचा बदल अहवाल म्हणजे आहेरकर यांना काढून टाकण्याची कृती ही पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा निर्वाळा देतानाच कोर्टाने आहेरकरांच्या विरुध्द भ्रष्टाचाराचा किंवा अपहाराचा कोणताही गुन्हा शाबीत होत नसल्याचे मत देवून दोशी यांचे तीनही बदल अहवाल फेटाळून लावल्यामुळे पुन्हा आहेरकर हे संस्थेच्या मानद सचिव आणि विश्वस्तपदी कायद्याने पुर्नस्थापित झाल्याचे स्पष्ट झाले.

यात आहेरकर यांच्यातर्फे अॅड. नितीन हबीब, अॅड. रमेश रोडगी, अॅड. रोहित हबीब आणि अॅड. अमरनाथ हबीब तर दोशी यांच्यातर्फे अॅड. ए. डी. वसगडेकर, अॅड. प्रविण शेंडे आणि अॅड. प्रशांत म्हेत्रस यांनी काम पाहिले.

# घरातून हाकलून दिलेल्या माता-पित्यांसह बालकांना मिळाला आधार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

आजीने आई-वडिलासहीत घरातून हाकलून लावलेल्या बालकांना विधी सेवा प्राधिकरणामार्फत आश्रय मिळाला.

सोलापूर येथे राहणा-या सुहासिनी (बदलेले नांव) हिला कौटुंबिक वादातून तिच्या सासुने पती व मुलासहीत घरातून बाहेर काढले. सदरची महिला ही आशावर्कर म्हणून काम करते पती मिटर रिडींगचे काम करतो. सदर महिला, तिचे पती व मुलांना घेवून पोलीस स्टेशन, पोलीस आयुक्त यांच्याकडे तक्रार दाखल केली.

दोन ते तीन दिवस इतर नातेवाईकांकडे कसेबसे निवारा घेतला. त्यानंतर नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या कार्यालयाशी संपर्क साधला. त्यावेळी कार्यालयातील रिटेनर विधीज्ञ श्रीमती माधुरी मोरडे, श्रीमती कदम, श्रीमती किणगी, श्रीमती मानसी कुईकर यांनी त्यांना कायदेशीर सल्ला दिला. एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे अंमलदार हे महिलेचे सासुच्या घरी गेले असता, सासुने दार उघडले नाही आणि प्रतिसाद ही दिलेला नाही.

सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे गरजू मुलांना कायदेशीर व इतर सेवा पुरविण्याकरिता बालकांसाठी कायदेशीर सेवा युनिट २०२४ समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या माध्यमातून समितीचे अध्यक्ष सलमान आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील युनिटच्या माध्यमातून विधी स्वयंसेवक श्रीमती हुसेनबी खरादी व श्रीमती विमला गुळेद यांनी महिलेच्या सासुशी सौदाहर्यपणे संवाद करुन तिची समजूत काढून सासु व सुनेतील वाद सामंजस्याने संपुष्टात आणला. अशाप्रकारे महिला तिचे पती व दोन लहान मुले यांना पुनश्चः आपल्या घरात आश्रय मिळवून दिला.

## संक्षिप्त वृत्त

# लोकशाही दिनातील तक्रारींची झिरो पेंडन्सी

- आरडीसी कुंभार यांची माहिती
- लोकशाही दिनात जिल्ह्यातून २९ तक्रारी दाखल
- झेडपीतून सर्वाधिक ८ तक्रारी

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

जिल्हा अधिकारी सोलापूर यांच्या वतीने नुकत्याच झालेल्या लोकशाही दिनात २९ तक्रारी नव्याने प्राप्त झाल्या असून, यापूर्वीच्या सर्व तक्रारींचा निपटारा केला असून, सध्या लोकशाही दिनातील पूर्वीची झिरो पेंडन्सी असल्याची माहिती आरडीसी मनिषा कुंभार यांनी आज (दि. ०८) दिली. नव्याने आलेल्या तक्रारींमध्ये सर्वात जास्त ८ तक्रारी सोलापूर जिल्हा परिषदेच्या विविध विभागातून आल्याचेही कुंभार यांनी सांगितले.



लोकशाही दिनामध्ये आलेल्या तक्रारींमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी जिपसो-८, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण-३, तहसिलदार माळशिरस-१, जिल्हा उपनिबंधक कार्यालय सोलापूर-१, उपविभागीय अधिकारी पंढरपूर-१, उपविभागीय अधिकारी माळशिरस-१, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सोलापूर-१, प्रबंधक जिल्हा अग्रणी बँक सोलापूर-३ आयुक्त सोमपा, सोलापूर-१, प्रादेशिक सह संचालक (साखर) सोलापूर वि सोलापूर-१, रोहयो शाखा सोलापूर-१, जिल्हा व सत्र न्यायालय मधील केस रद्दबाबत व नक्कल मिळत नसलेबाबत-४, महिला बालविकास अधिकारी सोलापूर-३, उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रं.-१, तहसिलदार मोहोळ-१ अशा एकूण २९ तक्रारी अर्ज प्राप्त झाल्या आहेत. या प्राप्त तक्रारींचा निपटारा लवकरात लवकर करण्याचा आमचा प्रयत्न राहणार असल्याचेही आरडीसी कुंभार यांनी सांगितले.

# पेन्शन पुनस्थापना वाढीव ग्रॅज्युइटी निधीची रक्कम परत मिळणार

**केंद्रीय सचिव प्राचार्य डॉ. जे. एम. मंत्री, विभागीय सचिव डॉ. रवींद्र बीडकर यांची माहिती**

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

असोसिएशन ऑफ पेन्शन कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपर अँन्यूएटेड टीचर्स संघटनेच्या सभासदांनी पेन्शन पुनस्थापना व वाढीव ग्रॅच्युइटी याचिकाकर्त्यांना लढा निधी तील काही रक्कम परत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे त्यासाठी सभासदांनी आपली माहिती त्वरित द्यावी असे आवाहन केंद्रीय सचिव प्राचार्य डॉ जे एम मंत्री व विभागीय सचिव डॉ. रवींद्र बीडकर यांनी केले आहे. सोलापूर येथील शिवदारे महाविद्यालयात रविवार दिनांक २२ डिसेंबर रोजी झालेल्या राज्यस्तरीय कार्यकारणीच्या बैठकीत सभासदांना लढा निधी पेन्शन पुनर्स्थापना ३५०० रुपये वाढीव ग्रॅज्युइटी २००० रुपये परत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यास केंद्रीय अध्यक्ष माजी शिक्षण सहसचिव डॉ. एम. ए. वाहुळ, सचिव प्राचार्य डॉ.जे. एम. मंत्री यांनी संमती दिली होती. त्यानुसार तातडीने माहिती मागविण्याचे कामकाज सुरू झाले. काही विभागातील माहिती उपलब्ध झाली आहे. सोलापूर विभागातून सुद्धा त्वरित माहिती आल्यास सभासदांच्या बँक खात्यावर संघर्ष लढ्यातील रक्कम त्वरित जमा केली जाईल, असे डॉ. मंत्री यांनी म्हटले आहे. सोलापूर-अक्कलकोट-पंढरपूर विभागासाठी प्राचार्य एम. ए. शेख व प्रा. उत्तमराव चौगुले तर बार्शी कुर्डूवाडी व माढा साठी डॉ. एल. एम. तायडे, प्रा. एम. आय. साळुंखे यांच्यावर जबाबदारी सोपी देण्यात आली आहे असे आपल्या पत्रकात विभागीय सचिव डॉ. रवींद्र बीडकर यांनी म्हटले आहे. डॉ. बीडकर यांनी सभासदांना गुरुवार दिनांक १५ जानेवारी पर्यंत सभासदाचे नाव बँकेचे नाव सभासदांचे खाते नंबर आयएफएस कोड महाविद्यालयाचे नाव सहभागी असलेले प्रकरण पेन्शन पुनस्थापना वाढीव ग्रॅज्युइटीपैकी एक अथवा दोन्ही याचा उल्लेख करावा दोन्ही असेल तर दोन्ही म्हणावे व टाकावी. सभासदांनी लवकरात लवकर माहिती कळवू सहकार्य करावे असे आवाहन असे आवाहन प्राचार्य एमए शेख यांनी केले आहे.

# जिल्ह्यात अंमली पदार्थाची तस्करी होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष राहावे

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

जिल्ह्यात अंमली पदार्थाचे उत्पादन व विक्री होणार नाही या दृष्टीने अन्न व औषध प्रशासन विभागाने अत्यंत तत्पर राहावे. रासायनिक व साखर कारखाने, सर्व मेडिकल स्टोअर्स यांच्यावर ही नियंत्रण ठेवावे. तसेच वेळोवेळी तपासणी मोहीम राबवावी. जिल्ह्यात कोणत्याही प्रकारे अंमली पदार्थाची तस्करी होणार नाही या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी आपापल्या स्तरावरून योग्य दक्षता घ्यावी, असे आवाहन अतिरिक्त पोलिस अधीक्षक प्रीतम यावलकर यांनी केले. सोलापूर जिल्ह्यात अंमली पदार्थाचे सेवन व वापर तसेच अंमली पदार्थाच्या वापरावर आळा घालण्यासाठी जिल्हास्तरीय नार्को को-ऑर्डीनेशन समितीची बैठक अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधिक्षक कार्यालय येथे घेण्यात आली. यावेळी पोलीस उपआयुक्त राजन माने, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) डॉ. नलिनी टेंभेकर, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क एम.आर पाटील, मिलींद कारंजकर जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या मानसोपचार विभाग (सिव्हिल हॉस्पिटल), डॉ. वडजे सोलापूर विद्यापिठ, अधिक्षक सिमा शुल्क विभाग महेंद्र प्रताप, उपसंचालक औद्योगिक सुरक्षा ओंकार चौरे, जि.प. समाज कल्याण अधिकारी एच. गायकवाड, अधिष्ठाता श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालय डॉ. अमित मोरे, अन्न औषध प्रशासन प्रतिनिधी बिरगे आदी उपस्थित होते.



# पाणलोट यात्रांतर्गत गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण करावी

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवरी-**

केंद्र शासनाने माहे जानेवारी २०२५ पासून राज्यातील ३० जिल्ह्यात पाणलोट गावातील पाणलोट यात्रा सुरू केलेली आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील माढा, कुर्डुवाडी, मंगळवेढा व सांगोला या चार तालुक्यात त उपक्रम राबवण्यात येणार आहे तरी जलसंधारण विभागाच्या सर्व संबंधित यंत्रणांनी उपरोक्त तालुक्यातील प्रत्येक गावात पाणलोट चळवळ निर्माण करण्यासाठी प्रबोधन मोहीम राबवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

या यात्रेचे नियोजन करण्याकरिता जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे अध्यक्षतेत जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाली. यावेळी सदस्य सचिव तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमोल जाधव, जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद एस.एस. पारशे, उपविभागीय अधिकारी भीमा पाटबंधारे विभाग एस.डी.हलकुडे, प्रकल्प संचालक नेहरू युवा केंद्र अनिल हिंगे, उपकार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वाय.चौधरी, उपकार्यकारी अधिकारी सोलापूर पाटबंधारे विभाग ओ.बी.थंबद, प्रांत अधिकारी माढा पी.व्ही. आंबेकर तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी व योजनेचे सर्व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पुढे म्हणाले की, सर्व यंत्रणांना एकत्र येऊन गावोगावी पाणलोट चळवळ निर्माण व्हावी, याअनुषंगाने नवीन मृद व जलसंधारण कामांचे भूमिपूजन करणे, पाणलोट कामांवर श्रमदान करणे, पुर्ण झालेल्या कामांचे लोकार्पण करणे, पाणलोट योध्दे निवडणे इत्यादी कामांचे सुक्ष्म नियोजन करून या उपक्रमांतर्गत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, बचत गटातील महिला, स्वयंसेवी संस्था व शेतकरी यांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे सांगितले.

# सरपंचांनी गावचा विकास आदर्शवत केला पाहिजे

## यशदाचे राज्य प्रशिक्षक शिवाजीराव पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०८ जानेवारी-**

ग्रामीण भागात स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांमध्ये सुद्धा अनेक समस्या आहेत. विविध शासकीय योजनांचे अभिसरण केल्यानंतर गावचा विकास हा राज्यासाठी आदर्शवत करता येतो, यामुळे सरपंचांनी पुरोगामी परिणामांचा आदर्श गावाच्या विकासामध्ये ठेवला पाहिजे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विकास प्रशासन प्रबोधिनी तथा यशदाचे राज्य प्रशिक्षक शिवाजीराव पवार यांनी बोलताना केले.

ते उत्तर सोलापूर पंचायत समिती सभागृहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या सरपंच, ग्रामसेवकांसाठी ठेवलेल्या 'गावचा विकास आराखडा' या कार्यशाळेत बोलत होते. प्रारंभी महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी बी. सी. पाटील, शिंदे, यशदाचे राज्य प्रशिक्षक ह. बा.कादे, पंचायत समितीचे वरिष्ठ सहाय्यक राजेंद्र वारगड, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष आणि नरोटेवाडीचे सरपंच भगत उपस्थित होते.

पवार बोलताना पुढे म्हणाले की, १५ वित्त आयोगाचा आराखडा बनविताना लोकांच्या समस्या आराखड्यामध्ये दिसल्या पाहिजेत आणि गाव गरिबी मुक्त करून उपजीविकीचे साधन गाव पातळीवर उपलब्ध करून दिले पाहिजे. जल, जंगल आणि जमिनी यावर ग्रामपंचायतीने विशेष भर देऊन शुद्ध पाणी या सर्व गावच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. गावामध्ये ग्राम सभा वाजत गाजत झाली पाहिजे. विकासामध्ये सर्व घटकांना न्याय देता आला पाहिजे. यावेळी सरपंच आणि ग्रामसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वे स्थानकांवर सापडलेला बालक आई-वडिलांना सुपूर्द

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी -**

सोलापूर रेल्वे स्थानकावर सापडलेल्या ८ वर्षीय बालकास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडील एलएसयुसी युनिटच्या माध्यमातून त्या बालकाच्या आई-वडीलांकडे सुखरूप सुपुर्द करण्यात आले.

सोलापूर रेल्वे स्थनकांवर लोहमार्ग पोलीसांनी ७ जानेवारी रोजी सोलापूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण येथे स्थापित एल.एस.यु.सी. युनिट (बालकांसाठी कायदेशीर सेवा युनिट) यांचेशी संपर्क साधुन, स्टेशनवर एक ८ वर्षाचा लहान मुलगा सापडल्याचे कळविले होते. या समिती मधील सदस्य विधीज्ञ श्रीमती स्नेहल राउत, महेश सोलंकर, विधी स्वयंसेवक श्रीमती हुसेनबी खरादी व विमला गुळेद यांनी लगेच सोलापूर रेल्वे स्थानक गाठले. त्यांनी संबंधीत बालकाकडे चौकशी केली असता त्याने सांगितले की, तो त्याचे आईवडिलांसमवेत तुळजापूर येथे दर्शनासाठी आला होता.

दर्शन झालेनंतर ते परत आपल्या मुळगावी सिकंदराबाद येथे जाणेकरीता स्टेशनवर आले. तेवढयात सिकंदराबाद एक्सप्रेस सहा वाजता असल्याने त्याचे वडिलांनी प्रथम त्यास डब्यात बसविले व त्याचे आईस घेऊन येईपर्यंत गाडी चालू झाली. त्यामुळे त्याचे आईवडिल मागील डब्यात चढले, मुलास वाटले की आईवडिल स्टेशनवरच राहिले आहे. त्यामुळे घाबरुन त्याने चालत्या गाडीतूनच स्थानकांवर उडी घेतली. स्टेशनवर आईवडिल आढळून न आल्याने तो घाबरुन रडू लागला हे पाहून स्टेशनवरील वडापाव विकणारा इसमानी त्याची विचारपूस करुन त्यास लोहमार्ग पोलीस स्टेशनला सुपुर्त केले. समितीमधील सदस्यांनी पालकांशी संपर्क साधला. तो पर्यंत आईवडिल गुलबर्गा स्टेशनला पोहोचले होते. गुलबर्गा रेल्वे लोहमार्ग पोलीस स्टेशनला संपर्क करुन घटना कळविली. त्यानंतर मुलाचे आईवडिल सोलापूरचे स्टेशनला परत आले. तोपर्यंत विधी स्वयंसेवक विमला गुळेद व हुसेनबी खरादी यांनी बालकाचे आईवडिल येईपर्यंत त्यास धीर दिला आणि त्यांना सुपूर्द केले.

# रस्ता सुरक्षा अभियानात पाकणी डेपो येथे प्रबोधनपर अभियान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी -**

रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत महामार्ग पोलिस आणि भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिडेट यांच्यावतीने पाकणी डेपो येथे टँकर चालकांची डोळे तपासणी तसेच आरोग्य विषयी माहिती देण्यात आली.




पाकणी येथील भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड च्या डेपो येथील अधिकारी, स्टाफ व चालक यांचे करिता व जनजागृती प्रबोधन अभियान घेण्यात आले.

उपस्थित सर्वाना वाहतूक नियमाचे मार्गदर्शन करून या संदर्भाने रस्ता सुरक्षा अभियान राबवण्याच्या उद्देशाने महामार्गवर प्रवास करतांना वाहतूक नियमाचे पालन करण्याच्या सूचना व मार्गदर्शन करण्यात आले.

पुणे महामार्ग विभागाचे पोलीस अधीक्षक विक्रम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान घेण्यात आले. यावेळी सहायक पोलिस निरीक्षक थिटे, पोलीस उपनिरीक्षक हेमंत काटे, सांगळे, शिंदे यांच्यासह कर्मचारी हजर होते.

# प्रतिकात्मक नंदीध्वज, पालखीची हत्तुरे नगरातून मिरवणूक

## हत्तुरे नगरवासियांनी घेतला सिद्धेश्वर यात्रेचा अनुभव; पायघड्यातून सामाजिक संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा व मल्लिकार्जुन बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त प्रतिकात्मक नंदी ध्वज व पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी यात्रेसारखीच वातावरण निर्मिती झाल्याने हत्तुरे नगरवासीयांनी सिद्धेश्वर यात्रेचा अनुभव घेतला.




प्रारंभी नंदी ध्वज व पालखीचे पूजन प्रमुख मानकरी राजशेखर हिरेहब्बू मनोज हिरेहब्बू जगदीश हिरेहब्बू, संजय हिरेहब्बू विनोद हिरेहब्बू धरेप्पा हत्तुरे नगरसेवक वैभव हत्तुरे यांच्या हस्ते मुख्याध्यापक वैजिनाथ हत्तुरे, संस्थेचे अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ, सोलापूर विजापूर नाका पोलीस स्टेशनचे पी.आय.दादा गायकवाड, वीरशैव व्हिजनचे संस्थापक राजशेखर बुरकुले, शिक्षण विस्तार अधिकारी बापूराव जमादार, केंद्रप्रमुख सिद्राम वाघमोडे, कंगनाळकर हायस्कूलचे मुख्याध्यापक विद्यानंद स्वामी, बंडा प्रशालेचे मुख्याध्यापक एम.डी. बिराजदार यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी मान्यवरांचे शाल व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर नगरातून बाराबंदीतील मुलांच्या हातात श्री सिद्धेश्वर यात्रेप्रमाणे सात प्रतिकात्मक नंदी ध्वज व पालखी, कावड भगवे झेंडेधारी पथक बोला बोला एकदा भक्त लिंग हर्र... बोला... हर्र... श्री सिद्धेश्वर महाराज की जय अशा घोषणा देत मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत शेकडो बालचमू व शिक्षकवृंद बाराबंदी नेहरू शर्ट या वेशभूषेततर मुली व शिक्षिका पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. नंदीध्वज पालखीच्या स्वागतासाठी प्रशालेकडून व नगरवासीयाकडून रांगोळीच्या सुंदर आकर्षक पायघड्या काढून सामाजिक संदेश देण्यात आला होता. मिरवणुकी दरम्यान हत्तुरे परिवार व भक्तगणांकडून नंदी ध्वज व पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली.

कार्यक्रमास वेदमूर्ती बसवराज शास्त्री, पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, मुख्याध्यापक सचिन जाधव, काशिनाथ मळेवाडी, सुधाकर कामशेट्टी. विनायक हत्तुरे, रितेश हत्तुरे, विरपाक्ष चिवरे, गिरमल पडसलगी, राजू बाहेरमठ, मारुती माने, बसवराज कोरे उपस्थित होते. मिरवणूक यशस्वी करण्यासाठी क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके, परमेश्वर चांदोडे, प्रा.लक्ष्मीकांत पनशेट्टी, अनिलकुमार गावडे, योगीनाथ शिरशी, गणेश कोरे, अमरनाथ कदारे, सुकेशनी गगोंडा, अनिता हौंदे, रमेश आगवणे, संतोष स्वामी, प्रतीक्षा बिडवे, प्रिया पसारे यांनी परिश्रम घेतले.



# नेताजी प्रशालेत बेडन पॉवेल यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत स्काऊट गाईडचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

लॉर्ड बेडन पॉवेल यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक रविशंकर कुंभार व पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांनी केले. याप्रसंगी अशोक पाटील, बसवराज तेग्गेळी, शैलेश स्वामी, गणपती पाटील, विजयालक्ष्मी माळवदकर, जयश्री बिराजदार , भाग्यश्री महाजन आदी उपस्थित होते. अंजली तावस्कर या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. श्रीपूरच्या स्काऊट-गाईड जिल्हा मेळाव्यात द्वितीय क्रमांक पटकविलेल्या समर्थ अलदी, कार्तिक गुत्तीकोंडा, शुभम सरवदे, आदित्य बोद्दुल, ओंकार एडके,ि नरंजन शिरगे, साईप्रसाद कोक्कूल, साई पवार, अजय इरकल, लोकेश वड्डेपल्ली, आकाश भैरामडी, प्रतीक दंडवते, नागराज श्रीगण, दर्शन चितळे, हर्षद विटकर, सिद्धार्थ नल्ला, प्रथमेश श्रावण व गाईड विभागाचे रक्षिता सुकंनपल्ली, सृष्टी हुमनाबादे, कृतिका चव्हाण, श्रेया अल्लम, अनुष्का पुजारी, पूर्वा रॅके, श्रुतिका मामडयाल, बबिता कोटा, कावेरी पगडयाल, लहरिका वडेपल्ली, लहरिका गोने, हेमा झुंजा, आरती मामडयाल, ईश्वरी नलावडे, गायत्री बहिरगोंड, सोनाक्षी चव्हाण, प्रतीक्षा श्रावण, रोहिणी पुजारी, निहारिका नुत्ती, संस्कृती खराटे यांना गौरविण्यात आला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कॅलिफोर्नियातील आगीत हॉलिवूड स्टार्सची घरे जळून खाक


वणव्यासारख्या पसरलेल्या आगीत अनेक घरे सापडली आणि पाहता पाहता बेचिराख झाली

## कमला हॅरिस यांनी घर केले रिकामे

## २८ हजार घरांचे नुकसान

## ३ लाख लोक बाधित

**कॅलिफोर्निया, ९ जानेवारी**

अमेरिकेच्या कॅलिफोर्निया राज्यातील लॉस एन्जेलिसच्या जंगलात लागलेली आग शहरापर्यंत पोहोचली आहे. मंगळवारी लागलेल्या आगीमुळे आतापर्यंत ४,८५६ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. आगीत सुमारे ११०० इमारती पूर्णपणे जळून खाक असून, २८ हजार घरांचे नुकसान झाले आहे.

जंगलात पसरलेल्या आगीमुळे पाच जणांचा मृत्यू झाला असून, ५० हजार लोकांना तत्काळ घरे सोडण्यास सांगण्यात आले. सुमारे ३ लाख लोकांना सुरक्षित स्थळी जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रशासनाने शहरात आणिबाणी जाहीर केली आहे.

लॉस एन्जेलिस शहरातील पॉश एरिया असलेल्या पॅलिसेड्समधील अनेक हॉलीवूड स्टार्सचे बंगले या आगीत जळून खाक झाले आहेत. मार्क हॅमिल, पॅरिस हिल्टन, जेमी ली कर्टिस, मँडी मूर, मारिया श्राइव्हर, ॲश्टन कुचर, जेम्स वुड्स आणि लीटन मीस्टर यांच्यासह अनेक स्टार्सच्या घरांना आग लागली. अनेक सेलिब्रिटींना घर सोडावे लागले आहे. आगीमुळे ब्रेटनवूड भागातील उपाध्यक्ष कमला हॅरिस यांचे घर रिकामे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लॉस एन्जेलिस ही अमेरिकेतील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला काऊंटी आहे.

येथे १ कोटीहून अधिक लोक राहतात. येथील फिल्म इंडस्ट्रीला प्रसिद्ध हॉलीवूडचे नाव देण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

### ‘सांता सना’ वाऱ्याने आग वेगाने पसरली

लॉस एन्जेलिस, कॅलिफोर्निया हे शहर पर्वतांमध्ये वसलेले आहे. येथे पाईनची जंगले आहेत. सुकलेली डेरेदार झाडे जळाल्याने आग लागली. पुढच्या काही तासांत या आगीने लॉस एन्जेलिसच्या अनेक भागांना वेढले. शहरातील हवा विषारी झाली आहे. जंगलात आग लागल्यानंतर ताशी १६० किमी वेगाने वाहणाऱ्या ‘सांता साना’ वाऱ्यांनी आग वेगाने पसरली. हे वारे सहसा शरद ऋतूत वाहतात, ते खूप गरम असतात.

# खैबर पख्तूनख्वा प्रांतात १६ कामगारांचे अपहरण

**पेशावर, ९ जानेवारी**

पाकिस्तानच्या अशांत खैबर पख्तूनख्वा प्रांतातील युरेनियम आणि प्लुटोनियम खाणकाम साईटवर काम करणाऱ्या १६ कामगारांचे गुरुवारी अज्ञात सशस्त्र लोकांनी अपहरण केले असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

लक्की मारवत जिल्ह्यातील अणुऊर्जा खाण प्रकल्पाच्या ठिकाणी जाणाऱ्या वाहनातून कामगारांचे अपहरण करण्यात आले. त्यानंतर अपहरणकर्त्यांनी कबाल खेल परिसरात वाहन पेटवले. बंदूकधाऱ्यांनी कामगारांना अज्ञातस्थळी नेले. या अपहरणाची जबाबदारी अद्याप कोणत्याही गटाने घेतलेली नाही. बंदी घातलेला तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान हा गट या भागात सक्रिय आहे आणि यापूर्वी अशा अपहरणांसाठी त्यांच्यावर आरोप करण्यात आले. २००७ मध्ये अनेक दहशतवादी संघटनांचा एकत्रित गट म्हणून स्थापन झालेला टीटीपी हा अल-कायदाच्या जवळचा असल्याचे मानले जाते.


उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यासाठी जय्यत तयारी सुरू असून, देश-विदेशातून येणाऱ्या लोकांसाठी तात्पुरती निवासस्थाने उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे

# उत्तराखंडमधील अवैध मदरसे रडारवर

**डेहराडून, ९ जानेवारी**

उत्तराखंडमधील बेकायदेशीर मदरशांवर सरकारकडून कारवाई करण्यात येत आहे. डेहराडूनमध्ये प्रशासनाने केलेल्या सर्वेक्षणात ५७ मदरसे बेकायदेशीर असल्याची माहिती समोर आली. यात सर्वाधिक ३४ अवैध मदरसे विकासनगर भागात आढळून आले. डेहराडूनच्या स्थानिक प्रशासनाकडून हा अहवाल सादर केल्यानंतर उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी बुधवारी यावर भाष्य करीत अशा संस्थांच्या निधीचा स्रोत तपासण्याचा आदेश दिला.

मुख्यमंत्री धामी यांनी राज्यातील सर्व मदरशांसाठी पडताळणी मोहीम सुरू केली. त्यानुसार डेहराडूनच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मदरशांसंदर्भातील पडताळणी केल्यानंतर ५७ मदरसे बेकायदेशीर असल्याची माहिती समोर आली. जिल्हाधिकारी बन्सल यांच्या अहवालानंतर मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी या अवैध मदरशांच्या निधीचा स्रोत तपासण्याचा आदेश दिला. या अवैध मदरशांना चालवण्यासाठी निधी नेमका कुठून येतो, यासंदर्भातील चौकशी करण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री धामी यांनी माध्यमांना सांगितले. (वृत्तसंस्था)

# महाकुंभात अदानी कमावणार पुण्य!

## दररोज १ लाख भाविकांचा मिळणार आशीर्वाद

**प्रयागराज, ९ जानेवारी**

महाकुंभमेळ्याचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले आहे. पौष महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेपासून महाकुंभमेळा सुरू होईल. महाकुंभमेळ्यात स्नानासाठी व दर्शनासाठी मोठ्या संख्येने लोक येतात. हा महाकुंभमेळा सुमारे ४५ दिवस चालतो. या मेळ्यात वेद, चरक संहिता, पुराण आणि प्राचीन ज्योतिषशास्त्राचे ग्रंथ प्रदर्शित केले जाणार आहेत. यंदा प्रयागराज शहरात महाकुंभमेळा आहे. या महाकुंभासाठी अदानी ग्रुपने इंटरनॅशनल सोसायटी फॉर कृष्णा कॉन्शसनेस (इस्कॉन) सोबत भागीदारी करून प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात महाप्रसाद सेवा सुरू केली आहे.

या महाप्रसाद सेवेद्वारे दररोज सुमारे १ लाख भाविकांना जेवण दिले जाईल. यात १८ हजार स्वच्छता गृहांचा समावेश असणार आहे. महाप्रसाद सेवेसाठी सुमारे २,५०० स्वयंसेवक दोन मोठ्या स्वयंपाकगृहांमध्ये जेवण तयार करतील. या जेवणाचे आयोजन ४० केंद्रांवर केले जाणार आहे. भाविकांना हे जेवण पानांपासून बनवलेल्या पर्यावरणपूरक ताटांमध्ये दिले जाईल. महाप्रसादामध्ये रोटी, डाळ, भात, भाजी आणि गोड पदार्थांचा समावेश असेल. (वृत्तसंस्था)

### अदानी समूहाची गीता प्रेसला मदत

याशिवाय, अदानी समूहाने प्रयागराज येथे मुख्यालय असलेल्या गीता प्रेससोबत भागीदारी करून आरती संग्रहाच्या १ कोटी प्रती छापण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. आरती संग्रहात विविध देवतांची भजने किंवा आरतींचा संग्रह असणार आहे, ज्यात शिव, लक्ष्मी, गणेश, विष्णू, दुर्गा आणि इतर देवतांचा समावेश आहे. हा आरती संग्रह महाकुंभमेळ्यात भाविकांना विनामूल्य वाटला जाणार आहे.

## चित्रपट वार्ता

### फरहान-शिबानीच्या घरी पाळणा हलणार?



**मुंबई** : अभिनेता फरहान अख्तर आणि पत्नी शिबानी दांडेकर यांच्या घरी लवकरच नवा पाहुणा येणार असल्याची चर्चा आहे. वयाच्या ४४ व्या वर्षी शिबानी गरोदर असल्याचे वृत्त आहे. फरहानने गुरुवारी आपला ५१ वा वाढदिवस साजरा केला. याच दिवशी त्याला बाबा होणार असल्याची बातमी मिळाली, असे काही वाहिन्यांनी म्हटले आहे. शिबानीसोबत त्याचे दुसरे लग्न असून, पहिल्या पत्नीपासून त्याला दोन मुली आहेत. आता या वर्षअखेर त्यांच्या घरात नवा पाहुणा येणार आहे, असे समजते. शिबानीचे वय लक्षात घेता त्यांनी आयव्हीएफचा पर्याय स्वीकारला असल्याची शक्यता आहे. समाज माध्यमांवर शिबानी आई होणार असल्याच्या बातमीची चर्चा असली, तरी स्वत: शिबानी किंवा फरहानने याची अद्याप पुष्टी केलेली नाही.

### पुन्हा एकदा आदित्यसोबत दिसणार श्रद्धा



**मुंबई** : ‘आशिकी २’ची लोकप्रिय जोडी आदित्य रॉय कपूर आणि श्रद्धा कपूर पुन्हा एकत्र दिसणार आहे. दिग्दर्शक मोहित सुरी या जोडीला स्क्रीनवर घेऊन येणार असल्याची चर्चा आहे. यापूर्वी श्रद्धा-आदित्यने ‘ओके जानू’ हा सिनेमा केला होता. दोघांच्या अफेअरची आणि नंतर ब्रेकअपची चर्चा झाली. नंतर ते पुन्हा सोबत दिसले नाहीत. मात्र, आता ‘आशिकी २’चे दिग्दर्शक मोहित सुरीच दोघांना परत घेऊन येत आहेत. या सिनेमाच्या कथेवर सध्या काम सुरू आहे. येत्या काही दिवसांत याबाबत अधिकृत घोषणा होणार आहे.

### इशिका तनेजा अभिनय सोडून बनली साध्वी



**मुंबई** : अभिनेत्री माजी मिस वर्ल्ड टूरिझम इशिका तनेजाने बॉलिवूडला अलविदा म्हटले आहे. द्वारका शारदा पीठाचे शंकराचार्य स्वामी सदानंद सरस्वती महाराज यांच्याकडून तिने जबलपूरमध्ये गुरूदीक्षा घेतली. इशिका म्हणाली, मी आतापर्यंत नाव आणि प्रसिद्धीसाठी धावत होती. नाव, प्रसिद्धी खूप मिळवली पण, आत्मशांती आणि मनाची संतुष्टी मिळाली नाही. आत्मशांतीसाठी तो प्रवास सोडून मी आध्यात्माच्या प्रवासावर जाण्याचा विचार केला आहे. आता मी सनातन धर्म आणि लोकांची सेवा करणार आहे.

### मराठी दिग्दर्शकाच्या वेबसीरिजमध्ये जग्गूदादा

**मुंबई** : ॲमेझॉन एम. एक्स. प्लेअरची आगामी क्राईम ड्रामा सीरिज ‘चिडिया उड’ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, यात जॅकी श्रॉफ अगदी वेगळ्या धाटणीच्या भूमिकेत दिसणार आहे. याचे दिग्दर्शन मराठी दिग्दर्शक रवी जाधव यांनी केले आहे. आबिद सुरती यांच्या ‘केज’ या कादंबरीवर आधारित या सीरिजचा विषय मुंबईच्या अंडरवर्ल्डशी संबंधित आहे. शक्ती, गुन्हेगारी आणि जगण्याची कथा यात दाखवण्यात आली आहे. हरमन बावेजा, विकी बाहरीने निर्मिती केलेल्या या सीरिजमध्ये जॅकी श्रॉफसह भूमिका मीना, सिकंदर खेर, मधुर मित्तल, मीता वशिष्ट यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १५ जानेवारीपासून ही सीरिज ॲमेझॉन एमएक्स प्लेअरवर प्रसारित होणार आहे.

# इंडिया आघाडीचे विधानसभा निवडणुकीच्या आधीच वाजले बारा

## सर्व घटक पक्षांनी काँग्रेसला दाखवली जागा

**श्यामकांत जहागीरदार**

**नवी दिल्ली, ९ जानेवारी**

लोकसभा निवडणुकीच्या आधी तयार झालेली काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आधी विसर्जित होत, तिचे बारा वाजले आहेत.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीतील आप आणि काँग्रेस हे दोन प्रमुख पक्ष एक-दुसऱ्याविरुद्ध दंड थोपटून उभे राहिल्यामुळे आघाडीच्या ऐक्याला सर्वप्रथम तडा गेला होता. दिल्लीतील काँग्रेस नेते अजय माकन आणि संदीप दीक्षित यांनी आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्यावर राष्ट्रविरोधी या शब्दांत हल्ला चढवला होता. तेव्हाच इंडिया आघाडीचे भवितव्य धोक्यात आले होते.

काँग्रेसच्या केजरीवालांवरील हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून आपने काँग्रेसलाच इंडिया आघाडीतून काढण्याची मागणी अन्य घटक पक्षांकडे केली होती. येथून इंडिया आघाडीत फूट पडणार, याचे संकेत मिळाले होते. आघाडीतील घटकपक्षांनी काँग्रेसविरोधात घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे इंडिया आघाडी संपुष्टात आली.

इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष हे काँग्रेसवर नाराज असल्याचे दिसत होते. याची परिणती ममता बॅनर्जीच्या तृणमूल काँग्रेसने आणि अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षाने दिल्ली विधानसभा निवडणुकीत अरविंद केजरीवाल यांच्या आपला पाठिंबा देण्यात झाली. दिल्लीत भाजपाचा पराभव करण्याची ताकद फक्त आपमध्ये आहे, येथे काँग्रेसची संघटनाही अस्तित्वात नाही, असे अखिलेश यादव यांनी म्हटले. या घटनाक्रमामुळे काँग्रेस जखमी झाली. उबाठाचे उद्धव ठाकरे यांनीही आपला पाठिंबा देत काँग्रेसच्या जखमेवर मीठ चोळले. यामुळे दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेस एकटी पडली.

हे कमी झाले की काय म्हणून राजदचे तेजस्वी यादव यांनीही इंडिया आघाडी फक्त लोकसभा निवडणुकीसाठी स्थापन झाली होती, आता तिचे औचित्य संपले आहे, असे विधान करून खळबळ उडवली. मात्र बिहारमध्ये राजद आणि काँग्रेस आघाडी कायम राहील; कारण काँग्रेस हा आमचा जुना मित्रपक्ष आहे, असे ते म्हणाले.

आघाडीतील सर्व घटक पक्ष विरोधात गेल्यामुळे काँग्रेसलाही या आघाडीचे विसर्जन करण्याशिवाय पर्याय राहिला नाही. इंडिया आघाडी फक्त लोकसभा निवडणुकीसाठी स्थापन झाली होती, असा खुलासा काँग्रेस प्रवक्ते पवन खेरा यांना करावा लागला. काँग्रेसच्या या अधिकृत भूमिकेने इंडिया आघाडी आपोआपच संपुष्टात आली. भाजपा आणि रालोआतील घटक पक्षांनाच नाही, तर इंडिया आघाडीतील घटक पक्षांनाही काँग्रेस नको असल्याचे यातून स्पष्ट झाले. काँग्रेस पक्षातीलच नाही तर इंडिया आघाडीतील मित्रपक्षांनाही लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना सांभाळता आले नाही. हे त्यांचे मोठे राजकीय अपयश समजायला हरकत नाही.

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या आधीच काँग्रेस पराभूत झाली. निवडणुकीतील राजकीय घटनाक्रमाची ही मोठी उपलब्धी म्हणायला हरकत नाही. याचा फायदा विधानसभा निवडणुकीत तसेच नंतरही राष्ट्रीय राजकारणात भाजपाला मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# नोबल विजेती मलाला युसुफझाई देणार पाकिस्तानला भेट

**इस्लामाबाद, ९ जानेवारी**

नोबेल पुरस्कार विजेती मलाला युसुफझाई मुस्लिम समुदायातील मुलींच्या शिक्षणावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी आठवड्याच्या शेवटी पाकिस्तानला भेट देणार आहे. ११-१२ जानेवारी रोजी येथे होणाऱ्या दोन दिवसांच्या परिषदेत मलाला प्रमुख वक्त्यांपैकी एक असणार आहे.

ऑक्टोबर २०१२ मध्ये जीव वाचवण्यासाठी ब्रिटनला नेण्यात आल्यानंतर मलालाचा हा पाकिस्तानचा तिसरा दौरा आहे. तिच्यावर हल्ला झाल्यानंतर पहिल्यांदा तिने ऑक्टोबर २०२२ मध्ये तिच्या गावी जाण्यासाठी पाकिस्तानला भेट दिली. मुलींच्या शिक्षणाच्या मोहिमेवरून बंदी घातलेल्या तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानने मलालाच्या डोक्यात गोळी झाडली तेव्हा ती फक्त १५ वर्षांची होती. पंतप्रधान शाहबाज शरीफ या कार्यक्रमाचे उद्घाटन करतील आणि मुख्य भाषण देतील. मलालाने परिषदेत सहभागी होण्याची पुष्टी केली आहे आणि मुस्लिम समुदायांमध्ये मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे मुख्य भाषण देईल, असे परिषदेच्या एका आयोजकाने सांगितले. (वृत्तसंस्था)

# मृत व्यक्तीचे सोशल मीडिया अकाऊंट बंद होणार

## केंद्राची कायदेशीर तरतूद

**नवी दिल्ली, ९ जानेवारी**

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटचे काय करायचे, असा प्रश्न अनेकदा पुढे येतो. भारतात याबद्दल नियमावली बनवली जाणार आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे सोशल मीडिया अकाऊंट बंद करावे लागणार आहे. भारतात डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट रूल २०२५मध्ये ही तरतूद करण्यात आलेली आहे.

या कायद्यातील तरतुदींनुसार व्यक्तीचा खाजगी डेटा कसा प्रोसेस केला जावा आणि कसा स्टोअर केला जावा, याबद्दलचे नियम करण्यात आले आहेत. नागरिकांची गोपनीयता आणि खाजगीपणाचा अधिकार अबाधित राहावा, असा या कायद्याचा उद्देश आहे. तसेच जी व्यक्ती, कंपनी किंवा संस्था व्यक्तीचा डेटा प्रोसेस करते, त्याबद्दलचे निर्णय घेत आणि हा डेटा स्टोअर करते, त्यासाठी ‘डेटा फिडुसिअरी’ अशी संज्ञा वापरण्यात आलेली आहे. (वृत्तसंस्था)

### ‘असे’ अकाऊंट होईल बंद

नवा कायदा असे सांगतो की, डेटा फिडुसिअरींनी जर काही कायदेशीर बाबींच्या पूर्ततेबद्दलची गरज नसेल, तर असा पर्सनल डेटा नष्ट केला पाहिजे. याचाच अर्थ असा की, सोशल मीडिया कंपनी, ई-कॉमर्स आणि ऑनलाईन गेमिंग कंपन्यांनी जे अकाऊंट सक्रिय नाहीत, ते पुढाकार घेऊन बंद करायचे आहेत. माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विन वैष्णव यांनी म्हटले आहे की, कंपन्यांना या नियमांची पूर्तता करण्यासाठी २ वर्षांचा कालावधी मिळेल तसेच यासंदर्भात चर्चा सुरू आहे.

# धन्य तो गुगल मॅप...!

## पोलिसांना जायचे होते आसाम, पोहोचले नागालँड!!

**गुवाहाटी, ९ जानेवारी**

गुगल मॅपने चुकीचे रस्ते दाखविल्याने बिहारमध्ये काही लोकांचा अपघात होऊन मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. अशा अनेक घटना आहेत. यामुळे गुगल मॅपवर विसंबून राहण्यात काही अर्थ नाही. असाच अनुभव आसाममध्ये छापा मारण्यासाठी जात असलेल्या पोलिसांना आला. पुढे त्यांच्यासोबत जे घडले, ते देखील गंमतीशीर असलेण तरी तेवढेच गंभीरही आहे.

पोलिसांचे एक पथक साध्या वेशात आसाममध्ये छापा मारण्यासाठी जात होते. त्यांनी लोकेशन लावले, पण त्यांना गुगल मॅपने थेट नागालँडला पोहोचविले. तेथील लोकांनी त्यांना अत्याधुनिक शस्त्रांसह पाहिले आणि हे दरोडेखोर किंवा दहशतवादी असतील, असे समजून त्यांच्यावर हल्ला केला आणि कोंडून ठेवले.

छापा मारण्यासाठी आसामचे १६ पोलिस निघाले होते. गुगल मॅप दाखवेल, तसा ते रस्ता पकडत गेले आणि नागालँडच्या मोकोकचुंग जिल्ह्यात पोहोचले, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

हा चहाच्या मळ्याचा परिसर होता, जो गुगल मॅप्सवर आसाममध्ये दाखवण्यात आला होता. तथापि, तो प्रत्यक्षात नागालँडच्या सीमेवर होता. जीपीएसवर गोंधळ असल्याने गुन्हेगाराच्या शोधात पथक नागालँडच्या आत गेले. स्थानिकांनी त्यांच्याकडील शस्त्रे पाहून ते गुन्हेगार असतील, असे समजून हल्ला करीत बांधून ठेवले. अखेर नागालँडच्या पोलिसांना हा प्रकार समजला आणि त्यांची सुटका झाली. (वृत्तसंस्था)

# काँग्रेस मुख्यालयाचा नवा पत्ता ‘९ ए, कोटला मार्ग’

## सोनियांच्या हस्ते १५ जानेवारीला उद्घाटन

**नवी दिल्ली, ९ जानेवारी**

काँग्रेसच्या राजकीय प्रवासाचा महत्त्वाचा भाग राहिलेल्या २४ अकबर रोडवरील पक्ष कार्यालयाच्या इमारतीला लवकरच पक्ष कायमचा रामराम करणार आहे. कोटला मार्गावरील ९ ए बंगल्यात काँग्रेस मुख्यालयाचे स्थलांतर होणार असून, पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्या हस्ते १५ जानेवारी रोजी या नव्या इमारतीतील पक्ष कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमाचे औचित्य साधत विशेष कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे.

देशभरातील काँग्रेस नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे हक्काचे ठिकाण अशी २४, अकबर रोडवरील कार्यालयाची ओळख होती. अनेक ऐतिहासिक आणि महत्त्वाच्या घडामोडींचे हे कार्यालय साक्षीदार आहे. येथून काँग्रेसचे मुख्यालय ९ ए, कोटला मार्ग येथे हलविले जाणार आहे.

आणिबाणीनंतरच्या पराभवातून सावरलेल्या इंदिरा गांधी, १९८० मध्ये लोकसभा निवडणुकीत त्यांनी मिळवलेला प्रचंड विजय, १९८४ मध्ये झालेली त्यांची हत्या, त्याच वर्षी राजीव गांधी यांनी स्वीकारलेले पंतप्रधानपद, १९९६ ते २००४ या कालावधीत पक्षात आलेली अस्थिरता, त्यानंतर सोनिया गांधी यांच्या कार्यकाळाचा उदय, विविध निवडणुकांतील जय-पराजय अशा असंख्य घडामोडींची २४, अकबर रोडवरील इमारत साक्षीदार आहे.



९ ए, कोटला मार्गावरील काँग्रेसचे मुख्यालय इंदिरा गांधी भवन या नावाने ओळखले जाणार आहे. मागील काही वर्षांपासून सुरू असलेले या कार्यालयाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मकरसंक्रांतीचे औचित्य साधत १५ जानेवारीला या कार्यालयाचे उद्घाटन केले जाईल.

दीनदयाल मार्गावर काँग्रेस मुख्यालयासाठी १५ वर्षांआधी जागा प्रदान करण्यात आली होती. त्याठिकाणी सहा मजली इमारत बांधून तयार झाली आहे. काँग्रेसच्या मुख्यालयाचे प्रवेशद्वार मात्र कोटला मार्गाच्या बाजूने आले आहे. नव्या मुख्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रमास पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, राहुल गाधी तसेच अन्य प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. (वृत्तसंस्था)

### मणिपूरमध्ये दोन दहशतवाद्यांना अटक

**इम्फाळ** : मणिपूरच्या काकचिंग जिल्ह्यातून कांगलीपाक कम्युनिस्ट पार्टी तैबंगनबा या प्रतिबंधित दहशतवादी संघटनेच्या दोन सदस्यांना खंडणीच्या कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपावरून सुरक्षा दलांनी अटक केली आहे. हे दोघे काकचिंग जिल्ह्यातील सुगनू, चेरेल आणि कक्चिंग खुनौ भागात खंडणीच्या कारवायांमध्ये सामील होते, असे पोलिसांनी गुरुवारी सांगितले.

सुरक्षा दलांनी बुधवारी कांगपोकपी जिल्ह्यात शोध मोहिमेदरम्यान दारूगोळ्यासह अत्याधुनिक बंदुक जप्त केली. न्यू केथेलमंबी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील साहेबुंग शिखर, झिरो पॉइंट-कोटझिम रोड येथून मॅगझिनसह एक ५.५६ हेकलर आणि कोच जी ३ रायफल, मॅगझिनसह एक ०.३२ पिस्तूल, एक ९ एमएम पिस्तूल, दारूगोळा, सिंगल बॅरल रायफल आणि दोन ट्यूब लॉन्चर जप्त करण्यात आले, असे कांगपोकपी जिल्हा पोलिसांनी सांगितले.

## अग्रलेख...

# कालाय तस्मै नम:

काळाचे चक्र सतत फिरत असते. त्यामुळेच त्याचा एखादा बिंदू फिरून त्याच ठिकाणी येतो. वास्तविक भाषेत त्याला इतिहासाची पुनरावृत्ती झाली, असे म्हटले जाते. विशेषतः राजकारणातील घडामोडींचे सूक्ष्म निरीक्षण केले की, इतिहासाच्या पुनरावृत्तीचे असे अनेक दाखले समोर येतात. ते सहजासहजी लक्षात येत नाहीत, पण त्या घडामोडींचे पूर्वसंदर्भ लक्षात घेतले की, पुनरावृत्तीचा अनुभव घेता येतो. बैल म्हातारा झाला की त्याला बाजार दाखवायचा असतो, हे वाक्य सुमारे २० वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड गाजले होते. हाडाच्या शेतकऱ्यास अशा वाक्प्रचारांचा नेमका अर्थ ठाऊक असल्याने राजकारणातील बारकावे समजावून सांगण्याकरिता ग्रामीण भागात अशा वाक्यांचा वापर करणारे काही मुरब्बी नेते महाराष्ट्रात आहेत. म्हणूनच हे वाक्य ज्याला आठवते, त्याच्या मनात अगोदर शरद पवार यांचे नाव हमखास येते. ज्येष्ठ काँग्रेस नेते दादा जाधवराव यांच्या विरोधातील प्रचारात बोलताना शरद पवार यांनी जाधवरावांची तुलना म्हाताऱ्या बैलासोबत केली होती. त्यांना राजकारणातून निवृत्त करावे, असा संदेश त्या मतदारसंघातील मतदारांस देण्याकरिता पवार यांनी हा, शेतकऱ्यास सहज समजेल असा दृष्टान्त देणारा वाक्प्रचार खुबीने वापरला होता. दादा जाधवराव तेव्हा सत्तरीच्या उंबरठ्यावर होते आणि पवार यांनी त्यांची म्हाताऱ्या बैलासोबत तुलना केली होती. काळाचे चक्र पुढे सरकून पुन्हा त्याच टप्प्यावर आले आणि वयाच्या ८४ व्या वर्षी निवडणुकीच्या राजकारणात नव्याने शड्डू ठोकून उतरताना शरद पवार यांना म्हातारपणाचा दाखला द्यावा लागला. मी अजून म्हातारा झालो नाही, असे बजावण्यापासून, महाराष्ट्राला रुळावर आणल्याखेरीज हा म्हातारा स्वस्थ बसणार नाही, असा निग्रही बाणा त्यांना दाखवावा लागला. तेव्हा त्यांच्याच पक्षातील आणि त्या पक्षातून बाहेर पडलेल्या अनेकांस २० वर्षांपूर्वीच्या त्यांच्या त्या वाक्याची नक्कीच आठवण झाली असेल. पवार जे बोलतात त्याच्या नेमके उलटे करतात आणि त्यांना जे करावयाचे असते, त्याबद्दल ते कधीच बोलत नाहीत, असेही म्हटले जायचे. म्हणजे शरद पवार यांचे राजकारण काहीसे अनाकलनीय आहे, असे त्यांचे सच्चे पाठीराखेदेखील म्हणत. म्हणूनच त्यांच्या राजकारणाचे धडे गिरवून त्यांचे शिष्यत्व पत्करण्याकरिता अनेक जण त्यांच्या पुढेमागे करीत असत, हेही महाराष्ट्राने पाहिले आहे. उमेदीच्या काळात शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणास आपल्या दीर्घ अनुभवाच्या आधारावर एक कानमंत्रही दिला होता. भाकरी फिरविली नाही तर ती करपते, हा त्यांचा आवडता राजकीय सिद्धान्त होता. आता म्हातारा बैल आणि करपलेली भाकरी यांचे राजकीय संदर्भ लक्षात घेतले, तर काळाचे चक्र फिरून पुन्हा त्याच टप्प्यावर आले आहे, याविषयी कोणाच्याही मनात दुमत असणार नाही.

काळाच्या या चक्राची गती अलिकडे वेगवान झाली आहे. सुमारे १० वर्षांपूर्वी २०१४ च्या निवडणुकांच्या काळात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या प्रगतीचे आणि सर्व क्षेत्रांतील आघाडीचे संपूर्ण श्रेय आपल्याकडे घेतले होते. 'ठोस निर्णय, ठाम कृती' ही राष्ट्रवादीची नीती आहे आणि तीच महाराष्ट्राची ताकद आहे, असा दावा करणाऱ्या जाहिरातींनी मुद्रित माध्यमांचे रकाने भरून गेले होते. आज शरद पवार यांच्यासोबत नसलेल्या व महायुती सरकारमध्ये दाखल झालेल्या नेत्यांपैकी अनेक नेत्यांची छायाचित्रेही त्या जाहिरातीत झळकली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे धोरण हे महाराष्ट्राच्या प्रगतीचे कारण आहे, असा दावा करणाऱ्या त्या जाहिराती आता काळाच्या चक्राबरोबर मागे गेल्या आहेत आणि 'ठोस निर्णय, ठाम कृती'चे नवे उदाहरण म्हणून अजित पवार यांच्या गटाकडे महाराष्ट्र पाहात आहे. शरद पवार यांच्या मुरब्बी राजकारणाची सद्दी आता संपत चालली असून, शरद पवार नावाच्या एका राजकीय पर्वाच्या अखेरीचा प्रारंभ सुरू झाल्याचे राजकारणात बोलले जाऊ लागले आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला मिळालेल्या घवघवीत यशामुळे गाफील राहिल्याचा मोठा फटका पराभवाच्या रूपाने शरद पवार यांच्या पक्षासह संपूर्ण इंडिया आघाडीलाच बसल्यानंतर कालपरवा शरद पवार यांच्या गटाने मुंबईत घेतलेल्या आढावा बैठकीतील सूर पाहता, आता नव्या उमेदीने उभारी घ्यावी, असा काही आधार या गटाच्या हाती उरलाच नाही किंवा कसे, असे वाटण्याजोगी परिस्थिती दिसू लागली आहे. पक्षातील अभूतपूर्व फुटीनंतर लागलेली गळती हे त्याचे मुख्य कारण आहे, यात शंका नाही. आढावा बैठकीच्या निमित्ताने उपस्थित असलेले नेतेदेखील यापुढच्या काळात शरद पवार यांच्यासोबत राहतील किंवा नाही, याची खात्री खुद्द पक्षश्रेष्ठींनाही राहिलेली नाही, हेदेखील या निमित्ताने स्पष्ट झाले. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या वक्तव्यात हाच सूर उमटलेला दिसतो. बैठकीच्या निमित्ताने समोर बसलेल्यांपैकी अनेक जण तिकडे जाऊन हार-गुच्छ देऊन आलेले आहेत; त्यांना तिकडे म्हणजे अजित पवार यांच्या गटात जावयाचे असेल, तर त्यांनी खुशाल जावे, असा थेट सल्लाच जयंत पाटील यांनी दिल्याने, शरद पवार यांच्यासोबतच्या शिल्लक नेत्यांना आपले राजकीय भवितव्य घडविण्यासाठी योग्य मार्ग निवडण्याची मुभाच दिली गेली आहे, असेही स्पष्ट झाले. विधानसभा निवडणुकीत पक्षाला महाराष्ट्रात जेमतेम १० जागांवर विजय मिळविता आला, ही स्थिती पक्षाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उमटविणारी आहे, असा अप्रत्यक्ष संकेतही जयंत पाटील यांनी दिला. पक्षाची स्थिती याहून अधिक वाईट काय होणार, हा त्यांचा उद्विग्न सवाल पक्षाच्या भवितव्याची चिंता व्यक्त करणारा आहे.

शरद पवार यांच्या गटाच्या आढावा बैठकीतील हा निराशेचा सूर पाहता, त्यांच्या जुन्या राजकीय सिद्धांताची आठवण होणे साहजिक वाटते. भाकरी फिरविली नाही तर ती करपते, हे त्यांचे वाक्य आज पक्षाच्या सद्यस्थितीच्या संदर्भात नव्याने विचारात घेणे गरजेचे आहे. शरद पवार यांचा पक्ष ज्या कारणामुळे फुटला आणि अनेक निष्ठावंतांनी शरद पवार यांचे बोट सोडून अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटात प्रवेश केला, ते पाहता, या सिद्धान्ताची प्रचीती येते. भाकरी न फिरविता नेतृत्वाची सारी सूत्रे एका हातात एकवटलेली राहावी, यासाठी धडपड सुरू झाल्याच्या संशयातूनच अजित पवार यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा मार्ग निवडला होता, हे आता गुपित राहिले नाही. शरद पवार यांचे वय झाले आहे, त्यांनी निवृत्तीचा मार्ग स्वीकारावा आणि नव्या नेतृत्वास संधी देऊन मार्गदर्शकाची भूमिका वठवावी, असे अजित पवार यांनी पक्षाबाहेर पडताना स्पष्ट केले होते. हीदेखील शरद पवार यांचीच राजकीय शिकवण असल्याचे आज अनेकांस पटले आहे. बैल म्हातारा झाला की त्याला बाजार दाखवायचा असतो, असे सांगणारे पवार स्वतः आज वयाच्या या टप्प्यावर राजकारणात सक्रिय आहेत. समाजाची स्मृती अल्पजीवी असते, असे म्हणतात. राजकारणाचा यावर ठाम विश्वासही असतो. तरीही काही घडामोडी, काही वक्तव्ये आणि काही नेते वेगवेगळ्या कारणांमुळे समाजाच्या कायमचे स्मरणात राहिलेलेच असतात. शरद पवार यांच्या गटात आज जे काही सुरू आहे, ते पाहता, विस्मृतीत गेलेल्या गोष्टीदेखील ताज्या होऊन पुन्हा आठवू लागतील, अशा टप्प्यावर काळाच्या चक्रानेच आणून ठेवल्या आहेत. शरद पवार यांच्या गटातील काही खासदार, आमदार व नेते अजित पवार यांच्या गटात दाखल होण्यासाठी आपला गाशा गुंडाळून तयार आहेत, अशी जोरदार चर्चा आणि ज्यांना जायचे आहे त्यांनी जावे, हा शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षांचा थेट इशारा या दोन बाबींची सांगड घातल्यास या भीतीची उकल होऊ शकते. असे काही घडू लागले की, पुन्हा एकदा निष्ठावंतांच्या गोटात शरद पवार यांच्या राजकारणातील अनाकलनीयतेची चर्चाही होऊ लागते. या गटाचे राजकीय भवितव्य आता अनिश्चित असल्यामुळे त्यांच्यासोबतच्या अनेक नेत्यांना आपल्या राजकीय भविष्याची आणि राजकीय अस्तित्वाची काळजी लागून राहिली असावी, असे बोलले जात आहे. शरद पवार यांनी आपल्या निष्ठावंतांची ही स्थिती ओळखली असावी आणि त्यांना त्यांचे भवितव्य घडविण्याच्या संधींची दारे खुली करण्याचा निर्णय घेतला असावा, अशीही चर्चा आहे. तसेच घडले, तर शरद पवार यांच्या अनाकलनीय राजकारणाची उकल करणे आता कोणासही अवघड राहिलेले नाही, हेच स्पष्ट होईल.

## दखल

**मधुरा कुलकर्णी**

# संगमावरील अपूर्व मेळा

नदीच्या काठाने जन्म घेतलेल्या मानवाने पुढे आपली संस्कृती आणि सभ्यताही प्रवाहाच्या साक्षीनेच वाहती ठेवली. काळागणती तिच्यात अनेक गोष्टींची भर पडत गेली. समाज बदलला. जगण्यात नवनवीन प्रवाह मिसळत गेले, आजही पूर्वापार असणाऱ्या परंपरा जपल्या जातात. किंबहुना नव्या झळाळीने, श्रद्धा, भक्तिपूर्वक त्यांचे पालन होताना दिसते. महाकुंभमेळा त्यातीलच एक. यंदा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारीदरम्यान आयोजित होणाऱ्या महाकुंभ मेळ्याकडे भारतवासीयांचेच नव्हे, तर समस्त जगाचे लक्ष लागले आहे. या निमित्ताने प्रचंड मोठ्या संख्येने एकत्र येणारे साधू-महंत, आखाड्यांमधील पूजक आणि भाविकांना पाहणे, शाही स्नानाचा आनंद घेणे, त्यांच्या वेगळ्या आणि आध्यात्मिक जगाचा परिचय करून घेत अभ्यास करणे हा जगासाठी औत्सुक्याचा विषय ठरतो आहे. त्यामुळेच महाकुंभाचे पर्व अनुभवण्यासाठी येणाऱ्या देशी-परदेशी लोकांची संख्या दरवर्षी वाढते आहे. आताही भाविकांना, अभ्यासकांना सामावून घेण्यासाठी तीर्थराज प्रयाग सज्ज असून परंपरेचे पाईक असणारा इथला समाज उच्च तंत्रज्ञानाचा हात धरून कसा पुढे जातो, खऱ्या अर्थाने नव्या-जुन्याचा संगम कसा साधतो याचे चित्र यानिमित्ताने जगापुढे साकारणार आहे.

महाकुंभ हे अमृतपुरुष भारताचे अनोखे स्वरूप आहे. या उत्सवाची पृष्ठभूमी पाहता इतिहास-पुराणांची अनेक प्राचीन पाने आपल्यासमोर उलगडतात. देवासुर, कद्रू-विनता यांच्यातील युद्ध आणि भगवान धन्वंतरीने दिलेल्या अमृत-कुंभाची प्राप्ती यासंबंधी अनेक रंजक कथांचे अध्याय कुंभाच्या कथांमध्ये आहेत. खरे तर महाकुंभ ही व्यक्तीच्या एकुणात एकात्मतेच्या विलक्षण अनुभवाची प्रयोगशाळा आहे. गंगा-यमुना-सरस्वतीचा संगम असणाऱ्या तीर्थक्षेत्र प्रयागराजमध्ये दर १२ वर्षांनी हा महान उत्सव होतो. आपल्या धार्मिक-पौराणिक भूगोलाची पवित्र भूमी असण्याबरोबरच तो आपल्या आध्यात्मिक सांस्कृतिक काळ-चेतनेचा चिरंतन पुरावाही आहे. यामध्ये आपल्याला ऋषी परंपरेने प्रेरित असणारा भारत पाहण्याची, अनुभवण्याची संधी मिळते. कुंभमेळ्यामध्ये आपण अखंड परंपरा पाहतो. प्रख्यात आचार्य, जगद्‌गुरू, महामंडलेश्वर आणि सर्व परंपरांचे संत-महंत येथे जमतात. त्यामुळेच पौराणिक महानता, आध्यात्मिक अनुभव, ऐतिहासिक वैभव, सांस्कृतिक दिव्यता आणि भौगोलिक भव्यता या सगळ्याची जोड २०२५ च्या महाकुंभाला मिळत आहे. हा योग भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतकाळात येत असल्याने अधिक महत्त्वपूर्ण आहे.

अयोध्येच्या राम मंदिरात रामललाची प्रतिष्ठापना झाल्यानंतरचा पहिला महाकुंभ असल्यामुळेही याला विशेष महत्त्व आहे. थोडक्यात, महाकुंभ हे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत स्मारक आहे, असेही म्हणता येईल. त्रिवेणी नदीच्या काठावर महाकुंभ आयोजित केला जातो. त्याच ठिकाणी त्रेतामध्ये रामाने लोककल्याणासाठी वनयात्रेची सुरुवात केली होती. तिच्या काठावर, प्रेममूर्ती भरत यांनी पुरुषार्थ चतुष्टयाचा त्याग केला आणि भक्तीची विनंती केली. त्यामुळेच प्रयाग हे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे चिरंतन स्थान आहे. अयोध्या, मथुरा, काशी, हरिद्वार, केदारनाथ, विंध्याचल यासह भारतातील दिव्य तीर्थक्षेत्रे त्यांच्या आध्यात्मिक वैभवात पुनर्संचयित केली जात आहेत. त्यामुळे महाकुंभ एकात्मिक दृष्टी, समन्वित प्रयत्न आणि पूर्ण सहकार्याचा पुरावा ठरेल.

यंदाचा महाकुंभ धार्मिक दृष्टीनेच नाही, तर आर्थिक उलाढालीचेही मोठे केंद्र आहे. त्यामुळेच तब्बल ५६ दिवस चालणारा हा कार्यक्रम केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर आर्थिक आणि व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातूनही एक अद्वितीय उदाहरण असल्याचे जाणून घ्यावे लागेल. महाकुंभच्या आयोजनासाठी राज्य सरकारने ५ हजार ४३५ कोटी ६८ लाख रुपयांचे मोठे बजेट ठेवले आहे. २०१९ मध्ये झालेल्या कुंभमेळ्याच्या ४,२०० कोटी रुपयांच्या बजेटपेक्षा हे खूप जास्त आहे. या कार्यक्रमासाठी सुमारे ७,५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या रकमेत केंद्र सरकारच्या योगदानाचाही समावेश आहे. या वेळी केंद्राने २,१०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महाकुंभ कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ४२१ प्रकल्पांवर काम सुरू आहे. त्यापैकी ३,४६१.९९ कोटी रुपयांच्या योजनांना आधीच मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये पायाभूत सुविधांचा विकास, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेपासून भाविकांसाठी सुविधांच्या व्यवस्थापनापर्यंत प्रत्येक बाबींचा समावेश आहे. एकूणच महाकुंभाचे बजेट वाढले आहे. १८८२ मध्ये महाकुंभावर केवळ २० हजार २८८ रुपये खर्च झाले होते. त्या वेळी मौनी अमावास्येला सुमारे आठ लाख लोकांनी महाकुंभात स्नान केले होते. तेव्हा भारताची एकूण लोकसंख्या २२.५ कोटी होती. १८९४ च्या कुंभमेळ्यावेळी भारताची लोकसंख्या २३ कोटी झाली आणि सुमारे १० लाख भाविकांनी कुंभात स्नान केले. या कार्यक्रमासाठी ६९,४२७ रुपये खर्च करण्यात आले होते. १९१८ च्या महाकुंभात संगमावर स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या ३० लाखांवर गेली. त्याचे बजेट १.३७ लाख रुपये होते.

काळानुरूप केवळ भाविकांचीच संख्या वाढली नाही तर कार्यक्रमाचे बजेट आणि व्यवस्थेची पातळीही वाढल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. अर्थातच हा सरकारी खर्च झाला. त्यापेक्षा सुमारे २० पट जास्त उलाढाल होत असते, हेदेखील विचारात घ्यायला हवे. आता या धार्मिक-आध्यात्मिक सोहळ्याला प्रगत तंत्रज्ञानाची साथ मिळाली आहे. भाविकांसाठी उत्तम स्वच्छता, सुरक्षित स्नान घाट, राहण्याची तात्पुरती व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, वाहतूक व्यवस्था या सगळ्यामध्ये त्याचे दर्शन घडते. महाकुंभाला येणाऱ्या कोट्यवधी भाविकांसाठी संगमाजवळ आधुनिक सुविधांनी सुसज्ज टेंट सिटी उभारण्यात आली आहे. वीज, पाणी आणि स्वच्छता या सगळ्यासाठीच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. शिवाय ड्रोन आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून मेळ्यावर लक्ष ठेवले जात आहे. महाकुंभ हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून प्रादेशिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठी चालना देतो. या कार्यक्रमामुळे पर्यटन, वाहतूक, खाद्य आणि पेय व्यवसाय, हॉटेल्स, लॉजिंग आणि स्थानिक हस्तकला उद्योगांना प्रचंड फायदा होतो. महाकुंभ २०२५ दरम्यान छोटे-मोठे दुकानदार, टॅक्सी आणि रिक्षाचालक, मार्गदर्शक, स्थानिक कारागीर यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे. अर्थात एवढा प्रचंड समुदाय एकत्र येत असल्यामुळे काही आव्हानेही उभी ठाकली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर गर्दीचे व्यवस्थापन करणे, संसर्गजन्य आजाराची भीती वाढत असताना सार्वजनिक स्वच्छता राखणे, वीज आणि पाणी पुरवठा सुनिश्चित करणे, भाविकांची सुरक्षा हे विषय प्राधान्याने समोर येणारे आहेत.

नियोजनासाठी प्रशासनाने शेकडो पथके तयार केली आहेत. कुंभकाळात आरोग्य सेवाही मोठ्या प्रमाणात बळकट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत करता येईल. महाकुंभमध्ये उपचारांसाठी ६ हजार खाटा, १२५ रुग्णवाहिका आणि अशाच हाय-टेक आरोग्य सुविधा तयार आहेत. शेवटी महाकुंभ केवळ आर्थिक आणि प्रशासकीय दृष्टिकोनातूनच महत्त्वाचा नाही, तर त्यात भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरांचेही प्रतिबिंब आहे. हा भारताची प्राचीन संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम असणारा उत्सव आहे. भारत आपला सांस्कृतिक वारसा कसा जिवंत ठेवतो आणि आधुनिकतेची जोड देऊन नव्या रूपात कशी सादर करतो, याचे जगाला औत्सुक्य आहे. महाकुंभ केवळ भाविकांनाच नाही, तर जगाला संदेश देणारा आहे. त्यामुळे तो उत्तम प्रकारे पार पाडण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाने ओळखायला हवी.

## वेध

**संजय रामगिरवार**

# वाघ खेळण्याची गोष्ट नाही!

वाघ समोर उभा ठाकला की बोबडी वळते अशी माणसंही वाघ अडचणीस दिसला की त्याचा खेळ करतात, तेव्हा कमाल वाटते. लाखांदूर तालुक्यातील तई बु. गावालगतच्या झुडपात अडकून पडलेल्या वाघाला काही तरुणांनी दगड मारले तर काहींनी त्याच्यासोबत सेल्फी काढण्याची हिंमत केली. तो अचानक सापळ्यातून सुटला असता तर या लोकांचे काय झाले असते, याची कल्पना करून बघा! परवा उमरेड येथे पर्यटनादरम्यान वाघ व बछड्यांच्या समांतर जिप्सी गाड्या ठेवून त्यांचा मार्गच अडवण्याचा प्रकार झाला. छायाचित्र आणि चित्रफीत काढण्याच्या नादात आपण वाघाशी खेळ करतो आहे, हेही पर्यटक विसरतात. एवढेच नव्हे, तर ज्यांना अशा प्रसंगी कसे वागावे याचे प्रशिक्षण दिले असते ते जिप्सीचालक व मार्गदर्शकही या गैरप्रकाराचा आनंद घेतात, तेव्हा एकूण यंत्रणेच्याच संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. वाघाचे मार्ग अडवल्याचा प्रकार ताडोबासह अन्य व्याघ्र प्रकल्पांतूनही झाला आहे. थातूरमातूर कारवाईपलीकडे पुढे काहीच होत नाही आणि या प्रकाराची पुनरावृत्ती होतच राहते, हे दुर्दैव!

६ जानेवारी रोजी भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यात झंझेरिया गावाजवळ एका वाघिणीचे चार तुकडे आढळले. याप्रकरणी तीन आरोपींना अटक झाली. विद्युत प्रवाह सोडलेल्या कुंपणात अडकून या वाघिणीचा मृत्यू झाला होता. त्यातून बाहेर काढण्यासाठी तिचे चार तुकडे केले गेले. चंद्रपूर जिल्ह्यातही असे प्रकार घडले आहेत. मानव-वन्यजीव संघर्ष आता जणू पाचवीलाच पूजला आहे. जेथे जंगल आणि वाघ तेथे मानवाशी संघर्ष अटळ आहे. चंद्रपुरात सध्या सुरू असलेल्या 'वाईल्ड कॉन-२०२५' या दोन दिवसीय परिषदेचादेखील हाच ऐरणीवरील विषय आहे. 'संरक्षित क्षेत्रांच्या बाहेरील वन्यप्राण्यांच्या मुबलक संख्येवर नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना' या विषयावर भारतातील ही पहिली परिषद आहे. या परिषदेतील तज्ज्ञांच्या मंथनातून मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याचा मार्ग निघेल, अशी आशा राज्याचे नवनियुक्त वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केली आहे. हा संघर्ष अगदी पुराणकालीन असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ऋषिमुनींच्या आश्रमात आधी वाघांचा मुक्तसंचार होता. तेव्हा कोणते तंत्रज्ञान होते, याचा शोध घेतला पाहिजे, असेही ते गमतीने ते बोलले.




पण अशा परिषदा आणि संमेलनांतून या गंभीर समस्येचा मार्ग अद्याप तरी सापडला नाही. प्रत्यक्ष कृतीशिवाय तो सापडणारही नाही. मध्यंतरी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात याविषयी गावकऱ्यांना अलर्ट करणारे तंत्रज्ञान वापरले गेले, ज्याचे कौतुक देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. पण याही पद्धतीचा किती लाभ झाला, याची आकडेवारी वनविभागाने अद्याप जाहीर केली नाही. वाघांनी मानवाच्या नरडीचा घोट घेतल्याच्या बातम्या शेकडोने प्रकाशित होतात. सोबतच विद्युत प्रवाह सोडलेल्या शेतशिवाराच्या कुंपणाला अडकून वाघाच्या मृत्यूच्या बातम्याही कमी नाहीत. कातडी व नखांसाठी शिकार अधूनमधून होत असते. याचाच अर्थ माणसं आणि वाघही प्रसंगी एकमेकांच्या जीवावर उठले असते. मागील काही दिवसांमध्ये तर हा प्रकार मोठ्या प्रमाणात पुढे येत आहे. विदर्भात तर तो जरा जास्तच आहे. यावर गंभीरतेने ठोस पाऊल उचलले जावे, याची गरज असतानाच चंद्रपुरात ही परिषद झाली. त्यातून काही होईल का, याची शाश्वती देता येत नसली तरी एक प्रयोग म्हणून त्याकडे पाहायला हरकत नाही.

गेली काही वर्षे वनमंत्री म्हणून सुधीर मुनगंटीवार यांनी हे प्रकरण संवेदनशीलपणे हाताळले. वाघ किंवा हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यात ज्यांचा जीव गेला त्यांच्या कुटुंबीयांना पुरेशी मदत मिळावी म्हणून त्यांनी त्या रकमेत मोठी वाढ केली. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापरासाठी वनाधिकाऱ्यांना त्यांनी प्रोत्साहित केले. गावकऱ्यांना अलर्ट करण्याची योजना ही त्यांच्याच कार्यकाळात राबविली गेली. आपण जंगलात घुसलो की वन्यप्राणी गावात हा संशोधनाचा विषय असला, तरी वन्यप्राण्यांची तसेच माणसांचीही संख्या वाढली आणि जमीन मात्र मर्यादितच राहिली हे मानव-वन्यजीव संघर्षाचे मुख्य कारण आहे, असा नव्या वनमंत्र्यांचा निष्कर्ष आहे आणि चंद्रपूरच्या या परिषदेतूनच त्याचा मार्ग सापडेल, अशी त्यांनी व्यक्त केलेली आशा खरी ठरो आणि ही समस्या मिटो, अशी प्रार्थना आपण करू या....

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# भविष्यातला 'पोलाद पुरुष' देवाभाऊ

देवेंद्र फडणवीस. राज्याचे मुख्यमंत्री. कुणी यांना 'चाणक्य' म्हणतं तर कुणी 'देवाभाऊ.' फडणवीस स्वतःला 'आधुनिक अभिमन्यू' म्हणतात. तब्बल पाच वर्षे महाविकास आघाडीने लावलेल्या चक्रव्यूहातून सहीसलामत बाहेर पडताना फडणवीस यांनी महाराष्ट्राला प्रचंड बहुमताचे महायुतीचे सरकार दिले. फडणवीसांच्या या कर्तबगारीने हतबल झालेले विरोधकही आता त्यांची आरती गाऊ लागले आहेत. फार मागे जायची गरज नाही. गेल्या सहा महिन्यातले दिवस आठवा. फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केल्याशिवाय विरोधकांचा दिवस मावळत नव्हता. 'फडतूस', 'टरबुजा', 'तू राहशील किंवा मी' अशा शब्दात ललकारणाऱ्या 'शिल्लक शिवसेने'च्या सुप्रीमो उद्धव ठाकरे यांनी नागपूर अधिवेशनात फडणवीसांना भेटून पुष्पगुच्छांसह शुभेच्छा दिल्या तेव्हा शरद पवारांनीही स्वतःला चिमटे काढले असतील. 'सामना' या ठाकरे यांच्या दैनिक मुखपत्रानेही फडणवीसांची प्रशंसा करणारा अग्रलेख लिहिला. कालपर्यंत फडणवीसांवर तुटून पडणारे आज संक्रांतीपूर्वीच तीळगूळ का वाटत सुटले आहेत? फडणवीस बदला घेतील असे त्यांना वाटत असावे; मात्र 'आपण त्यांना माफ केलं, हाच आपला बदला' असे जाहीरपणे सांगून फडणवीसांनी प्रतिस्पर्ध्यांना निश्चिंत केले आहे. उद्धवसेनाच नव्हे तर सुप्रिया सुळे म्हणजे शरदसेनाही फडणवीस यांच्याशी जुळवून घेऊ पाहत आहे.

फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत. या टर्ममध्ये नववर्षाची सुरुवात फडणवीसांनी गडचिरोलीला भेट देऊन केली. गडचिरोली म्हटले की, सामान्यांच्या मनात धडकी भरते. कारण नक्षलवादी जिल्हा म्हणून त्याची ओळख. सरकारी अधिकाऱ्यांच्या शब्दकोशात गडचिरोलीला बदली म्हणजे काळ्या पाण्याची शिक्षा. आज ती स्थिती नाही. नक्षलवादाचा उपद्रव तेथे जवळपास आटोक्यात आला आहे. फडणवीस तिकडे गेले त्या दिवशी ११ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. पण फडणवीसांच्या दौऱ्याची देशभर चर्चा आहे ती त्यांनी या मागास जिल्ह्याला आपल्या अजेंड्यावर घेतल्याची. गडचिरोली जिल्ह्याला देशाची 'पोलाद राजधानी' बनवण्याचे व्हिजन फडणवीसांनी १० वर्षांपूर्वी पाहिले. त्या स्वप्नाला वेग देण्याचे त्यांनी योजिले आहे. या जिल्ह्यात भरपूर खनिज संपत्ती आहे. 'स्टील सिटी' म्हणजे 'पोलाद शहर' म्हटले की, आपल्याला झारखंडमधील जमशेदपूर आठवते. जमशेदपूरलाही मागे टाकेल एवढी क्षमता गडचिरोली जिल्ह्यात आहे. तेथे खनिज काढण्याचे खूप प्रयत्न झाले. पण नक्षलवादी तोडफोड करायचे. त्यात अनेकांचे जीव गेले. उद्योगपती तेथून खनिज काढायचे. मात्र उद्योग इतरत्र करायचे. त्याला तिथल्या लोकांचा विरोध होता. फडणवीसांनी सूत्रबद्ध नियोजन केले. गडचिरोलीचा वापर वसाहतीसारखा करायचा नाही, इथल्या या भागातच उद्योग काढायचा, असा शब्द उद्योगपतींकडून घेतला. त्यांना पोलिसांचे भक्कम संरक्षण दिले. स्थानिकांना विश्वासात घेतले. त्याचे चांगले रिझल्ट्स मिळताहेत. या जिल्ह्यात नजीकच्या भविष्यात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे. ७७ वर्षांत प्रथमच या भागात बस धावली. भयमुक्त गडचिरोलीचे टार्गेट आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळावे यासाठी सध्या मंत्र्यांमध्ये रस्सीखेच सुरू आहे. या पृष्ठभूमीवर फडणवीसांनी स्वतःहून गडचिरोलीचे पालकमंत्रिपद घेण्याची इच्छा बोलून दाखवली आहे. तुम्ही लिहून ठेवा, गडचिरोली हा भविष्यात महाराष्ट्राचा महत्त्वाचा पत्ता असेल. विदर्भाचा हा सुपुत्र भविष्यात 'स्टील मॅन' म्हणजे 'पोलाद पुरुष' म्हणून ओळखला जाईल.



फडणवीसांच्या विकासाच्या संकल्पना स्पष्ट आहेत. वेगळे राज्य मागून विकास होणार नाही. त्यासाठी विकासाची कास धरावी लागेल, नवनवी गुंतवणूक आणावी लागेल हा मूलमंत्र आहे. राज्यात पायाभूत सुविधांचा वेगाने विकास केला जात आहे. समृद्धी महामार्गासह राज्यातील पायाभूत सुविधांचे जाळे मजबूत करण्यावर फडणवीस लक्ष केंद्रित करीत आहेत. वर्षानुवर्षे रेंगाळलेले रस्ते, प्रकल्प मार्गी लावले जात आहेत. वाढवण बंदर पालघर जिल्ह्यात आहे. वाढवण बंदराचा प्रकल्प ३५ वर्षे जुना आहे. फडणवीसांनी हा प्रकल्प मार्गी लावला. मुंबईच्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टपेक्षा वाढवण बंदराची क्षमता तिप्पट आहे. ७६ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प झाला तर या बंदराच्या साहाय्याने महाराष्ट्राचे राज्य सर्वात पुढारलेले राज्य बनू शकते. राज्यातले प्रकल्प गुजरातला गेले याची खूप चर्चा होते. पण राज्यात किती प्रकल्प आले, याची चर्चा होत नाही. गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्रात २२१ मोठे प्रकल्प आले आहेत. साडेतीन लाख कोटी ही गुंतवणूक असून दोन लाख रोजगार निर्माण झाले आहेत. पूर्वी मुंबई, पुणे इथेच उद्योग यायचे. आता संभाजीनगर, जालना, अमरावती ही शहरेही उद्योगपतींना आकर्षित करू लागली आहेत. अमरावतीत टेक्स्टाईल पार्क टेक ऑफ घेतो आहे. जालन्याला ड्राय पोर्ट येत आहे. कृषी सौर वाहिनी हा देशातला अभिनव प्रकल्प येत्या दोन वर्षांत पूर्ण टार्गेट आहे. तो झाला तर १६ हजार मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता निर्माण होईल. मेट्रो प्रकल्प, बुलेट ट्रेन या सारख्या प्रकल्पांमुळे महानगरांना मोकळा श्वास घेता येणार आहे. 'लाडक्या बहिणी'सारख्या योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण येईल, अशी काहींना भीती आहे. पण फडणवीसांना बजेट छान कळते. केवळ आकड्यांची जादूगिरी न करता राज्याचे उत्पन्न कसे वाढेल, यावरही त्यांचा भर दिसेल. कुठल्याही मुख्यमंत्र्याला अधिकाऱ्यांच्या जोरावरच काम दाखवता येते. त्यांनी हाताशी चारित्र्यसंपन्न अधिकारी हेरून घेतले आहेत. मंत्र्यांचे पीए तसेच इतर अधिकारी यांना तावूनसुलाखून सेवेत घेतले जात आहे. महाराष्ट्रात हे प्रथमच घडत आहे. आतापर्यंत मंत्री आपापल्या आवडीचे पीए म्हणून घेत. आता या भरतीवरही मुख्यमंत्र्यांचे लक्ष आहे. २०१४ फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना कसे जमणार? असे बोलले गेले. पण मंत्रिपदाच्या कामाचा अनुभव नसताना त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री होते. पण त्यांनाही सलग पूर्ण पाच वर्षे मुख्यमंत्री राहता आले नाही. प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर फडणवीसांनी हे कसब दाखवले. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा त्यांचा पिंड आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या महायुतीमधील घटक पक्षाच्या नेत्यांशी त्यांचे छान ट्युनिंग आहे. सर्वात मोठा गुण म्हणजे सत्याशी तडजोड त्यांना जमत नाही. त्यामुळे कोणीही त्यांना मॅनेज करू शकत नाही. १० वर्षांत त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही. 'मिस्टर क्लीन' या प्रतिमेच्या बळावर महाराष्ट्र नवी उत्तुंग झेप घ्यायला तयार झाला आहे.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.) ९८५०३०४१२३

## वाचक पत्रे

### सरकारी कार्यालयांतील सुविधा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी आचारसंहिता नुकत्याच जाहीर केल्या, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. इंग्रजीमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना 'पब्लिक सर्व्हंट' (जनतेचे सेवक) म्हणतात. प्रत्यक्षात त्यांचे कार्यालयात वर्तन 'जनतेचे मास्टर' असेच असते. कार्यालयात उशिरा येऊन लवकर जाणे, सहकाऱ्यांशी गप्पा मारणे, चहा टपरीवर सतत जाणे, कामाकरिता आलेल्यांकडे दुर्लक्ष करणे असे सर्रास पाहायला मिळते. जनतासुद्धा 'चलता है' समजून या वाईट प्रथांकडे दुर्लक्ष करते. बरेचदा संबंधित कर्मचारी सुट्टीवर असेल तर त्याचे काम दुसरा कर्मचारी करत नाही, 'साहेब सुट्टीवर आहेत, नंतर या' असे सांगून सरळ बोळवण करतात. खरे म्हणजे असे जनतेशी वागणे, गुन्हा समजून वरिष्ठावर कारवाई व्हायला पाहिजे. कार्यालयात गरजू व वरिष्ठ नागरिकांना बसायचे सोय असावी, कार्यालयात मार्गदर्शक कर्मचारी असावा; जेणेकरून लोकांचा वेळ वाचेल व त्यांची गैरसोय होणार नाही. आपल्या महाराष्ट्र राज्याचा जर जलद विकास करायचा असेल वरील साध्या आचारसंहिता प्रगत देशांप्रमाणे लागू होणे व आळशी कर्मचाऱ्यांवर अंकुश असणे गरजेचे आहे.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

●● ●●

### मतदान केंद्रांवर सुविधांमध्ये सुधारणा आवश्यक

महाराष्ट्रात नुकत्याच विधानसभा निवडणुका झाल्यात. नागपूर जिल्ह्यात जास्तीत जास्त मतदान व्हावे व ते शांततेत व्हावे या दृष्टीने प्रशासनाने योग्य कार्य केले त्याबद्दल नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदन. मतदान केंद्रांवर येणाऱ्या मतदारांना कोणतीही गैरसोय होऊ नये याकरिता प्रशासनाने प्रयत्न केले, परंतु काही महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष झाल्याचे जाणवले. नागपूर शहरातील दक्षिण-पश्चिम मतदारसंघातील मतदार केंद्र क्रमांक २३७, प्रगती हायस्कूल येथे मला काही त्रुटी आढळून आल्यात. मतदान झाल्यावर बाहेर जाण्याच्या दाराजवळ दिव्यांग लोकांकरिता पायऱ्याचे ठिकाणी सिमेंटचा स्लोप आहे. याचा उतार इतका जास्त आहे की, ज्येष्ठ व्यक्ती इथून बाहेर जाऊ शकत नाही. त्यामुळे खोलीच्या प्रवेशद्वारातूनच त्यांना बाहेर जावे लागते; परिणामतः तिथे गर्दी होऊन मतदान प्रक्रियेत अडथळा होतो. यावेळी मतदान केंद्रावर आत व बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे व खोलीत एक एलईडी लाईट लावला होता. खोलीत प्रकाश चांगला होता, परंतु तो लाईट चुकीचे ठिकाणी लावला होता. त्यामुळे जिथे बॅलेट युनिट असते त्या कक्षात उजेड फार कमी होता. हिवाळ्याचे दिवसात लवकर अंधार होतो हे जाणून प्रशासनाने मतदान कक्षात पुरेसा प्रकाश राहील, याची खात्री करणे आवश्यक होते. परंतु ते न केल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना बॅलेट युनिटवरील मतदार यांची नावे/चिन्हे शोधताना थोडा त्रास झाला. ज्याप्रमाणे प्रशासन जास्तीत जास्त लोकांनी मतदान करावे म्हणून प्रयत्नशील असते त्याचप्रमाणे प्रत्येक मतदाराचे मत त्याचे पसंतीचे ठिकाणी जावे याची प्रशासनाने दक्षता घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे. मतदार यादीची पडताळणी केल्यावर २५-२६ मृत मतदारांची नावे अजूनही यादीतून डिलीट केली नसल्याचे तसेच घर सोडून गेलेले मतदारांची नावे अजूनही यादीत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मतदान जास्त होऊनही ते कमी झाल्याचे दिसते व मतदारांची नावे डिलीट न केल्यामुळे नवीन मतदारांची घरापासून दूर असलेल्या मतदान केंद्रावर नोंद होते. आता काही दिवसांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत तेव्हा वरील त्रुटी राहू नये, ही अपेक्षा.

**मोहन पांडे**/नागपूर

●● ●●

### यशस्वी जीवनासाठी स्वामी विवेकानंदांचे विचार

१२ जानेवारी हा 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी स्वामी विवेकानंद यांची जयंती आहे. त्यांनी युवकांना आत्मसाक्षात्कार, देशप्रेम आणि परिश्रम यांवर भर देण्याचे आवाहन केले. त्यांच्या शिकवणीच्या आधारे, तरुण पिढीसमोर उभ्या असलेल्या समस्या आणि त्यावर उपाय याबाबत काही विचार मांडले आहेत, जे युवकांना सशक्त करण्यासाठी उपयुक्त ठरतात. हल्लीचे जीवन धकाधकीचे आहे, त्यातही स्वभावदोषांमुळेच अनेक समस्या निर्माण होतात, हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. यावर मात करण्यासाठी स्वामी विवेकानंद सांगतात, मनुष्याचे मनच त्याच्या बंधनाचे आणि मोक्षाचे कारण आहे. व्यक्तिमत्त्वातील म्हणजेच स्वभावदोष हेच जीवनात अडथळे निर्माण करतात. त्यामुळेच ताणतणाव निर्माण होतो. परंतु आपण याच दोषांकडे दुर्लक्ष करतो. निर्मूलनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे मनःशांती, समाधान आणि जीवनातील स्थिरता प्राप्त होऊन यशस्वी जीवन जगता येते. स्वामी विवेकानंदांच्या या विचारांना अनुसरून स्वभावदोष दूर करण्याचा प्रयत्न केल्यास जीवनात प्रत्येक टप्प्यात आनंद अनुभवता येईल.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत सामूहिक वाचन व ग्रंथ प्रदर्शन पार पडल्याचे ग्रंथपाल एस. बी.लोंढे यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी मोबाईल व पुस्तक या दोन्हीतील फरक देखील विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. मोबाईलमधील वाचन करताना डोळ्यांना त्रास होतो तर पुस्तकातील वाचन करताना डोळ्यांना त्रास होत नाही तुम्ही कुठेही असा पुस्तकाला रेंजचा प्रॉब्लेम येत नाही. पण मोबाईलला रेंजचा प्रॉब्लेम येतो. म्हणून वाचाल तर वाचाल त्याची त्यांनी जाणीव करून दिली. ग्रंथ प्रदर्शनामध्ये स्पर्धा परीक्षा पुस्तके, व्यक्तिमत्व विकासाविषयी, चरित्रात्मक पुस्तके, स्वामी विवेकानंदांचे विचारांवरील पुस्तके, थोर समाज सुधारकांची पुस्तके, विनोदी कथा, कादंबरी ठेवल्याचे लायब्ररीचे चेअरमन प्रा. पी. एस. स्वामी यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, ट्रस्टी शिवानंद पाटील तसेच कॅम्पस डायरेक्ट डॉ. एम. ए. चौगुले यांनी असे कार्यक्रम ग्रंथालयातर्फे राबविल्याबद्दल ग्रंथालयाचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## टंचाईचा आराखडा तयार

# यंदाच्या रेकॉर्डब्रेक पावसामुळे पाणीटंचाई भासणार नाही !

### उपजिल्हाधिकारी नाटेकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

जिल्ह्यातील शेतकरी बांधव व सर्वसामान्य नागरिकांना पिण्याचे पाणी, जनावरांना चारा कमी पडू नये यासाठी जिल्हा प्रशासनाचे काटेकोर नियोजन टंचाई आराखड्याच्या माध्यमातून केले असून, यंदा रेकॉर्डब्रेक पाऊसपाणी झाल्याने चोहीकडे पाणीच पाणी आहे. यामुळे जनावरांच्या चाऱ्याची आणि नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणार नसल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर यांनी आज (दि. ०९) दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना दिली.

गतवर्षी सोलापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यात अती दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने शासनाला कोट्यवधीचा खर्च करावा लागला होता. यामध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे, जिल्ह्यातील टंचाईवर मात करण्यासाठी २५० च्याहीवर पाण्याचे टँकर लागले आणि चारा टंचाईवर पर्याय म्हणून गवत बियाणे वाटपासाठी २५० कोटीच्या पुढे खर्च करण्यात आला होता. यंदा मात्र शासनाचा हा सर्व खर्च वाचणार आहे. जिल्ह्यातील सर्व धरणे, साठवण तलाव, विहिरी, नदी-नाले भरभरून वाहिले होते. इतकेच नव्हेतर उजनीही ओव्हरफ्लो झाल्याने यंदा चोहिकडे मुबलक पाणी आहे.

यंदा मृग नक्षत्रापासूनच पावसाने जोरदार सलामी दिली होती. यानंतर प्रत्येक नक्षत्रात दमदार पाऊस झाल्याने खरिपाची पिकेही जोमात आली होती. दरम्यान, जिल्ह्याच्या काही भागात जास्तीचा पाऊस झाल्याने खरिपाच्या पिकांचेही नुकसान झाले होते. दरम्यान, यंदा पडलेल्या पावसाचा रब्बी आणि उन्हाळी हंगामातील पिकांना जास्तीचा फायदा होत आहे. जिल्ह्याची वरदायिनी असलेल्या उजनी धरण ओव्हरफ्लो झाल्याने प्रचंड पाणी खाली सोडावे लागले.

> **सर्वांनीच पाण्याचा वापर काटकसरीने करावा**
>
> शेतकऱ्यांनी सगळीकडे पाणीसाठा मुबलक असल्याने त्याचा वापर वारेमाप करू नये. पिकांना मोकळे पाणी देण्यापेक्षा शक्यतो ठिबकसिंचन, स्प्रिंकलर आदींचा वापर करावा. दरम्यान, यंदा मुबलक पावसाने पाणीपातळी जवळपास दीडमीटर वर आली असून, शेतकऱ्यांच्या बोअर्सलाही यंदा चांगले पाणी येत आहे. यामुळे शेतकरी बांधवांनी यंदाही पाणी जपूनच वापरावे.
>
> **- अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी, महसूल**

# रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक, ध्वनीवर्धक वापरु नका

### जिल्हाधिकाऱ्यांनी काढला आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या परिच्छेद ५(२) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर रात्री १० वा. पासून सकाळी ६ वाजेपर्यंत करता येत नसल्याचा आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढला आहे. केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दि. १० ऑगस्ट, २०१७ रोजी ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २०१७ सुधारित अधिसूचना निर्गमित केलेली असून, सदर अधिसूचनेन्वये नियम ३ मध्ये उपनियम (५) व नियम ५ मध्ये उपनियम (३) मध्ये सुधारणा केली आहे. आता नियम ५ मधील सुधारित उपनियम (३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर वर्षातील १५ दिवसांसाठी (श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा वगळून) ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत करण्याकरिता वर्षभरातील १५ दिवस कोणते हे ठरविण्याची जबाबदारी संबंधित राज्य शासन किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या जिल्हा प्राधिकरणाची असल्याने ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरासाठी वेळेत सूट देण्याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टिप्पणीनुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादींच्या वापराबाबत श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निकडीनुसार वर्षांमध्ये १५ दिवस निश्चित करुन सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट जाहीर करण्याकरिता संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना राज्य शासनाद्वारे प्राधिकृत करण्यात आले आहे. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी सन २०२५ या वर्षातील १५ दिवस येणारे सण/उत्सव/विशेष दिना दिवशी सकाळी ६.०० ते रात्री १२.०० पर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापराकरिता परवानगी देण्याबाबत अहवाल सादर केलेला आहे.

# चंडक प्रशालेत जिल्हास्तरीय उल्हास मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

केंद्रशासन पुरस्कृत उल्हासस नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हापरिषद सोलापूरच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय उल्हास मेळावा रोजी ज.रा. चंडक प्रशाला बाळे येथे उत्साहात पार पडला.

या उल्हास मेळाव्याचे उद्घाटन मा. श्री. कुलदीप जंगम मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी मा. श्री सचिन जगताप शिक्षणाधिकारी माध्यमिक, मा. श्री. सचिन ठोकळ, संस्था सचिव ज. र. चंडक प्रशाला बाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मा. श्री कुलदीप जंगम यांनी उल्हास कार्यक्रम दालणाचे उद्घाटन केले. यावेळी सोलापूर जिल्हातील



अकरा तालुके व म. न. पा. सोलापूर अशी बारा दालने तयार करून यामध्ये साक्षरतेच्या विविध विषयासंबंधीत साहित्यांची मांडणी करून प्रदर्शन भरणवण्यात आले होते. यामध्ये डिजीटल साक्षरता, वित्तीय साक्षरता, वाचन लेखन, गणितीय संकल्पना, आर्थिक व्यवहार, इत्यादि विषयावरील अध्ययन साहित्याची मांडणी केली होती. यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दालनांतील साहित्य पाहून गौरवोद्गार काढले, आयोजनाचे व उल्हास मेळाव्याच्या आयोजणाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीम. सुलभा वटारे शिक्षणाधिकारी योजना यांनी केले. प्रास्ताविकातून केंद्रशासनाच्या नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील उल्हास अभियानाच्या प्रगतीचा मागोवा सादर केला. तसेच या कार्यक्रमात असाक्षरांना साक्षर करण्याचे सुरु असलेले प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे म्हटले. यावेळी प्रमुख उपस्थिती असणारे श्री सचिन जगताप शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी नवभारत साक्षरता कार्यक्रमात सोलापूर जिल्हा हा राज्यात अग्रेसर असल्याबाबत व त्याबददल सोलापूर जिल्ह्याचा राज्यात झालेल्या गुणगौरवाचा कौतुक केले. याप्रसंगी डॉ. प्रभाकर बुधाराम, श्री शशिकांत शिंदे डायट अधिव्याख्याता यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी नवभारत साक्षरता कार्यक्रमाचा तालुक्याचा प्रगती अहवाल संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांनी सादर केला. नवभारत साक्षरता कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणारे गटशिक्षणाधिकारी विस्तारअधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक, स्वयंसेवक व नवसाक्षरांचा प्रमानपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला गेला.

यानंतर नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत तालुकास्तरापर्यंत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या नवसाक्षर, स्वयंसेक, शिक्षक, केंद्रप्रमुख, विस्तारअधिकारी यांचे चर्चासत्र संपन्न झाले. या चर्चासत्राचे संचालन श्री.जीवराज खोबरे, श्री. संजय डोके व डॉ. नागनाथ येवले यांनी केले. या चर्चासत्रात विस्तार अधिकारी श्री. सोमशेखर स्वामी, श्री. गुरुबाळा सन्के व श्री. अमोल भंडारी यांनी प्रशासनाच्या भूमिकेतून मनोगत व्यक्त केले. अंतिम सत्रात साक्षरता कार्यक्रमाच्या आशयावर आधारित जिल्ह्यातील ११ तालुके व महानगरपालिका समूहाने बहारदार आणि दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## निधन वृत्त...

### लक्ष्मीबाई दंतकाळे

**सोलापूर,दि. ९ जानेवारी**



कर्णिक नगर, न्यू पाच्छा पेठ येथील रहिवाशी लक्ष्मीबाई गोपीचंद दांतकाळे (वय ७७) यांचे बुधवारी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, दोन मुली, नातवंड असा परिवार आहे.

### जवाहरभाई तांबोळी

**सांगोला, दि.९ जानेवारी-**



सांगोला शहरातील जवाहरभाई आप्पाभाई तांबोळी (वय ९२) यांचे गुरुवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. फारूक मेडिकल स्टोअर्सचे रऊफभाई तांबोळी यांचे ते वडील होते.

### आशाबाई राजेपांढरे

**सोलापूर, दि.९ जानेवारी**



मोहोळ तालुक्यातील शिरापुर (सो) येथील रहिवासी आशाबाई गोविंदराव राजेपांढरे यांचे वृध्दपकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८५ वर्षाच्या होत्या. त्याच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सूना, नातवंडे असा परिवार आहे.


## नावात बदल

माझे जुने नाव **गणेश राजेश यनगंटी** असे होते. ते बदलून नविन नाव **गणेश राजेशम यनगंटी** असे वाचण्यात यावे. वरील दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.

**रा. ३६३, न्यू सुनील नगर**
**सोलापूर - ४१३००६**
**ऑफि. नं. (1562/25)**
**दि. 09/01/2025**

## सोलापूर जनता सहकारी बँक लि.

मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक

'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

### जाहीर ताबा नोटीस

नियम ८(१)

**(दि सेक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अन्वये)**

तमाम लोकांस, तसेच कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्याअर्थी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम १३(२) अन्वये खालील नमूद कर्जदार, जामीनदार व गहाणकार जे की,

| शाखा, कर्जदाराचे नाव, पत्ता व जामीनदारांचे नाव | १३(२) नोटीस & रक्कम ताबा दिनांक | तारण मालमत्ता तपशील |
|---|---|---|
| **शाखा - मंगळवार पेठ, सोलापूर कर्जदार-श्री.दत्तात्रय नागनाथ शिंदे व सौ.प्रिया दत्तात्रय शिंदे,** 25/B/2, द्वारका रेसिडेन्सी, दमाणी शाळेजवळ, बुधवार पेठ, सोलापूर **जामीनदार- 1) सौ.अनिता राजेश सुलाखे 2) श्री.गौतम भानुदास बनसोडे** | 13(2) नोटीस दि.11/06/2019. रु.17,96,702/- + दि.01/06/2019 पासूनचे व्याज प्रतिकात्मक ताबा - दि.08/01/2025 | श्री.दत्तात्रय नागनाथ शिंदे व सौ.प्रिया दत्तात्रय शिंदे यांचे मालकीची जिल्हा व उप जिल्हा सोलापूर, सोलापूर महानगर पालिका हद्दीतील बुधवार पेठ येथील जागा यासी टी.पी. स्कीम नं.2, फायनल प्लॉट क्र.25/ब/2, म्युनिसिपल घर नं.193, याचे एकूण क्षेत्र 821.00 चौ.मी. यावर बांधलेल्या द्वारका रेसिडेन्सी मधील तळघर याचे क्षेत्र 89.76 चौ.मी. व तळमजल्यावरील दुकान नं.2 याचे क्षेत्र 30.20 चौ.मी. व त्यावरील बांधकामासह यांसी चतुःसीमा पुढीलप्रमाणे- पूर्वेस - रस्ता पश्चिमेस - पार्किंग दक्षिणेस - साईड मार्जिन उत्तरेस - पार्किंग |
| **शाखा - मंगळवार पेठ, सोलापूर कर्जदार- सौ.कांचन अमर भालेराव आणि श्री.अमर राजेंद्र भालेराव,** 126, मिलिंद नगर, बुधवार पेठ, सोलापूर **जामीनदार- 1) श्री.बाबा यल्लप्पा केशपागुल 2) श्री.आनंद राजेंद्र भालेराव** | 13(2) नोटीस दि. 05/11/2024 रु.16,37,020=80 + दि.01/11/2024 पासूनचे व्याज प्रतिकात्मक ताबा- दि.08/01/2025 | सौ.कांचन अमर भालेराव आणि श्री.अमर राजेंद्र भालेराव यांचे मालकीची जिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दीतील मुरारजी पेठ येथील अभिमानश्री नगर मधील मिळकत यासी टी.पी.स्कीम नं.4 फायनल प्लॉट नं.119/1/227 लेआउट नं.IIB/32 यावर बांधण्यात आलेल्या रो-बंगलो नं.2B-32 याचे एकूण क्षेत्र 70.35 चौ.मी. यात आर.सी.सी. बांधकाम क्षेत्र 41.82 चौ.मी. व त्यामधील तदंगभूत वस्तूसहची घरजागा यासी चतुःसीमा पुढीलप्रमाणे- पूर्वेस - रो-बंगलो नं.2B-33 पश्चिमेस - रो-बंगलो नं.2B-31 दक्षिणेस - रस्ता उत्तरेस - आरक्षित जागा |

यांना मागणी नोटीस पाठवून संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून 60 (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीसीनंतर आलेला भरणा वजा जाता उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उर्वरित रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा दि सेक्युरिटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेटस अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट 2002 चे कलम 13(4) अन्वये प्रतिकात्मक ताबा घेतलेला आहे.

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**दिनांक : १०/०१/२०२५**
**ठिकाण : सोलापूर**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को ऑप बँक)**

---

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**

दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र. २०२४/अभिलेख/कावि/११७२/२०२४ दि. ३१/१२/२०२४

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्री. दयानंद जगन्नाथ धुते** - **अर्जदार**
रा. अचेगांव, ता. दक्षिण सोलापूर
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाला**
**ग्रामसेवक, ग्रामपंचायत निमगाव, ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील श्री. दयानंद जगन्नाथ धुते यांनी त्याची भाऊ कै. शिवानंद जगन्नाथ धुते यांचा मृत्यू दि. १४/०५/२०१३ रोजी मौजे निमगांव, ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे दयानंद जगन्नाथ धुते यांनी त्याच्या भावाच्या मृत्यूची नोंद करुन घेऊन मृत्यु दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यूची मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३(२)(३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०५/०७/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या भावाच्या नावे शिवानंद जगन्नाथ धुते यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ३१/१२/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**

---

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**

दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र. २०२५/अभिलेख/कावि/०५/२०२५ दि. ०९/०१/२०२५

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्री. चिदानंद विठ्ठल आळंगे** - **अर्जदार**
रा. चिक्केहळ्ळी ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाल**
**ग्रामपंचायत, चिक्केहळ्ळी, ता. अक्कलकोट**
सामनेवाला

ज्याअर्थी, यातील श्री. चिदानंद विश्वल आळंगे रा. चिक्केहळ्ळी यांनी त्याचे आजोबा कै. जयवंत शंकरेप्पा न्हावी (आळंगे) यांचा मृत्यू दि. २६/०५/१९८८ रोजी मौजे चिक्केहळ्ळी, ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे श्री. चिदानंद विठ्ठल आळंगे यांनी त्याच्या आजोबांच्या मृत्यूची नोंद करुन घेवून मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ से कलम १३(२)(३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. २०/०३/२०२४ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या आजोबांच्या यांचे नावे जयवंत शंकरेप्पा न्हावी (आळंगे) यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. ०९/०१/२०२०५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**

---

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे गाताचीवाडी व परिसर, ता. बार्शी येथील जि. सोलापूर येथील लोकांस कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे गाताचीवाडी येथील हद्दीतील गट नं. ९८/१ याचे संपूर्ण क्षेत्र ०० हे.०६ आर ज्याचा ५१.५ फूट फ्रंट आहे. यांसी चतुःसिमा- पूर्वेस- विकास गात- सदर गटापैकी उर्वरित जमीन, दक्षिणेस- धनाजी कालिदास गात- गट नं. ९८/२, पश्चिमेस- विकास गात, सदर गटापैकी उर्वरित क्षेत्र व उत्तरेस- रस्ता. येणेप्रमाणे जमीन त्यातील तदंगभूत वस्तूसह.

उपरोक्त वर्णन केलेली जमीन श्री. विकास गात यांचे मालकी वहिवाटीची असून हक्कपत्रकी नांवे दाखल असलेली अशी जमीन सदर जमिनीचे मालकांनी आमचे अशिलास कायम खुषखरेदी देण्याचा ठराव करुन खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे व त्यांनी इसारा दाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर जमीन निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा संबंधित मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

तरी सदर जमिनीबाबत कोणाची हरकत असल्यास किंवा सदर जमिनी संदर्भाने गहाण, दान, लिज, लिन, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, फेडपत्र, मृत्यूपत्र, वाटप, वारसा, हिस्सा, बँक लोन, अॅटॅचमेंट, जप्ती, कोर्ट मॅटर, भाडेपट्टा, लायसेन्सी, इजमेंट, पोटगी, चोळीबांगडी, करार, मदार, विकसन इ. स्वरुपाचा तसेच या अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत मुदतीत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर जमीन ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे असे प्रामाणिकपणे गृहित धरुन आमचे अशिल सदर जमीन मालकांशी उर्वरीत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

कळावे, ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. तारीख : ०९/०१/२०२५

सही/-
**श्री. संकेत शशिकांत लकशेट्टी, अॅडव्होकेट,**
अति. जिल्हा व सत्र न्यायालय आवार, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर- ४१३४०१,
मो.नं. ७७७४९८९५९९८
(खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट)

---

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे गाताचीवाडी व परिसर, ता. बार्शी येथील जि. सोलापूर येथील लोकांस कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे गाताचीवाडी येथील हद्दीतील गट नं. ९८/२ व गट नं. ९७ याचे संपूर्ण क्षेत्र ३७८८२ चौ. फूट यांसी चतुःसिमा- पूर्वेस- धनाजी गात, दक्षिणेस- सदर गटापैकी गणेश गात, पश्चिमेस- सदर गटापैकी संतोष गात व उत्तरेस- गट नं. ९८/१ पैकी विकास गात यांची जमीन. येणेप्रमाणे जमीन त्यातील तदंगभूत वस्तूसह.

उपरोक्त वर्णन केलेली जमीन श्री. धनाजी गात यांचे मालकी वहिवाटीची असून हक्कपत्रकी नांवे दाखल असलेली अशी जमीन सदर जमिनीचे मालकांनी आमचे अशिलास कायम खुषखरेदी देण्याचा ठराव करुन खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे व त्यांनी इसारा दाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर जमीन निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा संबंधित मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

तरी सदर जमिनीबाबत कोणाची हरकत असल्यास किंवा सदर जमिनी संदर्भाने गहाण, दान, लिज, लिन, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, फेडपत्र, मृत्यूपत्र, वाटप, वारसा, हिस्सा, बँक लोन, अॅटॅचमेंट, जप्ती, कोर्ट मॅटर, भाडेपट्टा, लायसेन्सी, इजमेंट, पोटगी, चोळीबांगडी, करार, मदार, विकसन इ. स्वरुपाचा तसेच या अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत मुदतीत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर जमीन ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे असे प्रामाणिकपणे गृहित धरुन आमचे अशिल सदर जमीन मालकांशी उर्वरीत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

कळावे, ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. तारीख : ०९/०१/२०२५

सही/-
**श्री. संकेत शशिकांत लकशेट्टी, अॅडव्होकेट,**
अति. जिल्हा व सत्र न्यायालय आवार, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर- ४१३४०१,
मो.नं. ७७७४९८९५९९८
(खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट)

---

### जाहीर प्रसिद्धीकरण

**दि. कि. अर्ज नं. १०६/२०२४ नि.नं.०५**
पुढील नेमलेली तारीख १०/०२/२०२५

**बार्शी येथील मे. अपर जिल्हा न्यायाधीश यांचे न्यायालयात**
**(मा. श्री. व्ही. के. मांडे साहेब कोर्ट)**

१) **गौरी महेश्वर शेटे,** वय १० वर्षे, धंदा- शिक्षण
२) **मयुरेश महेश्वर शेटे,** वय १० वर्षे, धंदा- शिक्षण
अज्ञान अर्जदार नं. १,२ याचे अ.पा.क. चुलते
**सोमेश्वर राजकुमार शेटे,** वय ५३ वर्षे,धंदा- नोकरी,
सर्व रा. उपळाई (बु.), ता. माढा, जि. सोलापूर ह.मु. सातारा — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**महाराष्ट्र शासन** — **सा.वाला**

ज्याअर्थी अज्ञान अर्जदाराचे मालकी कबजे वहिवाटीची व ७/१२ हक्कपत्रकी नों' असलेली डि. सोलापूर सब डि. व ता. माढा पैकी मौजे उपळाई (बुद्रुक) येथील शेतजमीन गट नं. ७०/१/ब/२ क्षेत्र २ हे. ७६ आर आकार रु. ४.०० ही मिळकत आतील तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

सदरकामी अज्ञान अर्जदाराचे वडील महेश्वर व आई अलका हे दोघेही मयत आहेत. ते मयत असलेने अज्ञान अर्जदाराचे चुलते सोमेश्वर राजकुमार शेटे हेच सांभाळ, पालनपोषण, शिक्षण, दैनंदिन गरजा पाहत आहेत. परंतु हल्ली मिळकतीत गुंतवणूक करणे, उत्पन्न वाढणेकरीता सुधारणा करणे, पाण्याचा स्त्रोत निर्माण करणे याकरीता रक्कमेची गरज आहे म्हणून अर्जदाराचे अ.पा.क. चुलते यांनी विदर्भ कोकण ग्रामीण बँक शाखा उपळाई (बु.), ता. माढा यांचेकडे कर्ज मागणी केली असता त्यांनी कर्ज देण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला व मिळकत अज्ञानाचे नावे आहे. तुम्ही मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आणा असे सांगून पत्र दिलेले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदाराचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध, आक्षेप असलेस या कोणाचे काही दस्त असलेस संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमले तारीख १०/०२/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर होवून आपले हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : ०९/०१/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा गोल शिक्का)

सही/- **सहा. अधीक्षक**
जिल्हा न्यायालय, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर

---

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे गाताचीवाडी व परिसर, ता. बार्शी येथील जि. सोलापूर येथील लोकांस कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे गाताचीवाडी येथील हद्दीतील गट नं. ९७ याचे संपूर्ण क्षेत्र ६११८.१० चौ. फूट यांसी चतुःसिमा- पूर्वेस- धनाजी गात, दक्षिणेस- गणेश गात, पश्चिमेस- संताजी गात व उत्तरेस- धनाजी गात. येणेप्रमाणे जमीन त्यातील तदंगभूत वस्तूसह.

उपरोक्त वर्णन केलेली जमीन श्री. संतोष गात यांचे मालकी वहिवाटीची असून हक्कपत्रकी नांवे दाखल असलेली अशी जमीन सदर जमिनीचे मालकांनी आमचे अशिलास कायम खुषखरेदी देण्याचा ठराव करुन खरेदी देण्याचे मान्य व कबूल केलेले आहे व त्यांनी इसारा दाखल रक्कम स्वीकारलेली आहे. सदर जमीन निर्वेध, निजोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा संबंधित मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

तरी सदर जमिनीबाबत कोणाची हरकत असल्यास किंवा सदर जमिनी संदर्भाने गहाण, दान, लिज, लिन, साठेखत, खरेदीखत, बक्षीसपत्र, फेडपत्र, मृत्यूपत्र, वाटप, वारसा, हिस्सा, बँक लोन, अॅटॅचमेंट, जप्ती, कोर्ट मॅटर, भाडेपट्टा, लायसेन्सी, इजमेंट, पोटगी, चोळीबांगडी, करार, मदार, विकसन इ. स्वरुपाचा तसेच या अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांचे आत मुदतीत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत द्यावी. मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर जमीन ही निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहे असे प्रामाणिकपणे गृहित धरुन आमचे अशिल सदर जमीन मालकांशी उर्वरीत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

कळावे, ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. तारीख : ०९/०१/२०२५

सही/-
**श्री. संकेत शशिकांत लकशेट्टी, अॅडव्होकेट,**
अति. जिल्हा व सत्र न्यायालय आवार, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर- ४१३४०१,
मो.नं. ७७७४९८९५९९८
(खरेदीदारातर्फे अॅडव्होकेट)

## महत्त्वाचे

### ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये सुमित नागलचा मार्ग कठीण

**मेलबर्न :** रविवारपासून येथे सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियन ओपनच्या पहिल्या फेरीत भारताचा सर्वोच्च क्रमांकाचा एकेरी टेनिसपटू सुमित नागल झेक



प्रजासत्ताकच्या टॉमस मार्चेकशी लढणार आहे. २७ वर्षीय सुमित सध्या एटीपीमध्ये ९६ व्या स्थानावर आहे. त्याने जगातील १०४ सर्वोच्च क्रमांकाच्या खेळाडूंमध्ये स्थान मिळवल्यामुळे हंगामाच्या सुरुवातीच्या ग्रँड स्लॅमच्या मुख्य ड्रॉमध्ये स्थान मिळवले. हरयाणाच्या या खेळाडूने गत वर्षी ऑस्ट्रेलियन ओपनच्या पहिल्या फेरीत २७ व्या क्रमांकाच्या कझाकस्तानच्या ॲलेक्झांडर बुबलिकवर सरळ सेटमध्ये विजय मिळवला होता व त्यानंतर त्याला चीनच्या जुनचेंग शांगकडून पराभव पत्करावा लागला होता. सोमवारी ऑस्ट्रेलियन ओपनसाठी आयोजित ऑकलंड एएसबी क्लासिक स्पर्धेत तो लवकर बाहेर पडला. त्याला अमेरिकेच्या मिशेलसेनकडून दोन तास ४० मिनिटे चाललेल्या या संघर्षपूर्ण लढतीत ७-६ (८), ४-६, २-६ असा पराभव पत्करावा लागला. सुमितने अलीकडेच डेव्हिस चषकात देशासाठी खेळण्यास पुन्हा एकदा नकार दिल्यामुळे तो चर्चेत आला होता.

### २०२६ फिफा विश्वचषक आपला शेवटचा असेल : नेमार

**रिओ दी जानेरियो :** २०२६ चा फिफा विश्वचषक सुरू होईपर्यंत ब्राझीलचा स्टार खेळाडू नेमार ३४ वर्षांचा असेल आणि संघाच्या पात्रतेबद्दल त्याला पूर्ण विश्वास आहे. तेव्हा २०२६ फिफा विश्वचषक हा



माझा कारकीर्दीतील अखेरचा विश्वचषक असेल, असे सांगत अनुभवी आक्रमक खेळाडू नेमारने आपल्या अखेरच्या विश्वचषकासाठी संघात स्थान मिळण्याची आशा व्यक्त केली आहे. विश्वचषकाचा भाग होण्यासाठी मी कोणतीही कसर सोडणार नाही. कारण मला माहित आहे की हा माझा शेवटचा विश्वचषक असेल, माझी शेवटची संधी असेल आणि मी त्यात खेळण्यासाठी आपले शंभर टक्के योगदान देईन, असे नेमार म्हणाला. मेस्सी व सुआरेझसोबत पुन्हा खेळणे अविश्वसनीय असेल, असे तो म्हणाला. नेमार पॅरिस सेंट-जर्मेनमध्ये (पीएसजी) मेस्सीसोबत खेळला होता. ते माझे मित्र आहेत. आम्ही अजूनही एकमेकांशी बोलतो. या त्रिकुटाला पुन्हा खेळवणे मनोरंजक असेल, असे तो म्हणाला. जूनमध्ये होणाऱ्या विस्तारित क्लब विश्वचषकामध्ये अल हिलाल व मियामी दोन्ही संघ सहभागी होतील व तिथे नेमार अमेरिकन भूमीवर मेस्सी व सुआरेझविरुद्ध सामना करू शकतो.

### डॅरियस चिनायने जिंकले मास्टर ट्रॅपचे विजेतेपद

**नवी दिल्ली :** डॉ. करणी सिंग शूटिंग रेंज येथे झालेल्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत शॉटगन प्रकारच्या स्पर्धेत तेलंगणाच्या माजी राष्ट्रीय विजेत्या डॅरियस चिनायने उत्तर प्रदेशच्या नबी इक्बालला शूट-ऑफमध्ये १-० असे नमवून वरिष्ठ गटाच्या मास्टर पुरूष ट्रॅपचे विजेतेपद पटकावले. ५०-शॉटच्या अंतिम फेरीत दोन्ही नेमबाजांनी ३७ हिट्सची समान कामगिरी केली. सात वेळा माजी राष्ट्रीय विजेता व राष्ट्रकुल क्रीडा सुवर्णपदक विजेता उत्तर प्रदेशचा मुराद अली खानने अंतिम फेरीत २३ गुणांसह कांस्यपदक जिंकले. यापूर्वी, नबीने पात्रता फेरीत ९८ गुणांसह सहा जणांच्या क्षेत्रात अंतिम फेरीत आघाडी घेतली होती. चिनायने ९४ हिट्ससह तिसरे स्थान मिळवले होते. मुरादने ९३ गुणांसह चौथे स्थान मिळवले होते. सिनियर मास्टर स्पर्धेत एकूण १६ नेमबाज मैदानात होते. ट्रॅप प्रकारच्या स्पर्धेसह ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेचा समारोप होईल.

### श्रीलंका दौऱ्यासाठी मॅकस्विनीचे ऑस्ट्रेलिया संघात पुनरागमन

**मेलबर्न :** अव्वल फळीतून वगळल्यानंतर तीन आठवड्यांपेक्षा कमी कालावधीत नॅथन मॅकस्विनीला गुरुवारी श्रीलंका दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या कसोटी क्रिकेट संघात परत बोलावण्यात आले. ऑस्ट्रेलियाच्या निवडकर्त्यांनी गुरुवारी दोन कसोटी सामन्यांच्या श्रीलंका दौऱ्यासाठी आपला संघ जाहीर केला. गत आठवड्यात सिडनीमध्ये भारताविरुद्ध खेळलेल्या संघात अनेक नवीन चेहऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. ऑस्ट्रेलियाने पाच कसोटी सामन्यांची मालिका ३-१ ने जिंकली व जूनमध्ये लॉर्ड्स येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत स्थान मिळवले. नियमित कर्णधार पॅट कमिन्स सुटीवर गेल्यामुळे स्टीव्ह स्मिथ श्रीलंका दौऱ्यात ऑस्ट्रेलिया संघाचे नेतृत्व करेल.

# भारतीय महिला संघाचे आयर्लण्डविरुद्ध विजयाची लय कायम राखण्याचे लक्ष्य

## हरमनप्रीत, रेणुकाला विश्रांती ● स्मृती मंधानाकडे नेतृत्वाची धुरा





◆ **राजकोट, ९ जानेवारी**

शुक्रवारी येथे भारत आणि आयर्लण्ड यांच्यादरम्यान पहिला वन-डे क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. वेस्ट इंडीजविरुद्धच्या प्रभावी कामगिरीनंतर आता स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने आयर्लण्डविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेतही आपली विजयी घोडदौड कायम राखण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

टी-२० मालिकेत २-१ असा विजय मिळवल्यानंतर भारताने वन-डे मालिकेतही वेस्ट इंडीजचा ३-० असा धुव्वा उडवला होता. मंधाना सर्व फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा काढणारी फलंदाज ठरली. तिने वन-डे मालिकेत दोन अर्धशतकांसह १४८ धावा केल्या व टी-२० मध्ये सलग तीन अर्धशतकांसह १९३ धावा केल्या.

आता नियमित कर्णधार हरमनप्रीत कौरच्या अनुपस्थितीत मंधाना संघाचे नेतृत्व करत असताना आपल्या त्याच फॉर्ममध्ये कायम राहण्याचा प्रयत्न करेल. हरमनप्रीत कौरला वेगवान गोलंदाज रेणुका सिंगसोबत विश्रांती देण्यात आली आहे. या दोघींच्या अनुपस्थितीत हरलीन देओल, प्रतिका रावल व जेमिमा रॉड्रिग्ज यांच्यासह इतर फलंदाजांवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

देओलने वेस्ट इंडीजविरुद्धच्या वन-डे मालिकेत एका शानदार शतकासह सर्वाधिक १६० केल्या होत्या. रावल व रॉड्रिग्जनेही वन-डे सामन्यात प्रत्येकी अर्धशतकांसह अनुक्रमे १३४ आणि ११२ धावा केल्या होत्या.

गोलंदाजी विभागात, रेणुकाची अनुपस्थिती जाणवेल, कारण ती विंडीजविरुद्ध १० बळींसह आघाडीवर होती.

आता नवीन खेळाडू तितस साधू आणि सायमा ठाकोर यांच्यावर आपली छाप पाडण्याची जबाबदारी असेल.

२० वर्षीय साधूने वन-डे सामन्यात ३ व टी-२० मध्ये १३ बळी घेतले आहेत. आतापर्यंत ८ वन-डे सामन्यात ७ बळी टिपणारी २८ वर्षीय सायमा आपला फॉर्म कायम सुरू ठेवण्याचा प्रयत्न करेल. उपकर्णधार व ऑफ-स्पिनर दीप्ती शर्मा महत्त्वाची भूमिका बजावेल. प्रिया मिश्रा व तनुजा कंवर दीप्तीला सहकार्य करतील.

गॅबी लुईसच्या नेतृत्वाखालील आयर्लण्ड संघाला भारताविरुद्ध कठीण आव्हानाचा सामना करावा लागेल. अष्टपैलू ओर्ला प्रेंडरगास्ट उपकर्णधार म्हणून काम करत आहेत.

आयर्लंड संघाने आतापर्यंत खेळलेल्या १२ वन-डे सामन्यांमध्ये कधीही भारताला हरवलेले नाही. २०२३ च्या टी-२० विश्वचषकात भारताने आपला शेवटचा सामना ५ धावांनी जिंकला होता.

आमचा संघ विजयी मानसिकतेने सामन्यात उतरेल, असे गॅबी म्हणाली.

**- प्रतिस्पर्धी संघ-**

**भारत :** स्मृती मंधाना (कर्णधार), दीप्ती शर्मा (उपकर्णधार), प्रतिका रावल, हरलीन देओल, जेमिमाह रॉड्रिग्ज, उमा चेत्री (यष्टिरक्षक), ऋचा घोष (यष्टिरक्षक), तेजल हसबनीस, रघवी बिस्त, मिन्नू मणी, प्रिया मिश्रा , तनुजा कंवेर , तितस साधू , सायमा ठाकोर , सायली सातघरे.

**आयर्लण्ड :** गॅबी लुईस (कर्णधार), अवा कॅनिंग, क्रिस्टीना कुल्टर रीली, अलाना डॅलझेल, लॉरा डेलनी, जॉर्जिना डेम्पसी, सारा फोर्ब्स, आर्लेन केली, जोआना लॉफरन, एमी मॅग्वायर, लेआ पॉल, ओरला प्रेंडरगास्ट, रेमंड-होई, फ्रेयाजेंट रेबेका स्टोकेल. (वृत्तसंस्था)

# बुमराह भारतीय संघाचा पुढील कर्णधार असेल

## दिग्गज सुनील गावस्कर यांचे मत

◆ **मुंबई, ९ जानेवारी**

बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकेत अतुलनीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने असाधारण कामगिरी केली आहे. नियमित कर्णधार रोहित शर्माच्या अनुपस्थितीत त्याने अतिशय कुशलतेने संघाचे नेतृत्व केले. त्याच्या नेतृत्व गुणांमुळे मी प्रभावित झालो, त्यामुळे रोहित शर्मानंतर बुमराहच भारतीय संघाचा पुढील कर्णधार म्हणून काम करेल, असे मत भारताचे





दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी व्यक्त केले.

बुमराहने अलिकडेच ऑस्ट्रेलियामध्ये परदेशी वेगवान गोलंदाजाच्या सर्वोत्तम कामगिरीपैकी एक कामगिरी केली आणि पाच कसोटी सामन्यांमध्ये ३२ बळी घेतले.

पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर झालेल्या पहिल्या सामन्यात भारताच्या मालिकेतील एकमेव विजयातही तो संघाचा कर्णधार होता व त्यामुळे भारताला विजय मिळवून देण्यात मदत झाली.

बुमराहच भारतीय संघाची पुढीलर कर्णधार असू शकतो, कारण तो आघाडीवरून नेतृत्व करतो. पण त्याचे संघातील इतर खेळाडूंवर दबाव असणार नाही, असे मत गावस्कर यांनी व्यक्त केले.

कधीकधी असे कर्णधार असतात, जे तुमच्यावर खूप दबाव आणतात. संघातील कोणत्या खेळाडूंवर कोणती जबाबदारी आहे, याची जाणीव ठेवून तो त्या सहकाऱ्याकडून कामगिरीची अपेक्षा असते, त्यामुळे कोणावरही दबाव येत नाही, असे ते म्हणाले.

बुमराह गत काही वर्षांपासून भारतीय वेगवान गोलंदाजांचे नेतृत्व करत आहे व त्याच्या मार्गदर्शनामुळे मोहम्मद सिराजसारख्या वेगवान गोलंदाजांना वेगवान गोलंदाज म्हणून विकसित होण्यास मदत झाली आहे.

बुमराह हा वेगवान गोलंदाजांसोबतच एक हुशार कर्णधार आहे. त्याने संघ कर्णधारपदाची जबाबदारी लवकर स्विकारली, तर मला आश्चर्य वाटणार नाही, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# प्रणॉय, त्रिशा-गायत्रीचे आव्हान संपुष्टात

### मलेशिया ओपन बॅडमिंटन

◆ **क्वालालम्पूर, ९ जानेवारी**

येथे सुरू असलेल्या मलेशिया ओपन बीडब्ल्यूएफ सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेत गुरुवारी पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत भारताच्या एच. एस. प्रणॉयला चीनच्या ली शी फेंगविरुद्ध चुरशीचा सामन्यात पराभव पत्करावा लागला.

३२ वर्षीय प्रणॉयची पॅरिस ऑलिम्पिकनंतरची ही पहिलीच स्पर्धा होती. पहिला गेम गमावल्यानंतर त्याने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला, पण सरतेशेवटी त्याला ८-२१, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला. हा सामना एक तास २२ मिनिटे चालला. ली शी फेंग या स्पर्धेतील सातव्या मानांकित खेळाडू आहे.



एच. एस. प्रणॉय व त्रिशा जॉली-गायत्री गोपीचंद

भारतीय महिला दुहेरी जोडी- त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंदचे सुद्धा स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. त्यांना जिया यी फॅन व झांग शु झियान या चिनी जोडीविरुद्ध १६ व्या फेरीत २१-१५, १९-२१, १९-२१ असा पराभव पत्करावा लागला.

भारतीय मिश्र दुहेरी जोडी- ध्रुव कपिला व तनिषा क्रास्टो यांनाही त्यांचा सामना गमवावा लागला. त्यांना चिनी सातव्या मानांकित चेंग झिंग आणि झांग ची या जोडीने १३-२१, २०-२२ असे पराभूत केले. कपिला व क्रास्टोने यापूर्वी सय्यद मोदी सुपर ३०० आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता. रात्री उशीरापर्यंत सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टी ही पुरुष दुहेरी जोडी तसेच सतीश करुणाकरन आणि आद्य वरियथ ही मिश्र दुहेरी जोडी आपले सामने खेळतील. (वृत्तसंस्था)

## सूर्यकुमारने घेतले साईबाबांचे दर्शन

**शिर्डी :** भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने आपली पत्नी देविशा शेट्टी यांच्यासह शिर्डीच्या साईबाबा मंदिरात दर्शन घेण्यासाठी आला. सूर्यकुमार इंग्लंडविरुद्धच्या घरच्या मैदानावर होणाऱ्या टी-२० मालिकेत भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे. पाच सामन्यांची ही मालिका २०२६ मध्ये भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीचा एक महत्त्वाचा भाग आहे. यादव आंतरराष्ट्रीय कामगिरीसाठी सज्ज होत असताना, तो त्याच्या आयपीएल संघ, मुंबई इंडियन्स चांगली कामगिरी करण्यावरही लक्ष केंद्रित करेल.

यावेळी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गोरक्ष गाडीलकर यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी जनसंपर्क अधिकारी तुषार शेळके व सुरक्षा अधिकारी रोहिदास माळी उपस्थित होते.

# शमी पुनरागमन करण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली, ९ जानेवारी**

अनुभवी भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी इंग्लंडविरुद्धच्या आगामी व्हाईट बॉल मालिकेतून बहुप्रतिक्षित आंतरराष्ट्रीय पुनरागमन करण्याची शक्यता आहे. त्यामुळे तो २०२५ च्या चॅम्पियन्स चषकामध्येसुद्धा खेळण्याची शक्यता वाढली आहे.

शमीने भारतासाठी शेवटचा सामना २०२३ च्या वन-डे विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात खेळला होता, त्यानंतर त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यामुळे तो बराच काळ संघाच्या बाहेर राहिला. राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे वैद्यकीय पथक शमीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. एनसीएचा किमान एक फिजिओ किंवा ट्रेनर वेगवान गोलंदाजासोबत आहे. शस्त्रक्रियेनंतर त्याच्या गुडघ्यात किरकोळ सूज आली व त्यामुळे तो नुकत्याच संपलेल्या बॉर्डर-गावस्कर चषकासाठी खेळू शकला नाही. सध्या तो बंगालच्या विजय हजारे करंडक मोहिमेचा भाग आहे आणि गुरुवारी हरयाणाविरुद्ध उप-उपांत्यपूर्व सामना आहे बीसीसीआयच्या निवड समितीचे सदस्य बडोद्यामध्ये होणाऱ्या विजय हजारे करंडकाच्या बाद फेरीच्या सामन्यांना उपस्थित राहतील आणि शमीच्या कामगिरीकडेही त्यांचे बारकाईने लक्ष असेल अशी अपेक्षा आहे. शमीच्या गोलंदाजीवर फारसा परिणाम झालेला नाही व त्याच्या गुडघ्यातीही फारशी चिंता नाही, मात्र संघात परतण्यासाठी शमीला एनसीएकडून परवानगीची आवश्यकता असेल. भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह सुद्धा एनसीएकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्याची वाट पाहत आहे. सिडनीतील शेवटच्या कसोटी सामन्यात बुमराहच्या पाठीला दुखापत झाली. शमीप्रमाणेच त्यालाही एनसीएकडून परवानगीची आवश्यक असेल. (वृत्तसंस्था)

# मुलांच्या सर्वांगीण विकासामध्ये खेळ महत्वाचा : उपायुक्त मुलाणी

### मनपा मुलांची मराठी शाळेत क्रीडा स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

मनपा मुलांच्या मराठी शाळेत शालेय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. याचे उद्घाटन सोलापूर मनपाचे उपायुक्त तैमुर मूलाणी यांच्या हस्ते झाले. दोन दिवसात विविध स्पर्धा वैयक्तिक व सांघिक स्पर्धा पार पडल्या. यामध्ये कबड्डी, लंगडी, दोरी उड्या, धावण्याची शर्यत, गोळा फेक, व्यक्तिमत्व विकास स्पर्धेमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा,रांगोळी स्पर्धा त्याचे आयोजन करण्यात आले होते.





पारितोषिके प्रशासनाधिकारी हनुमंत जाधवर, बीट पर्यवेक्षक भगवान मुंढे, मुख्याध्यापक संदीप घोळवे, योगेश रंगम शाळेतील शिक्षक अर्चना मनअंकलगी, वैशाली बोते, सुवर्णा माने, म नीषा रणदिवे, प्रांजली तरंगे, सुरेश सरगम आदी उपस्थित होते.



## जाधव सोलापूर पालिकेचे क्रीडा अधिकारी

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी म्हणून भूषण जाधव हे रूजू झाले. नजीर शेख निवृत्त झाल्यानंतर हे पद रिक्त झाले होते. काही महिन्यापूर्वी महापालिकेने क्रीडा अधिकारी या पदासाठी मुलाखती घेतल्या होत्या. त्यातून त्यांची निवड झाली. ते तलवारबाजी या खेळातील शिवछत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू आहेत. त्यांचा सत्कार किकबॉक्सिंग संघटनेचे सचिव भीमराव बाळगे यांनी केला. याप्रसंगी श्रीकांत घोलप, इक्बाल शेख, धनंजय धेंडे, मनोज बाळगे उपस्थित होते. श्री. जाधव हे स्वतः खेळाडू असल्याने येणाऱ्या काळामध्ये शहरातील विविध खेळाचे क्रीडांगण व खेळाडूंचा विकास होण्यासाठी क्रीडा अधिकाऱ्याची भूमिका महत्त्वाची असल्याने क्रीडा क्षेत्राचा विकास चांगला होईल, अशी अपेक्षा सर्व क्रीडा संघटनांनी व्यक्त केली आहे.

## राज्य आंतर विभागीय आंतर क्लब लॉन टेनिस स्पर्धा आजपासून

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय आंतर विभागीय आंतर क्लब लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन येथील जिल्हा क्रीडा संकुल येथील मैदानावर १० ते १२ जानेवारी या कालावधीत सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.या स्पर्धेचे यजमानापद सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेकडे देण्यात आलेले आहे . या स्पर्धेत यवतमाळ, नागपूर, नाशिक, कोल्हापूर , संभाजीनगर व सोलापूर या ६ विभागातून ४८ खेळाडू सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा ३५ वर्षापुढील खेळाडूंसाठी असून यात फक्त दुहेरीचे सामने साखळी पद्धतीने खेळवले जातील. या स्पर्धेसाठी सामना पर्यवेक्षक म्हणून सुधीर सालगुडे तर सम



न्वयक म्हणून संध्याराणी बंडगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वरिष्ठांकडून प्रेरणा घेऊन युवकांनी लॉन टेनिस खेळाकडे वळावे हा या स्पर्धेमागील उद्देश असल्याचे जिल्हा संघटनेचे म ानद सचिव व सामना संचालक राजीव देसाई यांनी सांगितले. या स्पर्धेचे उदघाटन चेन्नई व मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती संजय गंगापुरवाला यांच्या हस्ते १० जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता करण्यात येणार आहे.


# वेळापूरचा रामजी कश्यप भारतीय खो-खो संघात

### पहिली विश्वचषक खो-खो स्पर्धा

### संघात महाराष्ट्राचे आठ खेळाडू, दोन्ही प्रशिक्षकही महाराष्ट्राचे







नवी दिल्ली : पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेसाठी निवडलेले (डावीकडून) पुरुष संघातील महाराष्ट्राचे ५ खेळाडू, महिला संघातील तिघी आणि दोन्ही भारतीय संघाचे प्रशिक्षक.

**नवी दिल्ली, दि. ९ जानेवारी**

येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये १३ ते १९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी जाहिर झालेल्या भारतीय पुरूष संघात महाराष्ट्रातील पाच तर महिला संघात तिन खो-खोपटूंची निवड झाली आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी प्रतिक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी प्रियंका इंगळेची नियुक्ती करण्यात आली आहे.

खो-खो खेळात महाराष्ट्र राज्याने संपूर्ण देशात वेगळी ओळख निर्माण केली आहे. जागतिकस्तरावरील पहिल्या स्पर्धेत महाराष्ट्रच्या खेळांडूचा दबदबा कायम राहणार आहे. नवी दिल्ली येथे झालेल्या निवड चाचणीनंतर आज भारताचे पुरूष आणि महिलांचे संघ जाहिर करण्यात आले आहे. पुरूष संघात प्रतिक वाईकर, सुरेश गरगटे, आदित्य गनपुले (पुणे), रामजी कश्यप (सोलापूर), अनिकेत पोटे (मुंबई) तर महिला गटात प्रियंका इंगळे, पुणे), अश्विनी शिंदे (धाराशिव), रेश्मा राठोड (ठाणे) यांची निवड झाली आहे. भारतीय संघात निवडले गेलेले खेळाडूंनी राष्ट्रीयस्तरावर उत्तमोत्तम कामगिरी केली आहे. तसेच पुरूष संघाच्या प्रशिक्षकपदी शिरीन गोडबोले आणि महिलांच्या प्रशिक्षकपदी प्राची वाईकर यांची निवड झाली आहे.

भारतीय संघाची निवड महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे माजी सचिव व खजिनदार गोविंद शर्मा, एम. सीतारामी रेड्डी, उपकार सिंग विर्क, सुषमा गोळवलकर, एस. एस. मलिक, डॉ. मुन्नी जून (एमडीयू), नितुल दास, वंदना पी. शिंदे, आनंद पोकार्डे तर भारतीय खो-खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल आणि सरचिटणीस पदसिध्द असलेल्या समितीने केली आहे. महाराष्ट्राच्या निवडल्या गेलेल्या खेळाडूंचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, भारतीय खो-खो महासंघाचे सहसचिव प्रा. डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

**भारतीय पुरूष संघ :** प्रतीक वाईकर (कर्णधार), सचिन भार्गो, सिवा पोथिर रेड्डी, निखिल बी., सुमन बर्मन, पाबनी साबर, सुयर गरगटे, आदित्य गणपुले, आकाश कुमार, अनिकेत पोटे, मेहूल, रामजी कश्यप, गोवथम एम. के., शुभ्रमणी व्ही, एस. रॉकसन सिंग. राखीव : अक्षय भांगरे, राजवर्धन पाटील, विश्वनाथ जानकीराम.

**महिला संघ :** प्रियांका इंगळे (कर्णधार), भिलार देवजीभाई, चैत्रा बी, अंशु कुमारी, मिनु, अश्विनी शिंदे, रेश्मा राठोड, निर्माला भाटी, निता देवी, सुभश्री सिंग, मेघी माझी, वैष्णवी बजरंग, मोनीका, नसरीन शेख, नाझी बीबी. राखीव : संपदा मोरे, रितीका सिलोरीया, प्रियांका भोपी.

### भारतीय संघात निवडलेला सोलापूरचा तिसरा खेळाडू

पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेतला पहिला भारतीय खेळाडू म्हणून वेळापूरच्या रामजी कश्यपने सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनला पहिला बहुमान मिळवून दिला आहे. याबद्दल त्याचे अभिनंदन. याअगोदर सोलापूरकडून भारतीय संघातून सत्येन जाधव व सुशांत हार यांनी दक्षिण आशियाई खो-खो स्पर्धेत भारतीय संघातून प्रतिनिधित्व केले होते.

**-महेश गादेकर, अध्यक्ष सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## नवीन वर्ष.. नवा संकल्प

### सर्वांसाठी घरे संकल्पनेवर भर



सर्वांसाठी घरे संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० ची शहरात अंमलबजावणी सुरू होत आहे. अर्ज दाखल करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व इतर आवश्यक माहितीसाठी प्रधानमंत्री आवास योजना कक्ष बांधकाम विभाग येथे संपर्क साधावा. सांगोला शहराच्या मलनि:सारण टप्पा क्रमांक १ चे काम प्रगतीपथावर सुरू आहे, लवकरच सदरचे काम पुर्ण होईल. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत पिंक (गुलाबी) ई-रिक्षा ही योजना लागू करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तरी शहरातील इच्छुक महिला व मुलींनी सदर योजनेचा माहिती व लाभ घेणेसाठी नगरपरिषद येथील राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान कक्षास भेट देऊन अर्ज दाखल करावा. कर विभागामार्फत मालमत्ता कर वसुली अभियान २०२४-२५ अंतर्गत वसुली मोहीम सुरू असून थकित मिळकत धारकांना नोटीस बजावण्याची कार्यवाही सुरू असून सर्व थकित मिळकत धारकांनी कर भरून नगरपरिषदेस सहकार्य करावे. सांगोला शहरात व्यवसायाची, वाढदिवसाची, राजकीय नेत्यांचे वाढदिवस किंवा कोणत्याही प्रकारची जाहीरात होडींग्ज, पोस्टर्स किंवा बॅनर्सवर प्रसिद्ध करावयाची असेल त्यांनी नगरपरिषदेची व पोलीस स्टेशनची रितसर परवानगी घेवूनच प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

**-डॉ. सुधीर गवळी, मुख्याधिकारी, नगरपरिषद, सांगोला**

### महिलांना देवदर्शन घडविणार



सांगोला आगारास गतवर्षी महिला सन्मान योजनेंतर्गत महिला प्रवाशांचा एसटी बसेसमधून प्रवास करण्यास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. तसेच शालेय विद्यार्थी व अहिल्यादेवी मोफत पास योजनेंतर्गत मुलींची संख्या ही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यामुळे सांगोला आगारास शासनाकडून येणाऱ्या सवलत मूल्याचा फायदा झालेला आहे. त्यामुळे नवीन वर्ष २०२५ मध्ये खास महिला प्रवासासाठी सवलतीच्या दरात देवदर्शनकरिता अक्कलकोट, तुळजापूर, शिर्डी, शनिशिंगणापूर, त्र्यंबकेश्वर, अष्टविनायक तसेच कोकण दर्शन याकरिता बसेस उपलब्ध करून देण्याचा संकल्प आहे. तसेच विद्यार्थीसाठी शालेय बसेसच्या फेऱ्या वाढवून विद्यार्थी पासमध्ये वाढ करण्यासाठी कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच प्रवाशांना व विद्यार्थ्यांना वेळेत सेवा देण्याचा प्रयत्न चांगल्या प्रकारे करण्यात येईल तरी प्रवासी व विद्यार्थी यांनी याचा लाभ घ्यावा.

**-विकास पोफळे, आगार व्यवस्थापक, सांगोला आगार**

### शेतकऱ्यांना उद्योजक बनविणार



पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती सांगोलामार्फत २०२४-२५ च्या सर्व योजना प्रभावीपणे राबवून शासनाच्या विविध योजनांचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. शेती हा जोडधंदा नसून शेतीच्या माध्यमातून विविध प्रकल्प उभा करून उद्योजकता निर्माण करता येते यासाठी शेतकरी बांधवांना पटवून देण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न राहणार आहे. सध्या पशुगणनेचे काम सुरू आहे. पशु गणनेचे काम सुरळीत पार पडल्यास अंदाजपत्रके तयार करण्यास त्याची मदत होईल. पशुसंवर्धन विभागामार्फत जनावरांचे शंभर टक्के लसीकरण, तांत्रिक कामे पूर्ण केल्यास त्याचा पशुपालक, शेतकरी बांधव व नागरिकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदा होणार आहे. त्यासाठी लसीकरण व तांत्रिक कामे १०० टक्के पूर्ण करण्याचा संकल्प पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आला आहे.

**- डॉ. अस्लम अब्दुलगणी सय्यद,**
पशुधन विकास अधिकारी (वि), पंचायत समिती, सांगोला

## बार्शीत युवकाची आत्महत्या

**बार्शी, दि. ९ जानेवारी-**

येथील शिवाजी कॉलेज रोड महाराष्ट्र बॅंकेच्या शेजारी जागेत भाडेने घेतलेल्या गाळ्यात सुरु असलेल्या रक्त लघवी तपासणी लॅब मध्ये तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने कॉलेज परिसरात खळबळ उडाली आहे. हि घटना दि ७जानेवारी सायं ६ वाजण्याचे पुर्वी घडली असल्याची दिलेल्या खबरीत म्हटले आहे. यात गणेश अंकुश नाईकवाडी (वय २५, रा. पानगाव, ता. बार्शी) असे मयत युवकाचे नाव आहे. याबाबत लहु मारुती नाईकवाडी यांनी पोलीसात खबर दिली असुन आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ठ आहे. पोलीसात अकस्मात मृत्यूची नोंद झाली असुन आत्महत्या नेमकी कोणत्या कारणाने केली याचा शोध पोलीस घेत आहे.

# माढा शहराचा पाणी प्रश्न, नगरपंचायत नवीन इमारत, माझी वसुंधरावर भर

## नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी नेहा कंठे यांचा नवीन वर्षातील नवा संकल्प

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ९ जानेवारी-**

माढा नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी नेहा कंठे यांनी ४ नोव्हेंबर २०२४ ला माढा नगरपंचायतीचा पदभार स्वीकारला आहे. त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर नवीन वर्षामध्ये माढा शहरासाठी काही नव संकल्प केला आहे. त्यामध्ये माढा शहराला सुरळीत पाणीपुरवठा, माढा नगरपंचायतीची नूतन इमारत व माझी वसुंधरा अभियानांतर्गत शहरात विविध कामे करण्याचा संकल्प केला आहे.

नेहा कंठे माढा नगरपंचायतीचा पदभार स्वीकारल्यानंतर प्रथम माढा शहराचा पाणी प्रश्न सोडवण्याला प्राधान्य दिले असून शहराला येवती तलावातून पाणीपुरवठा होतो. या पाणीपुरवठा योजनेला जवळपास तीस वर्षे पूर्ण झाल्याने पाईपलाइन ठिकठिकाणी कुजली आहे. त्यामुळे




सततच्या पाईप फुटी आणि गळतीमुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होऊन नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. कुजलेल्या पाईप लाईनसह सर्व यंत्रसामग्री बदलणे गरजेचे आहे. सत्ताधाऱ्यांसोबत आपण शासन दरबारी नवीन पाईप लाईनसह यंत्रसामग्रीची म ागणी करीत आहोत. या योजनेला तांत्रिक



मंजुरी मिळाली असून या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळणे बाकी आहे . तेही शासन स्तरावर लवकरात लवकर मिळण्यासाठी आम्ही सर्वजण काम करणार असू नवीन पाईपलाईन या योजनेला मंजुरी मिळाल्यानंतर शहराचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी लवकरच सुटणार आहे. त्याचबरोबर माढा नगरपंचायतीच्या नूतन प्रशासकीय कार्यालय इमारतीचा प्रश्न निधी मंजूर होऊन देखील जागेअभावी सुमारे दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. त्या नूतन इमारतीच्या संदर्भात देखील लवकर नूतन वास्तू उभारण्यावर भर दिला जाणार आहे. नूतन इमारतीसाठी तीन कोटी रुपयांचा निधीही मंजूर करण्यात आला आहे.

> लवकरच आयडब्ल्यूबीपी ही कर प्रणाली सुरू होत असून त्यावर देखील काम सुरू आहे. ते लवकरच माढा नगरपंचायतीमध्ये सुरू होईल. ही प्रणाली करदाता ऑनलाइन पद्धतीने वापरून आपले कर संबंधित कार्यालयाला भरू शकतो. या कर प्रणालीमुळे संबंधित विभागाच्या कामकाजात पारदर्शकता निर्माण होणार आहे.
>
> **-नेहा कंठे, मुख्याधिकारी**

परंतु नगरपंचायतीचे कार्यालय शहराच्या प्रमुख स्थानी असणे गरजेचे असल्याने नगरपंचायत प्रशासनाने माढा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या महसुल विभागाच्या २४ गुंठे जागेची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. त्याचा पाठपुरावा सुरू असुन जिल्हाधिकारी कार्यालयाने माढा तहसिल कार्यालयाकडे आपण केलेल्या मागणीचा अभिप्राय मागविला आहे. महसुली विभागाकडून ही जागा मिळाल्यास आपणास या ठिकाणी नगरपंचायतीच्या भव्य इमारतीसह, अग्नीशाम क दलाचे कार्यालयही उभारता येणार आहे.

त्यासंदर्भात योग्य पद्धतीने पाठपुरावा सुरू आहे तेही काम लवकरच मार्गी लावण्यावर आमचा भर आहे. शहरामधील वाहतुक कोंडीबाबत नागरिकांकडून तक्रारी येत असून भविष्यात अतिक्रमणविरोधी शासकीय मोहिम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बेकायदा सावकारकी करुन विनयभंग केलेल्यांवर गुन्हा दाखल करा

### न्या. एच. यू. पाटील यांचा आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ जानेवारी-**

तांबेवाडी (ता. बार्शी) येथील बेकायदा सावकारकी करुन विनयभंग करणाऱ्या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्या. एच. यू. पाटील यांनी दिले आहेत.

सदर प्रकरणी यातील हकिगत अशी की, फिर्यादी ही तांबेवाडी येथे एकटीच राहण्यास असून मजुरी करुन स्वत:चा उदरनिर्वाह करत होती. यातील आरोपी आकाश राठोड, म नीषा राठोड, विनोद राठोड, अंजना राठोड हे बेकायदेशीर सावकारी धंदा करतात. फिर्यादीने आरोपींकडून फार पूर्वी व्याजाने रक्कम घेतली होती व ते परत केलेले होते. तरी देखील आरोपी हे तुझ्याकडून अजून रक्कम येणे बाकी आहे असे म्हणून फिर्यादीस त्रास देत होते. दि.२९ फेब्रुवारी २४ रोजी सकाळी ८:३० ते ९ चे सुमारास फिर्यादी स्वत:च्या घरी स्वयंपाक करत असताना आरोपी हे घरासमोर येऊन मोठमोठ्याने ओरडत शिव्या देत होते. तेव्हा फिर्यादी घराबाहेर येऊन आरोपींना विचारले असता आरोपींनी तू आमच्याकडून व्याजाने घेतलेले पैसे आम्हाला परत दे. आमचे व्याज जास्त होत आहे, असे म्हणून फिर्यादीच्या केसाला धरुन खाली पाडले व दंडाला धरुन फरपटत ओढत अंगणात आणले. फिर्यादीचा पदर ओढून, अंगाला झोंबाझोंबी करुन, मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. आरोपींनी फिर्यादीचे तोंड दाबले व कानाखाली मारुन तिच्या गळ्यातील मंगळसूत्र तेरा ग्रॅम वजनाचे हिसकावून घेतले. फिर्यादीने आरडाओरड केली असता सर्वांनी मिळून फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व आमचे राहिलेले व्याजाचे पैसे आम्हाला दिले नाही तर तुला जीवे ठार मारेन, अशी धमकी दिली. फिर्यादीचा आरडाओरड ऐकून फिर्यादीचे आई व मावसभाऊ यांनी सोडवासोडव केली. त्यानंतर त्यांनी वैराग पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यास गेले असता पोलिसांनी तक्रार दाखल करुन घेतली नाही. एन. सी. दाखल करुन कोर्टात जाऊन परस्पर दाद मागण्यास सांगितले. म्हणून फिर्यादीने पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण व इतर पोलीस अधिकारी यांच्याकडे तक्रार दिली. परंतु पोलिसांनी आरोपींविरुद्ध कोणतीही कारवाई केली नाही. म्हणून फिर्यादीने बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्याकडे दाद मागितली असता न्यायालयाने आरोपींवर सी.आर.पी.सी. कलम १५६ (३) प्रमाणे गुन्हा नोंदविण्याचे आदेश केलेले आहेत.

फिर्यादीने ॲड. महेश जगताप यांच्यामार्फत न्यायालयात सदरील प्रकरण दाखल केले होते. न्यायालयाने विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरुन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. फिर्यादीतर्फे ॲड. महेश जगताप, ॲड. केदार पाटील, ॲड. आदित्य काकडे यांनी काम पाहिले.

# प्रेम प्रकरणाला विरोध केला म्हणून एकावर प्राणघातक हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ जानेवारी-**

प्रेम प्रकरणाला विरोध केला म्हणून एकावर कोयत्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना गुरुवारी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ घडली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

या घटनेची शहर पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, येथील नाना लिमकर हे गुरुवारी सकाळी दुचाकीवरून जात असताना छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ अमित वाठारकर हा तरुण दबा धरून बसला होता. नाना लिमकर येत असल्याचे दिसताच अमित याने लगेच दुचाकी थांबवून त्यांच्यावर कोयत्याने सपासप वार केले. ही घटना परिसरातील वाहतूक पोलिसांनी पाहताच म दतीला पोलीस धावले. पोलीस आल्पायावर अमित हा वार करून लगेचच पळून गेला. जखमी नाना लिमकर यांना उपचारासाठी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. दरम्यान अमित याच्या प्रेम प्रकरणाला नाना लिमकर यांनी विरोध केला होता.

लिमकर आणि अमित यांच्यात या अगोदर देखील वाद झाला होता. त्यामुळे मागील भांडणाचा राग मनात धरून अमित याने नाना लिमकर यांच्यावर प्राणघातक हल्ला केला असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत. शहरातील भर चौकात सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# पंढरपुरात पत्रकाराला ४३ हजार ५०० रुपयांना लुटले; अज्ञात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ जानेवारी-**

हम तुम्हारे गुरु है असे म्हणत येथील एका पत्रकारास तीन अज्ञात व्यक्तींनी बोटातील चाळीस हजार रुपये किंमतीची सोन्याची अंगठी व खिशातील रोख तीन हजार ५०० रोख रक्कम असा एकूण ४३ हजार ५०० रुपयांना गंडा घातला. या प्रकरणी येथील तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात तीन व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची तालुका पोलीस ठाण्यातून मिळालेली माहिती अशी की,८ जानेवारी २०२५ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुम ारास भटुंबरे हद्दीतील संत जनार्दन स्वामी महाराज मठासमोर पत्रकार हरिभाऊ प्रक्षाळे उभे होते.

तेव्हा पांढऱ्या रंगाच्या कारमधून तीन व्यक्ती आल्या त्यांनी प्रक्षाळे यांना हम तुम्हारे गुरु है असे म्हणत तुम हमे पहचाना नही, हमको सौ रुपये की जरूरत है दे देना असे म्हटल्यानंतर प्रक्षाळे यांनी खिशातून शंभर रुपये काढून त्यांना देत असताना तीन जणांनी हात चलाखी करून प्रक्षाळे यांच्या बोटातील साडेआठ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी किंमत ४० हजार रुपये काढून घेतली. त्यानंतर खिशातील ३ हजार ५०० असे एकूण ४३ हजार ५०० रुपयांचा एवज काढून घेतला. काही वेळानंतर प्रक्षाळे यांना आपण लुटलो गेलो असल्याचे लक्षात आले. लगेचच त्यांनी तालुका पोलीस ठाण्यात जाऊन याबाबत अज्ञात तीन व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास तालुका पोलीस ठाण्याचे हेडकॉन्स्टेबल गावडे करत आहेत.



# मॅरेथॉनमध्ये ७० वर्षीय स्पर्धकाने पटकावला प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ जानेवारी-**

बार्शीतील मॅरेथॉन स्पर्धेत ५ किलोमीटर साठ वयोगटावरील स्पर्धेम धील वय वर्ष ७० असणारे बिभीषण चौधरी यांनी भाग घेऊन सदरची स्पर्धा ३३ मिनिटामध्ये पूर्ण करुन प्रथम क्रमांक मिळवला आहे.

बार्शीमध्ये दि. ५ जानेवारी रोजी हेल्थ क्लब, बार्शी रनर्स क्लब व लायन्स क्लब टाउन यांच्यावतीने इंटरनॅशनल मॅरेथॉनचे आयोजन केले होते. सदरच्या मॅरेथॉनमध्ये देशभरातून १५०० स्पर्धक धावण्यासाठी आले होते. त्यामध्ये २१ किमीमध्ये १६५ स्पर्धक, १० किमीमध्ये ३६० स्पर्धक, ५ किमीमध्ये ४४० स्पर्धक, ३ किमी मध्ये ५५० असे १५०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी भाग घेतला होता. आयोजकांनी प्रत्येक ग्रुपमध्ये वयोगटानुसार १० बक्षीस ठेवले होते. श्री. बिभीषण चौधरी यांची यापूर्वी दोन वेळेस अंजॉग्रफी झालेली आहे. त्यांचा मुलगा डॉ. मिलिंद चौधरी यांच्या निगराणीखाली त्यांनी सदरची स्पर्धा यशस्वीरित्या पूर्ण केली.

बार्शी मॅरेथॉन संयोजकांनी त्यांना ट्रॉफी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. संयोजक टीममधील अमृत खेडकर, मंगेश बोधले, शैलेश शिंदे , सहयोग परिवारातील सदस्य, जेष्ठ विधीज्ञ करंजकर बापू यांच्या उपस्थित होते. ध्येय पक्के असेल तर त्याकरता करावी लागणारी सकारात्मक पराकाष्टा आत्मविश्वासाने केलेल प्रयत्न हे ध्येयापर्यंत पोहोचवल्याशिवाय राहत नाही असे बिभीषन चौधरी यांनी सांगितले.

# बार्शीतील बसमध्ये महिलेच्या पर्समधून ३० हजार रुपये चोरले

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ जानेवारी-**

नागोबाची वाडी येथे राहणाऱ्या अंजुम इमाम नालबंद (वय २५) या महिलेच्या पर्समधून ३० हजार रुपये चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. ७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता अंजुम व तिच्या आईने परांड्याहून बार्शीला येऊन बचतगटाच्या ऑफिसमध्ये ३१ हजार रुपयांचे कर्ज मंजूर करून घेतले होते.




इन्शुरन्स कपात करून ३० हजार रुपये त्यांना मिळाले होते, जे त्यांनी पर्समध्ये ठेवले होते. त्यानंतर, परांडा येथे परत जाण्यासाठी दोघी संकेश्वर बाग येथील बसस्टॉपवर आल्या. सायंकाळी ५ वाजता सोलापूर-परांडा बसमध्ये बसल्यानंतर तिकिटासाठी पर्समधून पैसे काढताना अंजुमला कळले की, पर्समधील पैसे गायब आहेत. त्यांनी कंडक्टरला कळवून बस थांबवली व शोध घेतला, पण पैसे मिळाले नाहीत.

अंजुमने बार्शी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत.

# मुख्य सूत्रधाराला तात्काळ अटक करा

### संतोष देशमुख हत्याप्रकरण; ॲड. विकास जाधव यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ जानेवारी-**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग (ता. केज) येथील आदर्श सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमागे असलेल्या सूत्रदारांना तात्काळ अटक करावी अशा मागण्यांसाठी सरपंच परिषदेकडून आझाद मैदानावर ठिय्या आंदोलन केले.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड यांना आरोपी केलेले नाही. तसेच या सर्व घटनेचे धागेदोरे मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे जात असल्याचे सर्वत्र बोलले जात आहे. त्यामुळे पक्षपातीपणे तपास होणे अशक्य आहे. तपास अधिकारीही संशयाच्या भवऱ्यात आहे, अशी शंका सरपंच परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव यांनी केली. दरम्यान सरपंच परिषदेच्या या आंदोलनात आष्टी पाटोदा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस, आ. सदाभाऊ खोत यांनी सहभाग नोंदवून आंदोलनास पाठिंबा दिला.

यावेळी सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव, राजीव पोतनीस, आनंद जाधव, शिवाजी मोरे, किसन जाधव, सुषमा देसले, कल्याणी पाटील, आदिनाथ देशमुख, कविता घोडके-पाटील, शिवानंद बंडे, विकास साळुंखे, पंडित मिरगणे, विकास माने, संदीप बोटे, अमोल दुरांदे उपस्थित होते.

# अ. भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाची स्थापना

## ॲड. महेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली शिंपी समाजातील पोटजातींना एकत्र आणणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ जानेवारी-**

संपूर्ण देशभरातील शिंपी समाजातील बांधवांना एकत्र आणून त्यांच्या समस्या व अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य अन्य आयोगाचे अध्यक्ष व अ.भा.संत नामदेव क्षत्रिय महासंघाचे अध्यक्ष अड्. महेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती संत नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी दिली.

मुंबई येथे अडढ. महेश ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. याप्रसंगी संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. माधव महाराज नामदास, ह.भ.प.ज्ञानेश्वार महाराज नामदास, ह.भ.प.निवृत्ती महाराज नामदास, संत नामदेव क्षत्रिय महासंघाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष नानासाहेब पाथरकर,



> **नामदास महाराजांचा आशावाद**
>
> संपूर्ण देशभरातील समाज बांधवांना एका बॅनरखाली आणण्यासाठी अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघ या माध्यमातून पुढील काळात जोमाने कार्य करेल असा आशावाद हभप नामदास महाराज यांनी व्यक्त केला.

अडह.अजय तल्हार, केशवराज संस्थेचे अध्यक्ष रुपेश खांडके, सचिव धनंजय जवंजाळ, मनोज भांडारकर (जळगाव) , नितीन बाविस्कर (शिरपूर) , गजेंद्र शिंपी (नंदुरबार) , अशोक खैरनार (मुंबई) , रुपेश बागुल (मालेगाव) यांच्या बरोबरच पंढरपूर शिंपी समाजाचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांच्यासह राज्यभरातून शिंपी सम ाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

समस्त शिंपी समाजाच्या एकत्रीकरणासाठी अ.भा.संत नामदेव क्षत्रिय एकसंघाची स्थापना संपूर्ण म हाराष्ट्रातील शिंपी समाजातील सर्व पोट जातींना एका छताखाली, एका मंचावर आणण्यासाठी करण्यात आली आहे. अडत. महेश ढवळे यांनी समाजाच्या एकत्रीकरणासाठी गेल्या दोन वर्षापासून अथक परिश्रम सुरु केले आहेत. त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळेच राज्यातील शिंपी सामाज बांधवांसाठी संत नामदेव आर्थिक विकास महामंडळाची घोषणा राज्य सरकारने केली असून या माध्यमातून समाज बांधवांना आर्थिक लाभ घेता येणार आहे. संपूर्ण देशभरातील शिंपी समाजातील नामदेव, अहिर, वैष्णव, माहेश्वबरी, भावसार, मेरू, तेलगू या पोटजातीतील सर्व समाज बांधवांना एकाच छत्रछायेखाली व एका व्यासपीठावर आणण्याचा संकल्प करण्यात आला. तसेच यावेळी शिंपी समाजातील प्रलंबित विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये पंढरपुरातील संत नामदेव मंदिराचा जिर्णोध्दार करणे, राज्य शासनाच्यावतीने उभारण्यात येणाऱ्या संत नामदेव महाराजांच्या स्मारकाचे काम लवकर सुरु करणे तसेच जुलै महिन्यात संत नामदेव महाराजांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा मोठ्या प्रमाणात साजरा करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

## संक्षिप्त वृत्त



### जिल्हा नवोपक्रम स्पर्धेत रोहिणी चौधरी प्रथम

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

पुणे येथील महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात आयोजित जिल्हा नवोपक्रम स्पर्धेत रोहिणी सचिन चौधरी प्रथम क्रमांक पटकाविला. पुरस्कार वितरण सोहळा अध्यापक विद्यालय पंढरपूर येथे संपन्न झाला. वेळापूर जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे यांच्या हस्ते हे पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी संशोधन विभागाचे प्रमुख सुभाष बुवा, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य वाघमारे, डायटच्या क्रांती कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थित होती. पंढरपूर येथे तीन दिवसीय जिल्हा नवोपक्रम व कृतिसंशोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याच्या अंतिम टप्प्यात या पुरस्कार वितरण सोहळा आयोजित केला होता. अधिव्याख्याता शशिकांत शिंदे व श्री बुधाराम, नाना पाटील तसेच शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, मुख्याध्यापिका वर्षा जेधे यांनी अभिनंदन केले.



### मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात ७५ कुपोषित बालकांची तपासणी

**मंगळवेढा, दि. ९ जानेवारी-**

मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयातील शिबिरात ७५ कुपोषित बालकांची तपासणी करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर यांच्या विशेष प्रयत्नाने राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत ग्रामीण रुग्णालय मंगळवेढा येथे कुपोषित बालकांसाठी तपासणी शिबीर पार पडले. कुपोषित बालकांची तपासणी डॉ. नीरज शहा यांनी केली. यामध्ये मंगळवेढा तालुक्यातील एकूण ७५ कुपोषित बालकांची सर्व आजारावरील तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार रक्त, लघवी, छातीचा फोटो आदी मोफत तपासण्या करण्यात आल्या. बालकांना औषधोपचार देण्यात आले. यामध्ये हृदयरोगासंदर्भात २, गतिमंद २, हाडांबाबत १, मेंदूच्या आजाराबाबत १ अशा ६ मुलांना जिल्हा रुग्णालय डीइआयसी सेंटर येथे संदर्भित करण्यात आले. शिबिरासाठी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुलोचना जानकर, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिल चौगुले, डॉ. शिरीष कुलकर्णी, डॉ. धनश्री केंदुळे, डॉ. ऋतुजा गायकवाड, औषध निर्माण अधिकारी रेश्मा सरडे, अविनाश पट्टणशेट्टी, विवेकानंद कसबे, परिचारिका सुरेखा खरात, सुनिता सातालोलू यांनी परिश्रम घेतले.

# नंदीध्वज मार्गासह विविध तीन रस्त्यांवरील अतिक्रमण हटविले

अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**





हातगाड्यासह इतर साहित्य केले जप्त

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरातील श्री सिद्धेश्वर यात्रा नंदीध्वज मार्गावरील टिळक चौक ते मधला मारुती तसेच माणिक चौक ते विजापूर वेस रस्त्यावरील आणि विमानतळ ते पार्क चौक रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले. विविध तीन कारवाईत हातगाड्यासह इतर साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत आज श्री सिद्धेश्वर यात्रा नंदीध्वज मार्गावरील टिळक चौक ते मधला मारुती तसेच माणिक चौक ते विजापूर वेस रस्त्यावरील लोखंडी, प्लास्टिक टेबल खुर्ची व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तर विमानतळ ते पार्क चौक रस्त्यावरील हातगाड्या, लोखंडी काटे, सोफा, सिंटेक्स टाकी , बॅनर व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.



# डॉ. अमिता बिर्ला यांनी घेतले श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ जानेवारी-**

लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांच्या पत्नी डॉ. अमिता बिर्ला यांनी ९ जानेवारी २०२५ रोजी श्री विठ्ठल-रूक्मिणीमातेचे दर्शन घेतले. त्यावेळी मंदिर समितीच्या वतीने त्यांचा मंदिर समितीच्या सदस्या ॲड. माधवी निगडे व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते श्रींचा प्रतिमा, दैनंदिनी व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. अमिता बिर्ला यांनी श्री विठ्ठलाचे दर्शन घेतल्यानंतर त्यांच्या डोळ्यात पाणी उभे राहीले. त्यांनी भारताचे नेतृत्व सर्व जगात मान्य होऊ दे तसेच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच देशातील सर्व नागरिकांना निरोगी व आनंददायी आरोग्य लाभो अशी आराधना केली. श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन संवर्धन कामाची तसेच भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची माहिती घेतली. त्यांनी मंदिर समितीच्या श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रातील प्रसादाचा देखील लाभ घेतला. या बरोबरच विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या परिवार देवतामधील श्री विष्णूपद मंदिर या ठिकाणीही जाऊन त्यांनी मनोभावे दर्शन घेतले.

# सीईओंच्या सूचनेनंतर जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले गाव भेट दौऱ्यावर

पंढरपूर उपकेंद्राची पाहणी करत नव्या विषाणू संदर्भात दिल्या मार्गदर्शक सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.०८ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन सर्व सामान्य नागरिकांच्या समस्या व अडचणी तातडीने सोडवाव्यात, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावभेट दौरे करून विकास कामासह प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत यांना भेटी देऊन कामकाजाचा आढावा घ्यावा, अशा सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिल्या होत्या.

त्याच सूचनेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ नवले यांनी तत्परता दाखवत तातडीने पंढरपूर व माढा तालुक्यात गाव भेट दौरे करत आपला दवाखाना, नवीन उपकेंद्र निर्मिती तसेच विकास कामांचा आढावा घेत, नव्या विषाणू संदर्भात मार्गदर्शक सूचनांची माहिती गाव पातळीवर दिली. दरम्यान, या आढावा पाहणीत नव्या विषाणू संदर्भात उपकेंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांना माहिती देताना मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे पंढरपूर तालुक्यात नव्याने बांधकाम होत असलेल्या विविध उपकेंद्रांची पाहणी केली. ग्रामीण भागामध्ये नव्या विषाणू संदर्भात जागरूकता आणि सावधानता बाळगण्यासाठी प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या वतीने सूचना जारी करण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना कसल्याही प्रकारचा त्रास होत असल्यास तात्काळ जवळच्या उपकेंद्रामध्ये उपचार घ्यावा. आजार अंगावर काढू नये यासाठी जनजागृती करण्याच्या सूचनाही यावेळी दिल्याचे सांगण्यात आले.



**जिल्ह्यात नव्याने ३२ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांची निर्मिती**

सोलापूर जिल्ह्यात नव्याने ३२ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची निर्मिती होत आहे. नव्या प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर असून, त्याकामाचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे नव्या विषाणू संदर्भात गावामध्ये जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. उपळाई येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रांची पाहणी केली. आपला दवाखाना अंतर्गत कामाचा आढावा घेऊन सतर्क व सजग राहण्याच्या सूचना केल्या.
**- डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्य अधिकारी**

# आरटीई प्रवेश शाळा नोंदणी प्रक्रिया सुरू; जिल्ह्यातून पात्र ३०० पैकी २८९ शाळांची नोंदणी

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई अंतर्गत विद्यार्थ्यांना देणार प्रवेश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जानेवारी-**

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षाच्या शिक्षण हक्क अधिनियम (आरटीई) दुर्बल वंचित घटकांसाठी २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शाळा नोंदणीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. पुढील शैक्षणिक वर्षासाठी सोलापूर जिल्ह्यातून स्वयंअर्थसाहित ३०० शाळा आरटीई प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आल्या होत्या. यापैकी २८९ शाळांनी आरटीई प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे.

या नोंदणी केलेल्या शाळातच २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यात येणार असल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यात ४८९ स्वंयअर्थसाहित शाळा आहेत. यात १८९ शाळा अल्पसंख्यांक दर्जाच्या आहेत. यातील ३०० शाळा आरटीई प्रवेशासाठी पात्र ठरविण्यात आल्या होत्या. पात्र असणाऱ्या शाळापैकी २८९ शाळांनी आरटीई प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे. शाळा नोंदणीसाठी १८ ते ३१ डिसेंबर या कालावधीत ऑनलाइन प्रक्रिया पार पडली.

**शाळांची करण्यात येणार पडताळणी**

नोंदणीनंतर शाळा पडताळणी करण्यात येणार आहे. या अनुषंगाने सर्व संबंधित शाळांनी पडताळणी करताना बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शाळा, अनाधिकृत शाळा तसेच स्थलांतरित झालेल्या शाळांबाबत प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, अशा सूचना प्राथमिक विभागाचे शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिल्या आहेत.

**आरटीईसाठी नोंदणी करण्यात आलेल्या शाळा**

अक्कलकोट-१३, बार्शी-२९, करमाळा-२६, माढा -३२, माळशिरस-४७, मंगळवेढा-११, मोहोळ-१७, पंढरपूर-४८, सांगोला- २२, उत्तर सोलापूर- १७, दक्षिण सोलापूर-०९, सोलापूर युआरसी १-०७, सोलापूर युआरसी २-११. एकूण-२८९.

# वैरागमध्ये बैलावर वाघाचा हल्ला

तिसऱ्या घटनेने नागरिक भयभीत; दिवसा वीजपुरवठा करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ९ जानेवारी-**





महिन्या भरापूर्वी बार्शी तालुक्यात बिबट्याचे दर्शन झाले. त्या पाठोपाठच वाघाचेही आगमन झाले. सध्या वैराग भागात एकीकडे वाघ व दुसरीकडे बिबट्या आढळल्याने वैराग भागातील नागरिक दहशतीखाली वावरत आहे. वैराग भागात सोमवारी रात्री मुंगशी (आर ) येथे दोन वासरावर वाघाने हल्ला केला.

दुसरा हल्ला राळेरास येथे एका गाईच्या वासरावर तर सासुरे येथे रेडकावर हल्ला करून ठार केले. सलग तिसऱ्या दिवशी वैराग शहराजवळ एका शेतात बांधलेल्या बैलाच्या पायाचा लचका घेऊन जखमी केले आहे. राळेरासमध्ये वाघ आढळल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. सध्या शेतीचा वीजपुरवठा सायंकाळी ४ ते रात्री १२ असा आहे. रात्री शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेल्यावर वाघाचा शेतकऱ्यांवर हल्ला होण्याचा धोका आहे. तरी परिसरातून वाघ इतरत्र जोपर्यंत जात नाही तोपर्यंत शेतीचा वीजपुरवठा दिवसा उपलब्ध करण्याची मागणी राळेरास ग्रामस्थांनी वैराग वीज वितरण कार्यालयाकडे केली आहे. आत्तापर्यंत बार्शी तालुक्यात बिबट्या व वाघाच्या हल्ल्यात बाधित झालेल्या जनावरांच्या मालकास मोबदला मिळण्यासंदर्भात वरिष्ठ कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्यांचे अनुदान मंजूर झाल्यावर त्यांच्या शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले जाईल असे अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.

**वाघाला पकडण्याची मागणी**

गुरुवारी सकाळी पिकाला पाणी देण्यासाठी शेतात आल्यावर ओल्या मातीत मोठे ठसे दिसले. त्यावर लगेच बैलाकडे गेलो असता बैल्याच्या पाय जखमी झाल्याचे दिसले. माझ्यासह इतर शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी वन विभागाने वाघाला लवकर पकडावे, अशी मागणी शेतकरी विनायक खेंदाड यांनी केली आहे.

# ट्रकच्या धडकेत मुख्याध्यापकाचा मृत्यू, एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ९ जानेवारी-**



मोहोळ कडे स्कुटीवर येणाऱ्या दोघांना पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या मालट्रकने धडक दिल्यामुळे जि. प. शाळेत मुख्याध्यापक असलेल्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला तर पाठीमागील इसम गंभीर जखमी झाला. हा अपघात गुरुवारी दि.९ जानेवारी रोजी यावली जवळ सकाळी पावणेदहा वाजता घडला.

राजेंद्र सुखदेव कारंडे (वय ५७, रा. यावली, ता. मोहोळ) असे मृताचे नाव आहे. राजेंद्र कारंडे हे कोळेगाव (ता. मोहोळ) येथे मुख्याध्यापक म्हणून जिल्हा परिषद शाळेमध्ये काम करत होते. ते आपल्या स्कुटी गाडी (क्र. एम. एच./ १३ सी. वाय. ४१७०) वरून मोहोळकडे निघाले होते. त्यांच्या पाठीमागे विजय नामदेव राऊत (वय ६५, रा. यावली, ता. मोहोळ) हे बसले होते. त्यांच्या गाडीच्या पाठीमागूनच मोहोळकडे जाणारी मालट्रक (क्र. के. ए ५६/ ५६२५ येत होता. ट्रकने या स्कुटीला मागून जोराची धडक दिली. त्यामुळे राजेंद्र कारंडे हे खाली पडले आणि त्यांच्या अंगावरून ट्रकचे चाक गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला तर पाठीमागे बसलेले विजय नामदेव राऊत हे गंभीर जखमी झाले असून त्यांना सोलापूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मृत कारंडे हे मोहोळ येथील दंत रोग तज्ज्ञ रोहित कारंडे यांचे वडील होते. याची फिर्याद यावलीचे माजी सरपंच समाधान कारंडे यांनी दिली. मोहोळ पोलीस ठाण्यात ट्रकचालक वाहिद जाफरसाब (रा. निथूर, जि. बीदर, कर्नाटक) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पती-पत्नीच्या निधनाने वाढेगावकर शोकसागरात बुडाले

पतीच्या विरहाने पत्नीने गळफास घेऊन केली आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.९ जानेवारी-**



पतीच्या निधनानंतर तिसऱ्या दिवसाचा विधी होण्यापूर्वीच पत्नीने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची घटना वाढेगाव (ता. सांगोला) येथे घडली. या पती-पत्नीच्या निधनाने वाढेगावकर शोकसागरात बुडाले आहेत.


याबाबत अधिक माहिती अशी, वाढेगाव येथील निखिल दिगंबर घोंगडे (वय २६) याचे मंगळवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या तिसऱ्या दिवसाचा विधी गुरुवारी सकाळी ७.३० वा. वाढेगाव येथे होणार होता. मात्र त्यापूर्वीच निखिल घोंगडे याची पत्नी अनिता निखिल घोंगडे (वय २३) हिने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. पती-पत्नीच्या अचानक निधनामुळे वाढेगावसह सांगोला तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

**नवदांपत्यांवर आली श्रद्धांजली वाहण्याची वेळ**

निखिल घोंगडे हा एका खाजगी दूध संघात अधिकारी पदावर कार्यरत होता. मनमिळावू स्वभावामुळे सर्वत्र लोकप्रिय होता. निखिल घोंगडे व अनिता घोंगडे यांचा विवाह ५ डिसेंबर रोजी पार पडला व त्याचा विवाह स्वागत समारंभ ८ डिसेंबर रोजी वाढेगाव येथे मोठ्या थाटामाटात पार पडला. एक महिन्याच्या आतच घोंगडे या नवदांपत्यावर श्रद्धांजली वाहण्याची वेळ आल्याने सर्वत्र दु:ख व्यक्त होत आहे.

भागवत उमामंदिर
आजपासून भव्य प्रारंभ


12.30 PM | 03.30 PM 09.30 PM | 06.30 PM
Book The Ticket At BookMyShow
तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

WILDWISE RELESA
श्रीनिवास सिनेमॅटिक जेलरोड जवळ, सोलापूर
Book The Ticket At BookMyShow
आजपासून ग्रॅन्डगाला ओपनिंग
रामचरण & शंकर डायरेक्शन ॲक्शन तेलगु चित्र


स.९॥,१२॥,३॥,६॥,९॥ वा
थियटवर दिवसभर ॲडव्हान्स बुकींग चालु आहे ग्रुप बुकिंगसाठी कॉल करा
7028810756,9970003525

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## १६ वर्षीय मुलीची गळफास घेवून आत्महत्या

**तभा वृत्तसेव**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

नई जिंदगी नागनाथ नगरातील १६ वर्षीय मुलीने अज्ञात कारणावरून गळफास घेवून आत्महत्या केली आहे. ही घटना बुधवारी रात्री आठच्या सुमारास उघडकीस आली आहे.

फरजाना तौफिक अन्सारी (वय १६) असे गळफास घेतलेल्या मुलीचे नाव आहे. ती दहावीच्या वर्गात शिकत होती. बुधवारी दुपारी शाळेतून घरी आली. घरातील सर्व कामे केली. मात्र सायंकाळी सहाच्या सुमारास राहत्या घरात अज्ञात कारणावरून साडीच्या सहाय्याने पत्र्याच्या अँगला गळफास घेतला. ही घटना नातेवाईकांना कळाल्यानंतर तीस गळ फासावरून खाली उतरवले. बे शुध्द अवस्थेत भाऊ जमीर शेख यांनी सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. ती उपचारापूर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.या घटनेची माहिती डॉ. आकाश माने यांनी दिली असून त्याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे. मयताच्या मागे आई वडील, १भाऊ,दोन बहिणी असा परिवार आहे.

## ▶▶क्राईम वृत्त...

### बसमधील गर्दीचा फायदा घेत ३८ ग्रॅम दागिने लंपास

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

एसटी बसने प्रवास करीत असताना बसमधील गर्दीचा फायदा घेत महिलच्या बॅग मधील ३८ ग्रॅम,सोन्याचे दागिने लंपास केले. ही घटना ६ जानेवारी रोजी बाराच्या सुमारास सोलापूर एसटी स्टँड येथे घडली आहे. किर्ती प्रविण बिराजदार (वय २४ रा.बनशंकरी नगर शेळगी सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलिसांत बुधवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. किर्ती बिराजदार या सोलापूर ते धुळ खेडा एसटीने प्रवास करीत होत्या. प्रवास करीत असताना बसमध्ये गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत कोणीतरी अज्ञात चोरट्याने महिलेच्या काळ्या व हिरव्या रंगाच्या बॅगमध्ये ठेवलेले ३५ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र व ३ ग्रॅम सोन्याचे कानातील टॉप्स असे एकुण १ लाख दहा हजाराचा ऐवज लंपास केला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार पाडवी करीत आहेत.

### ड्रममध्ये लिक्विड टाकल्याने पाचजणांना श्वासचा त्रास

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

ॲसिडच्या ड्रममध्ये कपडे धुण्याचे आला लिक्विड टाकले, उग्र वासाने पाच कर्मचाऱ्यांना श्वास घेण्यास त्रास होवू लागल्याने उपचारासाठी सिव्हिल रुग्णालयात गुरुवारी सकाळी दाखल केले होते. ही घटना गुरुवारी सकाळी अकरा वा. अक्कलकोट येथील होम हार्डवेअर स्टिल सेंटर मध्ये घडली आहे. अविनाश लक्ष्मीपुत्र श्रीगणी (वय २०), योगेश बसवराज सुतार (वय २२) ,कमलेश तुकाराम कोलारी (वय २८) , विपुल अनिल क्षीरसागर (वय २६) ,मारुती दत्तात्रय भोसले (वय १७,सर्व रा. अक्कलकोट) श्वास घेण्यास त्रास झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे आहेत. ही सर्व कर्मचारी गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास अक्कलकोट येथील ओम हार्डवेअर स्टिल सेंटरमध्ये येथे करतात काम करीत होते. काम करीत असताना ॲसिडच्या ड्रममध्ये चुकून विपुल क्षीरसागर याने कपडे धुण्याचे आला लिक्विड घातले, त्या वासाने सर्व कर्मचाऱ्यांना मळमळ, श्वास घेण्यास त्रास होवू लागला. त्यांना सरकारी दवाखाना अक्कलकोट येथे उपचार करून पुढील उपचारास रेफरने सिव्हिल रुग्णालयात दुपारी सव्वा एकच्या सुमारास दाखल केले आहे.

### लक्ष विचलित करून २० हजारांचा बंडल लंपास

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

वीज बिल भरणा करून घेणाऱ्या कर्मचाऱ्याचे लक्ष विचलित करून कॉउंटरमधील २० हजाराचा बंडल लंपास केला आहे. याप्रकरणी एका अज्ञाताविरुध्द एमआयडीसी पोलिसांत बुधवारी रात्री गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना बुधवारी सकाळी दहाच्या सुमारास एमएसइडीएल एमआयडीसी सेक्सन ऑफिस, एमएसईबी ऑफिस शेजारी,एमआयडीसी रोड सोलापूर याठिकाणी घडली आहे. याबाबत श्रीकांत राजेश खुनी (वय २० रा. राजरत्न नगर,निलम नगर एमआयडीसी सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी श्रीकांत हे विज बिल व टेलिफोन बिल भरण करतात. भरणा करत असताना अचानक एक अज्ञात व्यक्ती फिर्यादीच्या केबिनमध्ये आला. मुला सुट्टे पैसे पाहीजे अशी विचारणा केली.त्यावेळी फिर्यादीने त्यास ५० रुपयांचे सुट्टे पैसे दिले. तो अज्ञात व्यक्ती थोडा वेळा बाहेर थांबला व परत केबिनच्या आत प्रवेश केला. फिर्यादी हा काऊंटरवरती विजबील भरणा करून घेत होते. त्या इसमाने फिर्यादीचे लक्ष विचलित करून काऊंटरमधील जमा झालेले ५०० रुपयांचा ४० नोटांचा बंडल असा एकुण २० हजार चोरून नेली आहे.

### व्याजाचे पैसे देण्याच्या कारणावरून एकास मारहाण

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

व्याजाचे पैसे देण्याच्या कारणावरून एकास पाच जणांनी मिळून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आहे. त्याच्या सर्वांगास मुक्कामार लागल्याने उपचारासाठी सिव्हिल रुग्णालयात दाखल केले आहे.सोमनाथ शिवानंद हत्तुरे (वय ३५ रा.होटगी गाव)असे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. ही घटना बुधवारी रात्री साडे नऊच्या सुमारास होटगी गावातील तळ्याजवळ घडली आहे. सोमनाथ हत्तुरे हे बुधवारी रात्री साडे नऊच्या सुमारास होटगी गावातील तळ्याजवळ होते. तरी व्याजाचे पैसे देण्याच्या कारणावरून आनंद जाधव व इतर पाच जणांनी मिळून सोमनाथ यास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्याच्या सर्वांगास मुक्कामार लागल्याने रात्री बाराच्या सुमारास पत्नी पूजा हत्तुरे यांनी सिव्हिल रुग्णालयात दाखल केले.

# दुहेरी जलवाहिनीसाठी शासनाकडून ८९ कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्याचे आदेश

**● हिवाळी अधिवेशनात आ. देवेंद्र कोठे यांनी मांडला होता पाण्याचा प्रश्न, अखेर पाठपुराव्याला यश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

सोलापूर शहरवासीयांच्या पिण्याच्या पाण्यासाठी उजनी ते सोलापूरपर्यंत बनवण्यात येत असलेल्या दुहेरी जलवाहिनीच्या कामाच्या पूर्ततेकरिता ८९ कोटी २९ लाख रुपयांचा निधी वितरित करण्याचे आदेश नगर विकास विभागाने काढले आहेत. आमदार देवेंद्र कोठे यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

हिवाळी अधिवेशनात आमदार देवेंद्र कोठे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सभागृहात मांडला होता. उजनी धरण सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी असून देखील सोलापूर शहराला आठवड्यातून केवळ एकदा पाणी मिळत आहे. सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी टाकण्यात येत असलेल्या दुहेरी जलवाहिनीच्या ११० किमीच्या कामापैकी १०६ किमी जलवाहिनीचे काम पूर्ण झाले असून केवळ ४ किमीचे काम शिल्लक राहिले आहे. मनपाने अद्याप जलशुद्धीकरण केंद्राची जागा ताब्यात घेतलेली नाही. राष्ट्रीय महामार्ग तसेच अन्य कारणांमुळे हे काम थांबल्याचे महापालिका सांगत



आहे. त्यामुळे हे काम लवकरात लवकर पूर्ण करून शहराला नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत प्रयत्न करावेत, अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.

यानंतर आमदार देवेंद्र कोठे यांनी महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांची भेट घेऊन जलवाहिनीचे काम पूर्ण होण्याकरिता असलेल्या अडचणींबाबत माहिती घेऊन त्या शासनापर्यंत पोहोचविल्या होत्या. याकामी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनीही शासनाकडे पाठपुराव्यासाठी सहकार्य केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नाबाबत बैठक घेऊन वित्त सचिवांना उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीसाठी निधी वितरित करण्याचे आदेश दिले होते. गुरुवारी निधी वितरित करण्याबाबतचा आदेश महाराष्ट्र शासनाने काढला आहे. शासनाने दिलेल्या या निधीमुळे दुहेरी जलवाहिनीच्या पूर्णत्वास मोठी गती मिळणार आहे.

**वचनपुर्ततेशिवाय माघार नाही**



सोलापूरच्या सर्वांगीण विकासाचे वचन आम्ही शहरवासीयांना दिले आहे. सोलापूरच्या पिण्याच्या पाण्यासह इतर सर्व नागरी प्रश्नांची सोडवणूक करण्यास प्राधान्य राहील. याकामी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे सहकार्य लाभले, असे आ. देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

**पाणीदार आमदार - विकास दमदार**

आमदार देवेंद्र कोठे यांनी निवडणुकीत शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याचे आश्वासन सोलापूरकरांना दिले होते. दिलेला शब्द पाळत आमदार देवेंद्र कोठे यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करून उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीसाठी ८९ कोटी २९ लाख रुपयांचा निधी खेचून आणला. पाणीदार आमदार देवेंद्र कोठे यांची कामगिरी दमदार आहे,अशी प्रतिक्रिया नागरिक गणेश बुऱ्हाणपुरे यांनी दिली.



## पान टपरीत बंदी असलेल्या तंबाखूची विक्री करणाऱ्या तिघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

गुटखा,पान मसाला व सुगंधीत तंबाखू विक्रीस बंदी असतानाही विक्री करणाऱ्या पान टपरीवर अन्न औषध प्रशासन विभागाकडून धाडी टाकून कारवाई केली आहे. याप्रकरणी तिघांवर जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.

ही कारवाई बुधवारी दुपारी चार ते सहाच्या सुमारास कुंभार वेस,मड्डी वस्ती सोलापूर या ठिकाणी करण्यात आली. कारवाई दरम्यान १९हजाराचे पान मसाला,सुगंधी तंबाखू आढळून आला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे सहा आयुक्त रेणुका पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महतेश सिद्राम गुब्याडकर (वय ४० रा. शेळगी रोड,भवानी पेठ सोलापूर),यल्लप्पा उर्फ राहुल शाहु सौदागर (वय ५६ रा. शाहीर वस्ती भवानी पेठ), सुमीत बाबू राठोड (वय २१ रा. नेहरू नगर विजापूर रोड) यांच्यावर जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वरील आरोपींनी पान टपरीमध्ये प्रतिबंधित पान मसाला व सुगंधी तंबाखू अर्थिक फायद्यासाठी, विक्रीसाठी साठा करून ठेवला होता. तरी आरोपींनी गुटखा, पानमसाला,व सुगंधी तंबाखू साठवणूक व विक्रीसाठी बंदी आदेशाचा भंग केला म्हणून गुन्हा नोंद झाला आहे. या प्रकरणाचा तपास सहा पोलिस निरीक्षक पडसळकर करीत आहेत.

## मिळकतकर थकबाकीपोटी १२ नळ कनेक्शन तोडले

**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

सोलापूर महापालिका मिळकतकर संकलन विभागाकडून मिळकतकर वसुलीसाठी धडक कारवाई मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत गेल्या दोन दिवसापासून संबंधित पथकांनी १२ नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई केली आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत दि. ८ जानेवारी रोजी न्यू एरिया मधील दोन नळ तर न्यू तिऱ्हेगाव भागातील ३ नळ कनेक्शन तोडण्यात आले आहेत. तर आज गुरुवार दि. ९ जानेवारी रोजी उत्तर सदर बाझार भागातील सात नळ कनेक्शन थकबाकी पोटी तोडण्यात आले आहेत. थकबाकी वसुलीसाठी ही कारवाईची मोहीम महापालिकेच्या विविध पथकांकडून सुरूच राहणार आहे. महापालिका मिळकतकर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून विविध पथकाद्वारे ही कारवाई करण्यात येत आहे. सोलापूर शहरातील थकबाकीदारांनी आपला मिळकत कर भरून कटू कारवाई टाळावी. महापालिका प्रशासना सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.



## मिशन अयोध्याचे मंत्रमुग्ध करणाऱ्या चित्रपटाचे भव्य प्रदर्शन

**● २४ जानेवारीला सोलापूरसह राज्यात १०० ठिकाणी प्रदर्शित होणार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

'मिशन अयोध्या' हा चित्रपट शुक्रवार २४ जानेवारी २०२५ रोजी सोलापूरसह महाराष्ट्रातील विविध १०० चित्रपटगृहात प्रसिद्ध होणार आहे, अशी माहिती दिग्दर्शक समीर सुर्वे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यासंदर्भात माहिती सांगताना ते म्हणाले, अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या ऐतिहासिक निर्मितीनंतर भारतातील रुपेरी पडद्यावर प्रभू श्रीरामांची महिमा उलगडणारा पहिला चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून अयोध्येतील प्रभू श्रीरामांना प्रेक्षकांना पाहण्याची संधी पहिल्यांदाच रसिकप्रेक्षक आणि महाराष्ट्रातील रामभक्तांना मिळणार आहे. अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या मंदिराची स्थापना झाल्यानंतर भारतातील कोणत्याही चित्रपटाचे चित्रीकरण तेथे झाले नसून ही निर्माते कृष्णा दादाराव शिंदे, योगिता कृष्णा शिंदे त्यांच्या आर के योगिनी फिल्म्स प्रॉडक्शन प्रा. लि. निर्मित 'मिशन अयोध्या' या चित्रपटाद्वारे उपलब्ध झाली आहे. भारतीय इतिहास, संस्कृती आणि आध्यात्मिकतेचा अभूतपूर्व संगम असलेल्या या चित्रपटामुळे प्रेक्षकांना प्रभू श्रीरामांच्या अयोध्येचे मनोहारी दर्शन महाराष्ट्रातील चित्रपटगृहांतून होणार आहे. चित्रीकरणाचा अनुभव वर्णन करताना सुर्वे म्हणाले, ''अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिराच्या पवित्र परिसरात चित्रीकरण करणे हे केवळ माझ्यासाठी नव्हे, तर संपूर्ण युनिटसाठी एक अभूतपूर्व अनुभव ठरला.

विषम तापमानाच्या आव्हानांवर मात करत, त्या पवित्र भूमीत चित्रीकरण करताना प्रत्येक क्षण प्रेरणादायी होता. मंदिराच्या भव्य वास्तुशिल्पाचा प्रत्येक कोपरा, वातावरणातील अलौकिक शांतता, आणि राम नामाचा गजर आमच्या हृदयाला स्पर्शून गेला. 'मिशन अयोध्या' हा चित्रपट केवळ एक कथा सांगणारा नाही, तर प्रभू श्रीरामांच्या अनंत भक्तीसाठी समर्पित एक आध्यात्मिक प्रवास आहे. मला विश्वास आहे की हा चित्रपट प्रेक्षकांना प्रभू श्रीरामांच्या चरणांशी आत्मीयतेने जोडेल आणि त्यांच्या जीवनात सकारात्मकता निर्माण करेल.''

या पत्रकार परिषदेस राम कोंडीलकर, चित्रपटील व्यक्तिरेखा कारसेवक विचारे, विठ्ठल बडगंची आदी उपस्थित होते.






सोलापूर : 'मिशन अयोध्या' या चित्रपटाचे दिग्दर्शक समीर सुर्वे यांचे दैनिक तरुण भारत कार्यालयात समूह मुख्य संपादक दिलीप पेठे यांनी स्वागत केले. यावेळी अभिनेते डॉ. अभय कामत, जनसंपर्क प्रमुख राम कोंडीलकर, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, विठ्ठल बडगंची.

# शेटे वाड्यात आज होणार योगदंडाची पूजा

**● नंदीध्वज नागफणीने सजवण्याची तयारी सुरू**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यात्रेतील विधींना सुरुवात झाली असून शुक्रवार १० जानेवारी रोजी योगदंडाची पूजा शेटे वाड्यात होणार आहे. दरवर्षीप्रमाणे योगदंड पूजन, नंदीध्वजास साज चढविणे, तैलाभिषेक, अक्षता सोहळा, होम प्रदीपन, दारूकाम, नंदीध्वजांचे वस्त्र विसर्जन हे धार्मिक विधी होणार असल्याची माहिती ग्रामदैवत सिद्धरामेश्वर महायात्रेचे पहिल्या नंदीध्वजाचे मानकरी राजशेखर हिरेहब्बू यांनी पत्रकार परिषदेत दिली.




९०० वर्षांपासून सिध्दरामेश्वरांच्या यात्रेच्या धार्मिक कार्यास रुढी परंपरेप्रमाणे ११ जानेवारी पासून सुरुवात होते. श्री. सिध्दरामेश्वरांच्या हातातील योगदंड उत्तर कसबा येथील कै. शिवानंद हिरेहब्बू यांच्या वाड्यातून श्री मठपती (स्वामी) हा योगदंड शुक्रवार पेठ येथील कै. रामचंद्रप्पा शेटे यांच्या वाड्यात घेऊन जातात. त्याठिकाणी मानकरी हिरेहब्बू आल्यानंतर त्या योगदंडाची विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर होमहवन व हिरेहब्बू यांचे शेटे यांचे वारस ॲड. मिलिंद थोबडे हे पादपूजा करतात. त्यानंतर प्रसादाचा कार्यक्रम होतो. तेंव्हापासून यात्रेचे धार्मिक विधीस सुरुवात होते. ही प्रथा ९०० वर्षांपासून आजतागायत चालत आलेली आहे. शनिवारी ११ जानेवारी रोजी रात्री १२.०५ वाजता हिरेहब्बू वाड्यात मानाच्या पहिल्या आणि दुसऱ्या नंदीध्वजास साज चढविण्याचा कार्यक्रम होणार आहे. रविवार दि. १२ जानेवारी रोजी श्री सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगांना तैलाभिषेक करुन धार्मिक विधींना प्रारंभ होणार आहे. ही मिरवणूक सकाळी ८ वाजता हिरेहब्बू वाड्यापासून सुरुवात होणार आहे. सोमवार दि. १३ जानेवारी रोजी सकाळी ७ वाजता हिरेहब्बू वाड्यापासून नंदीध्वज मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे. ही मिरवणूक ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरात आल्यानंतर संमती कट्ट्यावर हजारो भाविकांच्या उपस्थितीत अक्षता सोहळा होणार आहे. दि. १३ जानेवारी सकाळी ७ वा. हिरेहब्बू यांच्या वाड्यातून हिरेहब्बू व देशमुख यांच्या हस्ते पुजा होऊन मिरवणुकीने सिध्देश्वर मंदिरात अक्षता सोहळ्यासाठी संमती कट्ट्याजवळ येतात. येथे सातही नंदीध्वज आल्यानंतर श्री शिवसिध्दरामेश्वरांच्या हातातील योगदंडाच्या साक्षीने सुगडी पुजा हिरेहब्बू व देशमुख करतात. त्यानंतर कुभार यांना हिरेहब्बू यांच्या हस्ते विडा दिला जातो. त्यानतर तम्मा शेटे संमती मंगल अष्टक हे हिरेहब्बू यांच्या स्वाधीन करतात. त्यानंतर हिरेहब्बू व देशमुख संमतीची विधिवत पुजा करतात. हिरेहब्बू हे शेटे यांना विड्याचा मान देतात. त्यानंतर हिरेहब्बू ते संमती मंगल अष्टक तम्मा शेटे यांच्या स्वाधीन करतात. ही रूढी परंपरा चालत आलेली आहे. त्यानंतर हिरेहब्बू देशमुख व तम्मा शेटे संमती कट्टयावर येऊन त्याठिकाणी तम्मा शेटे संमती वाचन करतात. अशाप्रकारे अक्षता सोहळ्याच्या कार्यक्रम पार पडतो. त्यानंतर सातही नंदीध्वज अमृतलिंगाजवळ येतात. त्याठिकाणी हिरेहब्बू व शेटे यांच्या हस्ते अमृत लिंगाची पंचामृत अभिषेक करून विधिवत पुजा होते. त्यानंतर शेटे यांना हिरेहब्बू हे विडा देतात व इतर मानकऱ्यांना विड्याचा मान दिला जातो. त्यानंतर सिध्दरामेश्वरांच्या गदगीस अभिषेक करून हिरेहब्बू हे विधिवत पूजा करतात. तेथील विड्याचा मान तम्मा शेटे यांना दिला जातो. व पुन्हा नंदीध्वज ६८ लिंगास प्रदक्षिणा घालून परत हिरेहब्बू यांच्या वाड्यात परत येतात.

सोमवार दि. १४ जानेवारी रोजी मकर संक्रांतीच्या दिवशी होम मैदानावर होम प्रदीपनाचा समारंभ होणार आहे.

मंगळवार, दि. १५ जानेवारी रोजी किंक्रांत असून त्यादिवशी होम मैदानावर शोभेचे दारूकाम होणार आहे. तर बुधवार दि. १६ जानेवारी रोजी नंदीध्वजांच्या वस्त्रविसर्जनाचा कार्यक्रम होणार आहे. श्री सिद्धेश्वर यात्रेसाठी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, तेलंगणा, कर्नाटक येथून जवळपास तीन ते चार लाख भाविक येतात. नंदीध्वजांच्या मिरवणुकीला हिरेहब्बू मठातून सुरुवात होते. बाबा कादरी मशीद, डॉ. चिडगुपकर यांचे घर, दाते यांचे श्री गणपती मंदिर, हाजीभाई चौक, पंचकट्टा आणि रिपन हॉल येथून श्री सिद्धेश्वर मंदिर असा नंदीध्वज मिरवणुकीचा मार्ग आहे. तसेच नंदीध्वज ६८ लिंग प्रदक्षिणादेखील होणार आहे. या पत्रकार परिषदेस यात्रेचे मनोज हिरेहब्बू, जगदीश हिरेहब्बू, संजय हिरेहब्बू, संतोष हिरेहब्बू, विनोद हिरेहब्बू, मल्लिनाथ मसरे, संदेश भोगडे, सोमनाथ मेंगाणे, भीमाशंकर म्हेत्रे, भीमाशंकर कुंभार, चिदानंद मुस्तारे, बिपिन धुम्मा, राजशेखर आमणगी, जयप्रकाश आमणगी, नंदीध्वजांचे मास्तर उपस्थित होते.





सोलापूर : नंदीध्वज नागफणी सजवण्याची तयारी सुरू झाली आहे. कुशल कारागिर गणाचार्य बंधू हे व्यस्त आहेत. दुसऱ्या छायाचित्रात श्री मल्लिकार्जुन मंदिरात पूजेसाठी असलेली चांदीची मूर्ती व साहित्य पॉलिश करण्यात येत आहे. (छाया : केवल तिवारी)

**मिरवणूक मार्गावरील अडथळ्यांबाबत महापालिका प्रशासनाशी चर्चा**

नंदीध्वज मिरवणूक मार्गावरील अडथळ्यांबाबत प्रशासनाची चर्चा करण्यात आली आहे. त्याबाबत या मार्गाची पाहणीही करण्यात आली आहे. सध्या केवळ केबलची अडथळा असून, महापालिका यावर कार्यवाही करणार आहे, असे राजशेखर हिरेहब्बु यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९९९

**सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन ।।**
**तुका म्हणे जाण । तुम्ही संत यदर्थी ।।**

अनेकांच्या जीवनात अशी संधी येते की, तो कोणाच्या तरी मार्गदर्शनामुळे, कृपेमुळे, सहकार्यामुळे मान-सन्मानास पात्र होतो. पात्रता प्राप्त होण्यासाठी अगोदर तो मार्गदर्शकाची, सहकाऱ्याची, कृपावंताची भरपूर विनवणी करतो. पण एकदा का मान-सन्मान, मोठेपणा, सत्ता, अधिकार प्राप्त झाला की, मग हे प्राप्त करुन देणाऱ्या आधारस्तंभाला तो विसरु लागतो. खरे म्हणजे केलेल्या उपकाराची परतफेड करणे अत्यंत कठीण असते. कारण, ज्या परिस्थितीत उपकार, सहकार्य झाले, ती परिस्थिती परतफेडीच्यावेळी उपकार कर्त्यावर असेलच असे नाही.



अर्थात, त्यावेळच्या परिस्थितीत झालेल्या उपकाराची किंमत मोजता येत नसते. याचा अर्थ असाही नाही की उपकाराची परतफेड करण्याचा प्रयत्नच करु नये. मी तर असे म्हणेन की, एखाद्याचा उपकार परतफेड न करता आला तरी चालेल पण त्या उपकाराचा विसर पडता कामा नये. आपल्या मान-सन्मानात, मोठेपणास जे कारणीभूत आहे, त्याचे महत्व आपण लक्षात ठेवलेच पाहिजे. दुसऱ्याच्या उपकारानंतर किंवा सहकार्यानंतर बरेच लोक स्वयंपूर्ण होतात. पण बरेच लोक आयुष्यभर दुसऱ्याच्या छत्रछायेखालीच जगतात. अशा छत्रछायेखाली जगणा-यांनाही ब-याचवेळा छत्रछायेखाली ठेवणाऱ्याप्रमाणे मान-सन्मान मिळतो. अनेकांना, नोकरांना जो मान मिळतो तो त्यांच्या मालकांमुळे,स्वामींमुळे मिळतो. त्या मालकाचे नांव घेत राहणे हेच त्यांचे खरे धन असते. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**सेवका स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन ।।**
**तुका म्हणे जाण । तुम्ही संत यदर्थी ।।**

आपण ज्याच्यामुळे मोठे झालो किंवा ज्याच्यामुळे आपणाला कर्तृत्व करण्याची संधी मिळाली त्याचा कोणत्याही परिस्थितीत विसर पडू देता कामा नये. संत आमचे मालक, मार्गदर्शक आहेत. त्यांच्या कृपेमुळे आम्ही ईश्वरभक्तीकडे, अभंगवाणीच्या लिखाणाकडे वळलो आहोत, त्यामुळे आम्ही आमच्या माय-बापांना कधीच विसरणार नाही. त्यांचा नामघोष करण्यात आम्हाला आनंद वाटेल असे महाराज म्हणतात. जगद्गुरु असणारे तुकोब्बाराय संत, महात्म्यांना, श्रोत्यांना एवढे महत्व देतात तर तुम्ही आम्ही का देऊ नये? आपणाला मार्गदर्शन करण्यासाठी एखादा सद्गुरु मिळाला नसेल किंवा कोणी सहकारीही मिळाला नसेल, पण जन्म देणारे माता-पिता, हात धरुन चालवणारे बंधू-भगिणी तर मिळाले असतीलच. या माता-पित्यांचे, बंधू-भगिणींचे ऋण फेडणार कसे ? त्यांचे ऋण फेडावेच असेही नाही. पण त्यांचे स्थान कायमस्वरुपी आपल्या ह्रदयात असायलाच हवे. त्यांचे नांव उज्वल होईल अशा प्रकारची कृती आपल्याकडून व्हायला हवी. आई-बाप हेच आपले देव, संत, गुरु, मानले व त्यांच्या ऋणातच जगलो तरी हे जीवन सफल होऊ शकते. आई-वडीलांच्या ऋणाची आजपर्यंत कोणालाही परतफेड करता आली नाही व करताही येणार नाही. जमेल तेवढी त्यांची सेवा करणे, त्यांना समाधान मिळेल त्या पध्दतीने कर्तव्य पार पाडणे हेच आपले ध्येय असेल तरी पुरेसे होऊ शकते. आई-बापांचा विसर म्हणजे मानवतेचा विसर होय हे लक्षात असू द्यावे. वडीलधारे, मित्रपरीवार, सोयरे धायरे, समाज, देश आदींच्या ऋणांची सदैव आठवण ठेवावी.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - पुत्रदा एकदशी |
| दि. १० जानेवारी २०२५ | विश्व हिंदी दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४६ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - पौष | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| शु. एकादशी - (१०.१९) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - शिशिर | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - कृतिका (१३.४५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - शुभ (१४.३६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - बव (२१.२०) | |

### राशीभविष्य

**मेष** : मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

**वृषभ** : आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल. मुलांची काळजी राहील.

**मिथुन** : कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत. स्पर्धेमध्ये यश मिळेल.

**कर्क** : उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता. व्यापार मध्यम राहील.

**सिंह** : आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. कार्याचा विस्तार वाढून अनकूल परिस्थिती निर्माण होईल. काही महत्वपूर्ण निर्णय घ्याल.

**कन्या** : आपले प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल.

**तुळ** : प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

**वृश्चिक** : आपल्या पराक्रम वृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका.

**धनु** : न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या.

**मकर**: अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल. विलासी प्रवृत्ती वाढेल.

**कुंभ** : प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल.

**मीन** : आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे.

# रोटरी क्लब सोलापूरचे १०० क्लब करणार १०० डिजिटल क्लास रुम

## शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम प्रकल्पाचा उद्या लोकार्पण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

रोटरी क्लब ऑफ सोलापूरने १०० क्लबच्या अंतर्गत असलेल्या ग्रांटेड १०० शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम तयार करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता गुजरात भवन येथे होणार आहे, अशी माहिती रोटरी क्लब सोलापूरचे अध्यक्ष सीए सुनील माहेश्वरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

प्रांतपाल डॉ. सुरेश साबू वर्ष २४-२५ व आयपीडीजी स्वाती हेरकल वर्ष २३-२४आणि डीजीई सुधीर लातूरे वर्ष २५-२६ यांच्या हस्ते या प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

रोटरी जिल्हा ३१३२ मध्ये एकूण ११ जिल्ह्यांचा समावेश असून, तेथील स्थानिक रोटरी क्लबच्या सहकार्याने या सर्व जिल्ह्यांतील १०० शाळांमध्ये डिजिटल क्लासरूम उभारण्यात येणार आहेत. यामध्ये ४३'' टीव्ही आणि अत्याधुनिक डिजिटल क्लासरूम सॉफ्टवेअरचा समावेश राहणार आहे. सोलापुरातील सर्व रोटरी क्लब्सचे सदस्य स्वतः जाऊन शिक्षकांना या सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण देतील. सामान्य ज्ञानविषयक सामग्री याशिवाय, विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच ''अव्ययदान'' आणि ''हृदयविकारावरील प्रथमोपचार (सीपीआर)'' या विषयावरील जनजागृतीसाठी शैक्षणिक व्हिडिओचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे शिक्षणाचा दर्जा सुधारून समाजप्रबोधन होण्यास मदत होईल.




या प्रकल्पाचा एकूण खर्च २२ लाख ५ हजार रुपये आला असून, त्यापैकी २१ लाख रुपये मे. पी. पी. पटेल ॲंड कंपनी मेटल पावडर डिव्हिजन यांनी दिले आहेत. उर्वरित १ लाख ५ हजार रुपये रोटरी सोलापूर परिवारातील सर्व क्लब सदस्यांनी मिळून दिले आहेत. पुढील तीन वर्षात दरवर्षी १०० शाळांमध्ये हा प्रकल्प राबवण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पासाठी प्रांतपाल नियोजित (२०२६-२७) रोटे. जयेश पटेल आणि रोटे. पारुल पटेल यांचे सहकार्य लाभले आहे. पुण्याचे बिरेन धर्मसी यांच्या कंपनीने हे सॉफ्टवेअर दिले असून एलईडी स्क्रीन महेंद्र इलेक्ट्रॉनिक्सद्वारे शाळेच्या उपक्रमानिमित्त अत्यंत अल्पदरात पुरविण्यात आले असल्याचे अध्यक्ष सीए सुनील माहेश्वरी यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस क्लबचे सचिव ब्रिजकुमार गोयदानी , ज्येष्ठ सदस्य सलाम शेख उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; सम जायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (१६)
### सौभाग्य

पूजनीय डॉक्टरांना गोळवलकर गुरुजींची कुशाग्र बुद्धी, वाक्- पटूता, कर्तुत्व शक्ती, दुसऱ्याला प्रभावित करण्याची क्षमता, भौतिक सुखोपभोगाप्रति उदासीनता आदि गुण आवडले होते. त्यांनी मनोमन ठरवलं होतं, हाच खरा संघाचा आपल्या नंतरचा वारस. आणि मग डॉक्टरांनी गुरुजींना आपल्याबरोबर नागपूर - भंडारा- उमरेड- रामटेक- अकोला आदि ठिकाणी झालेल्या संघ वर्गावर सोबत नेले. डॉक्टरांनी त्यांना पंजाब-बंगाल-पुणे-मुंबई- आदि ठिकाणी पण संघाचे दर्शन घडवले. आणि आम च्या राष्ट्राचे सौभाग्य हेच की डॉक्टर हेडगेवार हे गुरुजींसाठी आकर्षित करणारा जबरदस्त शक्तीचा लोहचुंबक ठरले. आणि डॉक्टरांच्या राष्ट्रीय कर्मयोगाकडे गुरुजी अधिकाधिक. आकर्षित होऊ लागले. आणि ते गतीने संघमय झाले.

क्रमशः

# रोजगार हमी योजनेतील मजुरांचा तब्बल पाच वर्षापासून पगार प्रलंबित

## दक्षिण तालुक्यातील कासेगावातील प्रकार; निधी असतानाही वेतन मिळत नसल्याची मजुरांनी केली तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगावच्या रोजगार हमी योजनेचे काम करणाऱ्या मजुरांना तब्बल पाच वर्षापासून पगारापासून वंचित ठेवण्यात आले आहे. दी.१८ जून २०२० ते २६ जून २०२० या कालावधीत केलेल्या कामाचा मोबदला अद्यापही सादर केला नाही. मस्टरवर सही करून देखील पगार न दिल्याने तक्रारदार उद्धव नरहरी जाधव यांनी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, उपमुख्यकार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, रोहयो तांत्रिक अधिकारी, सरपंच कासेगाव, दक्षिण सोलापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. यासंदर्भात उपमुख्यकार्यकारी अधिकारी इशाधीन शेळकंदे यांनी या तक्रारीच्या अनुषंगाने सुनावणी घ्यावी. आणि तीन दिवसात अहवाल सादर करण्याची सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

### खात्यावर रक्कम असूनही दुर्लक्ष

या संदर्भात उपकार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे यांच्यासमोर सुनावणी झाली. या सुनावणीचा अहवाल सादर केला का ? नाही. याबाबत माहितीच उपलब्ध नाही. रोजगार हमीचे कारकून विशाल कुंभार यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समक्ष मजुराने काम केले आहे. म्हणून मान्य केले आहे. तरीदेखील मस्टरवर रक्कम अदा केले नाही. कामाचे मंजूर रक्कम संपले आहे. असे कुंभार म्हणत आहेत. परंतु १४ लाख ६५ हजार खात्यावर असून देखील मजुरांचे पगार केले जात नाही. ११९ मजुरांना दि.१८ जून २०२० या कालावधीपासून रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून केलेल्या कामाचे पगार न मिळाल्याने रोजगार हमी मजुर तब्बल पाच वर्षे पासून पगारापासून वंचित आहेत.

**- उद्धव नरहरी जाधव, पीडित मजूर**

### मजुरांचे निधन झाले तरी वेतन नाही

रोजगार हमी योजनेअंतर्गत पाच वर्षांपूर्वी दहा दिवसांच्या कालावधीसाठी कासेगाव येथे विकास कामे झाली ११९ मजुरांना या कामाचा मोबदला सुमारे १ लाख ७५ हजार इतका प्राप्त होणार होता. या पाच वर्षांचा कालावधीत, वेतनाची वाट पाहत असलेल्या तीन ते चार मजुरांचे निधन झाले. वेतनासाठी यापूर्वी आमरण उपोषण, आंदोलन केले तरी देखील निगरगट्ट प्रशासन याकडे लक्ष देत नाही. आगामी काळात गावातील शांतता भंग होऊ नये यासाठी प्रशासनाने यावर तात्काळ कार्यवाही करावी.

**- यशपाल वाडकर, सरपंच, कासेगाव दक्षिण सोलापूर**

दरम्यान, या अहवालाबाबत प्रशासनाने कोणती कारवाई केली आहे. हे अद्याप ही समजले नाही. दी.२६ जानेवारी २०२५ रोजीच्या ग्रामसभेत या विषयावरती मजुरांकडून ग्रामसभेच्या बैठीकत वादविवाद वाढवण्याची शक्यता नाकारता येत नाही, म्हणून याबाबत प्रशासनाकडून त्वरित कारवाई करण्यात यावी. अशी मागणी कासेगावचे सरपंच यशपाल वाडकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# महाईसेवा केंद्रासाठी जिल्ह्यातून ६३ हरकती

## 'त्या' हरकतींवर १५ जानेवारीपासून सुनावणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

जिल्ह्यातील तीनशेहून अधिक गावासाठी महाईसेवा केंद्र मंजुरी देण्यात आली होती. जिल्ह्यात सुमारे ३०३ गावात उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. यावर जवळपास ६३ केंद्रासाठी हरकती घेण्यात आल्या आहेत. या हरकतींवर बुधवार (ता.१५) पासून सुनावणी होणार असल्याची माहिती आरडीसी मनिषा कुंभार यांनी आज (दि. ०७) दिली.

जिल्ह्यातील ३३० गावांसाठी महाईसेवा केंद्रांसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी अर्ज मागविले होते. यापैकी २४० ठिकाणी उमेदवारांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. तर ६३ ठिकाणी विविध कारणांसाठी हरकती घेण्यात आल्या आहेत. या तक्रारींवर १५ जानेवारीपासून सुनावणी घेण्यात येणार आहे. ज्या उमेदवारांच्या निवडीवर हरकती घेण्यात आल्या आहेत. त्यांना इमेलद्वारे सुनावणीची तारीख कळविण्यात येणार आहे. निवड केलेले उमेदवार स्थानिक नसल्याबाबत काही तक्रारी आलेल्या असून, याबाबत स्थानिक तहसीलदारांचा अहवाल महत्त्वाचा ठरणार आहे. तसेच निवड झालेले उमेदवार हे पोलिस पाटील, अंगणवाडी सेविका, आरोग्यसेवक, शिक्षक, ग्रामपंचायत अथवा इतर ठिकाणी नोकरीस असल्याबाबतच्या २३ हरकती आलेल्या आहेत. निवड झालेल्या उमेदवारांच्या सीएससी आयडी व सीएससीच्या उलाढालीबाबत २० हरकती आलेल्या आहेत. उमेदवाराच्या नावे आपले सरकार सेवा केंद्र असल्याच्या दोन तक्रारी आहेत. यावर १५ ते १७ जानेवारी या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी होणार आहे.

# जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांना कसलाही त्रास होऊ देणार नाही : सीईओ कुलदीप जंगम

## सेवानिवृत्त शिक्षकांचे स्वतंत्र पेन्शन अदालत घेण्याचे दिले आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी**

सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांना कसला ही त्रास होऊ देणार नाही. सेवानिवृत्त शिक्षक मंडळी हे आमचे मार्गदर्शक आहेत. असे आश्वासन सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधीकारी कुलदीप जंगम यांनी सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षक संघटनेला दिले.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकांच्या अडी अडचणी सोडवण्यासाठी प्रशासनाने सेवानिवृत्त शिक्षकाची स्वतंत्र पेन्शन अदालत घ्यावी. या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या सोलापूर जिल्ह्याच्या वतीने सी.ई.ओ. जंगम यांना निवेदन देण्यात आले.

राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटना अध्यक्ष शिवानंद भरले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अध्यक्ष सुभाष फुलारी कार्याध्यक्ष रमेश गायकवाड सरचिटणीस मल्लिकार्जुन बडदाळ, भिमाशंकर म्हेत्रे, काळप्पा सूतार, सिद्रम प्पा जिरगे, आदीनी मुख्यकार्यकारीअधीकारी कुलदीप जंगम यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.



वेतनाचा आणी पेन्शन ची तरतूद एकाचवेळी केली जात असताना, पेन्शन वेळेवर मिळत नाही, नव्याने सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकाचें पेन्शन प्रकरणे कार्यालय कर्मचारी न करता त्रयस्थ व्यक्ती कडून प्रस्ताव तयार करून घेतली जाते. त्यासाठी सेवानिवृत्त होणाऱ्या मंडळींना पाच ते पंधरा हजार मोजावे लागते, पेडींग राहीलेले पेन्शन बीलासाठी हेलपाटे मारावे लागते, निवड श्रेणी प्रस्ताव मंजूर केले जात नाही, असे विविध प्रश्ने सेवानिवृत्ताचें आहेत. यासाठी शिक्षकाचें स्वतंत्र पेन्शन अदालत घ्यावी अशी मागणी कार्याध्यक्ष रमेश गायकवाड यांनी केली. यावेळी सी.ई.ओ जंगम यांनी सेवानिवृत्त शिक्षकाचें स्वतंत्र पेन्शन अदालत घेऊ असे आश्वासन दिले.

# नव्या विषाणूपासून सतर्क राहा व काळजी घ्या

**बालरोग तज्ज्ञ डॉ. ऋचा मोरे-पाटील यांचे आवाहन**

## सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून बालरोगतज्ज्ञ यांच्याकडे वाढला पालकांचा ओढा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

नव्या एच.एम.पी.व्ही या विषाणूजन्य आजाराचा चिनमध्ये मोठया प्रमाणात उद्रेक सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर आरोग्यसेवा विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांच्या निर्देशानुसार सोलापूर जिल्ह्यात सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या विषाणूजन्य आजाराचा जिल्ह्यात एकही रुग्ण आढळला नसल्याचे स्पष्टीकरण सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभागाकडून देण्यात आले आहे.



दरम्यान, शहर जिल्ह्यातील विविध दवाखान्यात या नव्या विषाणू संदर्भात जागरूकता वाढवण्यासाठी उपाय योजना केल्या जात आहेत. मार्गदर्शक सूचनांची शहर जिल्ह्यात अंमलबजावणी सुरू केली जात आहे. नव्या विषाणूची लस सध्या उपलब्ध नसल्याने जागरूकता निर्माण केली जात आहे. मात्र तरी देखील विषाणूचा संसर्ग होऊ नये, यासाठी विशेष काळजी घेण्याचे आवाहन तज्ञ डॉक्टर्स यांच्याकडून करण्यात येत आहे. लहान मुलांमध्ये प्रतिकारशक्ती कमी प्रमाणात असते. त्यामुळे लहान मुलांना याची लागण होऊ शकते का? असे प्रश्न पालकांच्या मनात उपस्थित होत आहेत. त्यामुळे बालरोगतज्ञ यांच्याकडे पालकांचा ओढा वाढत चाललेला आहे. त्यामुळे बालरोग तज्ञ हे या संदर्भात सतर्क झालेले आहेत. सर्दी, अंगदुखी, ताप, खोकला, दम लागणे, श्वास घेण्यास त्रास होणे, अशा रुग्णांवर सर्वेक्षण सुरू केले जात आहे. अंतर्गत त्यांचे उपचार केले जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

### घाबरून जाऊ नका... दक्षता घ्या

नव्या एच.एम.व्हीं.पी. संसर्ग टाळण्यासाठी स्वच्छ हात धुणे आवश्यक आहे. तोंडाला मास्क लावणे, गर्दीत जाणे टाळणे, रोग प्रतिकारशक्ती कमी असल्यास सकस आहार मुलांना द्यावा. सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, असल्यास तात्काळ आपल्या बालरोग तज्ञ यांच्याकडे उपचार घ्यावा. घाबरून जाऊ नका मात्र दक्षता घ्या. जिल्हा आरोग्य विभागाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

**- डॉ.ऋचा मोरे-पाटील, बालरोग तज्ज्ञ**

### व्हायरसपासून घ्यावयाची काळजी

सतत खोकला किंवा शिंका, येत असतील तर तोंड आणि नाक रुमाल,मास्क किंवा टिशू पेपरने झाका, साबण किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझर ने आपले हात वारंवार धुवा, ताप खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणापासून दूर राहा, भरपूर पाणी प्या, पौष्टिक आहार घ्या, संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे व्हेंटिलेशन होईल याची दक्षता घ्यावी.

## श्री श्री बालयोगी यल्लालिंग महाराजांच्या वाढदिवसानिमित्त उद्या विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जानेवारी-**

होटगी मठाधिपती श्री श्री बालयोगी यल्लालिंग महाराज यांच्या ४१ व्या वाढदिवसानिमित्त होटगी येथे शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता सत्कार कार्यक्रम आणि विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उमेश काळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

श्री श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात आणि रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा सत्कार समारंभ आयोजित केला आहे. होटगी येथील समस्त ग्रामस्थ, भक्तगणांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

या निमित्ताने होटगी येथे वृक्षारोपण, रक्तदान शिबिर तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी श्री साध्दलिंग महाराज, श्री सिद्धलिंग महाराज, श्री सोमलिंग महाराज, श्री धोंडप्पा महाराज, श्री रेवनसिद्ध महाराज, श्री बसवलिंगेश्वर महाराज आदींसह पंचक्रोशीतील धर्मगुरू उपस्थित राहणार आहेत. या पत्रकार परिषदेस सतीश बुजरुके, डॉ. झाकीर शेख, उद्धवसिंग कल्लावाले आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### करकंब पोलीस ठाण्यातर्फे रेझिंग डे सप्ताह

**करकंब, दि. ९ जानेवारी-**

२ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पोलीस स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने २ ते ७ जानेवारी दरम्यान रायझिंग डे सप्ताह अनेक शाळा,महाविद्यालयांमध्ये पोलिसांच्यावतीने आयोजित केला जातो.या सप्ताहात विद्यार्थ्यांना कायदेविषयक आणि स्वरक्षणाविषयक माहिती देऊन जनजागृती करण्याचा मानस असतो. विद्यार्थ्यांना वाईट प्रवृत्ती,विविध प्रकारची व्यसने यांच्यापासून कशाप्रकारे दूर राहावे? तसेच मुलींनी आपले स्वसंरक्षण स्वतःच कसे करावे? याविषयी मार्गदर्शन केले जाते. या अनुषंगाने करकंब पोलीस ठाण्यातर्फे सपोनि सागर कुंजीर व पोलीस कर्मचाऱ्यांतर्फे यशवंत विद्यालय भोसे येथील शालेय विद्यार्थ्यांना पोलीसदादा व दीदी उपक्रम, विविध प्रकारची शस्त्रे, वाहतुकींचे नियम, विविध प्रकारच्या व्यसनापासून कसे दूर रहावे? याविषयी माहिती देण्यात आली. एसपी पब्लिक स्कूल नांदोरे, रामभाऊ जोशी हायस्कूल करकंब, न्यू इंग्लिश स्कूल करकंब येथील शालेय विद्यार्थ्यांनाही करकंब पोलीस ठाणे येथील गोपनीय, क्राईम, बारनिशी, मुद्देमाल कारकून, ठाणे अंमलदार याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यानिमित्त करकंब एसटी स्टँड, करकंब पोलीस स्टेशन येथे सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील पोलीस बँड पथकाडून राष्ट्रभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षकवर्ग, पालक, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मातोश्री प्रतिष्ठानतर्फे पत्रकारांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ९ जानेवारी**

येथील कालिका नगरमधील श्री कालिका मंदिरात दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मातोश्री प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकारांचा पोनि राजेंद्र टाकणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.अध्यक्षस्थानी अक्कलकोट विवेक सोसायटीचे माजी अध्यक्ष सिद्धप्पा कलशेट्टी होते. ज्येष्ठ पत्रकार बाबासाहेब निंबाळकर, शिवानंद फुलारी, प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. गणपतराव कलशेट्टी, मोहन चव्हाण, विरूपाक्ष कुंभार, प्रशांत भगरे, मारुती बावडे, बसवराज बिराजदार, सैदप्पा इंगळे, चेतन जाधव, योगेश कबाडे, सोमशेखर जमशेट्टी, शिवा याळवार, दयानंद दणुरे, विश्वनाथ चव्हाण, स्वामी गायकवाड, रमेश पुजारी, इंजिनियर अमर कलशेट्टी, माळप्पा पुजारी, विश्वनाथ कलशेट्टी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश सुरवसे यांनी केले तर समर्थ कलशेट्टी यांनी आभार मानले.



### करकंब येथे पत्रकारांचा सत्कार

**करकंब, दि. ९ जानेवारी-**

पत्रकार दिनानिमित्त करकंब व परिसरातील पत्रकारांचा सन्मान करकंब पोलिस स्टेशनच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी सपोनि सागर कुंजीर, पोह बालाजी घोळवे, पोह विजय गोरवे, पोह गोरे, पोना शेखर भोसले, पोना संतोष पाटेकर, पत्रकार संघाचे अध्यक्ष लक्ष्मण शिंदे, सल्लागार लक्ष्मण जाधव, ऋषिकेश वाघमारे, गोपीनाथ देशमुख, मनोज पवार, राजेंद्र करपे, सचिन शिंदे, मनोज पवार, विश्वनाथ केमकर, सुनील कोरके, भीमा व्यवहारे, अण्णा पवार, बाळासाहेब काशीद, नितीन खाडे, विजय नलावडे, सिद्धेश्वर वाघमारे, गणेश माने, रोहन नरसाळे, सारांश थिटे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते. लोकमंगल पतसंस्था शाखा करकंब यांच्यावतीनेही पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अच्युत कपडेकर, शाखाधिकारी लक्ष्मण बागल उपस्थित होते. डीव्हीपी शाखा करकंब पतसंस्थेतही पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.



### जिजाऊ शाळेतर्फे पत्रकारांचा सन्मान

**अणदूर, दि. ९ जानेवारी-**

अणदूर येथील जिजाऊ इंग्लिश स्कूलतर्फे पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पत्रकार दयानंद काळुंके, अजय अणदूरकर, चंद्रकांत हगलगुंडे, शिवशंकर तिरगुळे, चंद्रकांत गुड्डू, गुरुनाथ कबाडे, संजीव आलूरे, कैलास बोगरगे, सचिन तोग्गी, प्रसन्न कंदले, राहुल कांबळे, नागेश करपे, किरण कांबळे आदींचा सन्मान करण्यात आला. सूत्रसंचालन ॲड. विशाल शेटे यांनी केले. वैजीनाथ शेटे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी सपना शेटे, सुवर्णा गुड्डू, पूजा स्वामी, ज्योती भोसले, रत्नाबाई बिराजदार, शकुंतला इंगळे, नीलम लोहार, शीतल मुळे, बसवराज करपे आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# वृक्ष संवर्धनाकडे कानाडोळा; पर्यावरणप्रेमींमधून नाराजी

### झाडे तोडणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ जानेवारी-**

अक्कलकोट ते सोलापूर या राष्ट्रीय महामार्गा लगतच्या वृक्ष संवर्धनाकडे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याने पर्यावरणप्रेमी नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने अक्कलकोट-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वृक्षसंवर्धनाकडे लक्ष देण्याची गरज भासत आहे.

अक्कलकोट-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग निर्माण करत असताना या महामार्गावरील हजारो झाडे तोडण्यात आली. यामध्ये वड, पिंपळ, लिंब यासह विविध पर्यावरणपूरक वृक्षांची तोड करण्यात आली. अक्कलकोट-सोलापूर हा राष्ट्रीय महामार्ग सध्या जनतेच्या सेवेत सुरू आहे. या चार पदरी महामार्गालगत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून हजारो वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये वड, पिंपळ, कडूलिंब आदी पर्यावरणपूरक वृक्षांसह इतर सावली देणाऱ्या वृक्षांचे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले आहे. पण या वृक्षांच्या संवर्धनाकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. अक्कलकोट-सोलापूर महामार्गावरील वृक्ष हे पाण्याअभावी वाळून गेले आहेत. वृक्ष संवर्धनाकडे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष झाले आहे. वास्तविक पाहता सदरचा महामार्ग बनवत असताना जितके वृक्ष तोडण्यात आले त्याहून अधिक वृक्षांची लागवड करून त्यांचे जतन करणे गरजेचे होते .पर्यावरण पूरक वृक्षांचे संवर्धन होणे गरजेचे असताना राजमार्ग प्राधिकरणाने याकडे साफ दुर्लक्ष केल्याचे सध्याच्या परिस्थितीकडे पाहून वाटत आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या या दुर्लक्षामुळे पर्यावरण प्रेमी नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. वास्तविक पाहता पर्यावरणाचे समतोल राखण्यासाठी आणि जमिनीची धूप थांबविण्यासाठी महामार्गालगत हजारो वृक्षांचे संवर्धन झाले पाहिजे. अक्कलकोट - सोलापूर महामार्गावर मात्र प्रवास करताना वृक्षांची झालेली अवस्था पाहून या अनास्था बद्दल नागरिकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे. अक्कलकोट-सोलापूर या महामार्गावर संस्थान काळात हजारो वृक्षांचे संवर्धन भोसले राजघराण्यातील संस्थानिकांनी केले होते. झाडांची सर्वत्र असलेली सावली सर्वांनाच विसावा देत होती. भोसले राज घराण्याने वृक्ष संवर्धनाकडे मोठ्या प्रमाणात लक्ष दिले होते. अक्कलकोट ते हन्नूर या रस्त्यावर देखील राजघराण्याकडून हजारो वृक्षांचे जतन करण्यात आले होते.भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने अक्कलकोट-सोलापूर महामार्गावरील वृक्ष संवर्धनासाठी विशेष लक्ष देण्याची मागणी होत आहे.




#### अन्नछत्राकडून झाडांचे संगोपन

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष पर्यावरणप्रेमी जन्मेजयराजे भोसले यांनी अक्कलकोट- सोलापूर महामार्गावर वड, पिंपळ, कडूलिंब यासह शेकडो झाडांचे वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धनाचे काम करत आहेत. दिवसातून एकदा या झाडांना टँकरद्वारे पाणी घालण्यात येत आहे. यामुळे अक्कलकोट-सोलापूर महामार्गावर झाडांची दाटी पहावयास मिळत आहे. ती जन्मेजयराजे भोसले यांच्यामुळेच दिसत आहे. याचा आदर्श भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने घ्यावा असे पर्यावरणप्रेमी नागरिकांत बोलले जात आहे.



## बार्शीत गुणवंत शिक्षक, उपक्रमशील शाळांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ जानेवारी-**

बालिकादिनी यशवंतराव चव्हाण सभागृह येथे बार्शी न. पा. शि. मंडळाच्यावतीने गुणवंत शिक्षक व उपक्रमशील शाळा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

अध्यक्षस्थानी मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण होते. यावेळी प्रशांत शेटे, संतोष सूर्यवंशी, प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे, माजी पर्यवेक्षक संजय पाटील, प्रभारी पर्यवेक्षक सुरेश शिंदे उपस्थित होते. स्वागत अनिल बनसोडे यांनी केले. प्रास्ताविक प्रभारी पर्यवेक्षक सुरेश शिंदे यांनी केले. नगरपालिकांच्या शाळांच्या गुणात्मक वाढीसाठी व भौतिक सुविधांच्या वाढीसाठी नगरपालिका प्रयत्न करत असल्याच बाळासाहेब चव्हाण यांनी त्यांच्या मनोगतातून सांगितले. भारताचे चांगले नागरिक घडविण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न करावेत. आजपर्यंत बार्शीतील अनेक विद्यार्थी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले, त्यामागे चांगले शिक्षकच आहेत. त्यामुळे हे शक्य झाले. वाचन सर्वांना समृद्ध करते त्यामुळे सर्वांनी वाचावे, असे प्रशांत शेटे यांनी मत व्यक्त केले. प्रशासनाधिकारी अनिल बनसोडे यांनी त्यांच्या मनोगतातून सर्वच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडविण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केले.

न. पा. शाळा गुणवंत शिक्षक पुरस्कार सविता पंडित यादव, नानासाहेब पाटील, निलोफर सय्यद, संजय गोरे, जस्मिन शेख, सुषमा बारबोले, खाजगी शाळा गुणवंत शिक्षक पुरस्कार लक्ष्मण वाघमारे, रेखा मस्के, सागर मोरे, श्रीदेवी म्हेत्रे, शिल्पा शृंगारपुरे, परवीन शेख, विशाल विभुते, नितीन सुरवसे यांना देण्यात आला. सूत्रसंचालन ज्योती मांगलकर, पल्लवी देवराम यांनी तर अमोल नलवडे यांनी आभार मानले.

#### उपक्रमशील शाळा पुरस्कार

स्वातंत्र्यवीर सावरकर न. पा. शाळा क्रमांक ३, राजश्री शाहू महाराज न. पा. शाळा क्रमांक ६. खासगी उपक्रमशील शाळा पुरस्कार संतोष गुळमिरे प्राथमिक विद्यामंदिर, दत्त प्राथमिक विद्यामंदिरला देण्यात आले.

## आवताडे शुगरचे २,८०० रुपये ऊस बिल जमा

### चेअरमन आवताडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ९ जानेवारी-**

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा. लि. नंदूर या साखर कारखान्याचे गळीत हंगाम २०२४-२५ मधील ३० नोव्हेंबरपर्यंतचे उसाचे बिल २,८०० रुपये प्रति टन याप्रमाणे शेतकऱ्यांच्या ऊस उत्पादकांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे यांनी माध्यमांना दिली.

यावेळी मंगळवेढा मार्केट कमिटीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, कार्यकारी संचालक मोहन पिसे, भारत निकम, सरव्यवस्थापक (टेक्नी) सुहास शिनगारे, मोहन पवार, संभाजी फाळके, बजीरंग जाधव, शेती अधिकारी राहुल नागणे, तोहीद शेख, दामोदर रेवे उपस्थितीत होते. चेअरमन संजय आवताडे म्हणाले की २ वर्षापूर्वी आमदार समाधान दादा आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली फॅब्रटेक समूहातून हा कारखाना खरेदी करून आवताडे उद्योग समुहाने घेतल्यानंतर कारखान्याचा हा तिसरा हंगाम सुरू असून कारखान्याची वाटचाल व्यवस्थित सुरू आहे. आम्ही हा कारखाना केवळ शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतला असून या कारखान्यामधून आम्ही कोणताही स्वार्थ ठेवला नाही, आतापर्यंतच्या गळीत हंगामा मध्ये कारखान्याचे सर्व कर्मचारी, ऊस वाहतूकदार, ऊसतोड मजूर व कारखाना प्रशासनाने मन लावून व प्रामाणिक काम केल्यामुळे आम्ही मागील दोन्हीही गळीत हंगाम यशस्वीरित्या पार पाडले, असे त्यांनी सांगितले.



## धर्मपुरी शाळेची इमारत जूनपर्यंत पूर्ण करणार

### मुख्य अभियंता कुलकर्णी यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. ९ जानेवारी-**

सात महिन्यांपासून प्रलंबित असलेली धर्मपुरी जि. प. केंद्र शाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम सर्व ग्रामस्थांच्या मागणीनुसार मॉडेल शाळेच्या नवीन डिझाईन व प्लॅन नुसार त्वरित सुरू करा अन्यथा मला उपोषणाला बसावे लागेल अशी मागणी धर्मपुरी येथील सामाजिक कार्यकर्ते ॲड. संदीप वाघ यांनी डिसेंबर महिन्यात निवेदनाद्वारे बांधकाम उपअभियंता माळशिरस मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर, कार्यकारी अभियंता सोलापूर यांच्याकडे केली होती प्रशासनाने याबाबतची दखल घेत दिनांक आठ जानेवारी रोजी

धर्मपुरी जि.प. शाळेच्या इमारतीचे प्रलंबित बांधकाम पाहणी करण्यासाठी सोलापूर जिल्हा बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता कुलकर्णी, उपाभियंता रणवरे यांनी पाहणी करून पुढील काम जून २०२५ च्या आता पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. यावेळी उपसरपंच नितीन निगडे, ग्रामपंचायत सदस्य कृष्णात काटकर, दीपाली नितीन पाटील तसेच निलेश काटकर, गोरख पाटील, सुरेश पाटील, राहुल रणदिवे उपस्थित होते.

## डॉ. होमी भाभा विद्यापीठ अन् खेडगी महाविद्यालयाचा सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ९ जानेवारी**

डॉ. होमी भाभा राज्यसमूह विद्यापीठ मुंबई यांच्यासोबत अक्कलकोट येथील सी. बी. खेडगी महाविद्यालयाशी सामंजस्य करार झाला आहे.



यामुळे हजारो विद्यार्थ्यांना डॉ. होमी भाभा विद्यापीठ मुंबई व त्यांच्याशी संलग्रित मुंबई येथील एल्फिस्टन कॉलेज, सिडणे हॅम कॉलेजमधून मार्गदर्शन मिळणार आहेत. अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीच्या इतिहासात सोनेरी क्षण आहे. या सामंजस्य करारांतर्गत केवळ पदवी नव्हे तर पदव्युत्तर संशोधनाकरिता देखील विद्यार्थ्यांना संधी मिळणार आहे. शिवाय मुंबई येथे राहण्याची सोय देखील या विद्यापीठामार्फत करण्यात येईल, असा बहुआयामी सामंजस्य करारामुळे महाविद्यालयाच्या विकासाची घोडदौड असेच वेगाने पुढे जाणार आहे. या सामंजस्य करारामुळे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर क्षेत्रातील सी. बी. खेडगी महाविद्यालय हे प्रथम महाविद्यालय असल्याची माहिती प्राचार्य डॉ. शिवराया आडवीतोट यांनी दिले. याप्रसंगी डॉ. उमेश काकडे, डॉ. जया पवार, डॉ. राजेश राऊत उपस्थित होते. तर महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयिका प्रा. संध्या परांजपे, प्रा. जयश्री बिराजदार, प्रा. नीलकंठ धनशेट्टी उपस्थित होते.

## रस्ते पे मस्ती, जान नही सस्ती

### अकलूज उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पोलीस ठाण्यातर्फे रॅली

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. ९ जानेवारी-**

नियम पाळा अपघात टाळा, येईल शाळा वाट द्या बाळा, रस्ते पे मस्ती जान नही सस्ती, करा पालन नियमांचे रक्षण होईल जीवाचे आदी घोषणा देत अकलूज परिवहन विभागाने रॅली काढली.

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अकलूज व पोलीस ठाणे अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने ही रॅली काढण्यात आली. आपली स्वतःची व इतरांची काळजी सर्व वाहनचालकांनी घ्यावी, दुचाकीवर हेल्मेट व चारचाकी वाहनात सीटबेल्ट वापरावा, विद्यार्थ्यांची वाहतूक स्कूलबससारख्या सुरक्षित वाहनाद्वारेच करण्यात यावी, असा संदेश देण्यात आला. या रॅलीमध्ये श्रीराम शिक्षण संस्था, पानीव, जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ सराटी येथील स्कूल बस सहभागी झाल्या. दुचाकी अधिकृत वितरक सोनाझ हिरो व नष्टे होंडा यांचेही सर्व दुचाकी चालक हेल्मेट घालून सहभागी झाले होते. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंग गवारे, संभाजी गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली काढण्यात आली. रॅलीचा प्रारंभ सहाय्यक परिवहन अधिकारी अश्विनकुमार पोंदकुले, योगेश लंगुटे यांनी केला. यात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक पाटील, झाडबुके, राऊत, कुडपणे, पोमन, जगताप, शिंदे, सपोनि गणेश चौधरी, विक्रम साळुंखे, सई वनवे व कर्मचारी उपस्थित होते.



## पांडुरंगाचरणी सर्व सुखाचे उगमस्थान : हभप प्रशांत पांडव

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ९ जानेवारी-**

ज्ञानेश्वर महाराजांचा अवघाची संसार सुखाचा करीन या सुंदर अभंगावर निरुपण करताना मनुष्य हा जीवन जगत असताना सुखानंतर दुःख येते. दुःखानंतर सुख येते. जीवनात सर्व सुखी असा कोणीही नाही. त्यामुळे जीवनात अनंत, कायमस्वरुपी सुख प्राप्त करायचं असल्यास संतांनी दाखवलेल्या मार्गावर जात सर्वांचं माहेर असलेल्या पंढरपूरीच्या विठूरायाच्या चरणी मनोभावे नतमस्तक झाला तर मागेपुढे उभा राहून आघात निवारून तो सर्वांचा संभाळ करतो. त्यासाठी आपला भाव मात्र शुध्द पाहिजे, असे प्रतिपादन नारदीय कीर्तनाचे द्वितीय पुष्प गुंफताना पूर्वरंगामध्ये प्रशांतबुवा पांडव यांनी केले.



करकंब येथे श्रीचौडेश्वरी पौषपौर्णिमा उत्सवाच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या नारदीय कीर्तनाचे द्वितीय पुष्प ख्यातनाम कीर्तनकार प्रशांत बुवा पांडव यांनी गुंफले. सुरुवातीस श्रीचौंडेश्वरी मातेची पूजा, दीपप्रज्वलन प्रशांत बुवा पांडव, करकंबमधील पत्रकार बांधव, प्रभाकर टेके, धनंजय इदाते, बाळासाहेब वास्ते व ईतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पत्रकार दिनाचे औचित्य साधून लक्ष्मण शिंदे, ऋषिकेश वाघमारे, सचिन शिंदे, लक्ष्मण जाधव, राजेंद्र करपे, सुनील कोरके, गोपीनाथ देशमुख, सारांश थिटे, रोहन नरसाळे, नितीन खाडे, बाळासाहेब काशिद आदी पत्रकार बांधवांचा श्रीचौडेश्वरी मंदिर ट्रस्टच्यावतीने सन्मान करण्यात आला.

मनुष्याला जीवन जगत असताना संसार जरी सुटत नसला तरी त्या संसारतील सर्व कामे, कर्म करीत असताना भगवंताचे नामस्मरण करणे महत्त्वाचे आहे. मनुष्याचे जीवनात, पैसा, मानसन्मान, प्रेम करणारी पत्नी, ऐकणारा मुलगा, उत्तम आरोग्य, जन्ममरणाच दुःख यासाठीच जीवन जगत असला तरी या सर्व गोष्टी सर्वांकडे असतीलच असं सांगता येत नाही. मनुष्य मरेपर्यंत काहींना काही गोष्टीमुळं दुःखी असतोच त्यासाठी नामस्मरण करणे महत्त्वाचे आहे. उत्तररंगामध्ये महाभारतातील भिष्माचार्य यांचे आख्यान सांगताना त्यांच्या जीवनातील सुख-दुःखाच्या गोष्टी सांगत पाठीराखा श्रीकृष्ण असला की सर्व सुखदुःख कशी नाहीशी होतात. यावर अनेक दृष्टांत देत करकंबकर कलारसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांना संगीत साथसंगत तबला ज्ञानेश्वर दुधाणे, हार्मोनियम गंगाधर देव, टाळ माऊली पिसे, गायनसाथ प्रभाकर पांडव यांनी करत कीर्तनाला अधिक रंगत आणली.

#### महिलांसाठी स्पर्धा

महिलांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी पाककला स्पर्धा, झटपट स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांना महिलांचा उत्स्फूर्त, सुंदर प्रतिसाद मिळाला. पाककलेचे परीक्षण अपूर्वा थिटे, राहुल शिलवंत यांनी केले.

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## समाधान मेळ्याच्यावतीने आ. कल्याणशेट्टी यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्याचे आ. सचिन कल्याणशेट्टी व शांभवी कल्याणशेट्टी यांचा क्कलकोट समाधान मेळ्याच्या वतीने श्री गुरु जडेय शांतलिंगेश्वर म हाराजांची मूर्ती देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी समाधान मेळाव्याचे अध्यक्ष बसवराज माशाळे, प्रसिद्ध व्यापारी दत्तकुमार साखरे, सिद्धेश्वर किनगे, शिवकुमार कापसे, प्रमोद लोकापुरे, मोदी, अविनाश मंगरळे,



ओंकारेश्वर उडगे, राजू एकबोटे, म्हेत्रे, लक्ष्मीकांत धनशेट्टी, डॉ. सुनील बिराजदार, बाळकृष्ण श्रीकांत झिपरे उपस्थित होते.



# चंद्रभागा शुध्दीकरणासाठी सेबर आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानाचा वापर

### दररोज १५ एमएलडी पाणी शुद्धीकरण करुन चंद्रभागेत सोडले जाणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ९ जानेवारी-**

जेव्हा नव्हते चराचर । तेव्हा होते पंढरपूर ।। जेव्हा नव्हती गोदागंगा । तेव्हा होती चंद्रभागा ।। असे विठुरायाच्या वास्तव्याने पुनित झालेल्या तिर्थक्षेत्र पंढरपूर आणि येथील पवित्र चंद्रभागेचा म हिमा अनेक वारकरी सांप्रदायातील दिग्गज संतांनी वर्णिला आहे. हिच चंद्रभागा नदी गेल्या काही वर्षापासून मैली झाल्याची ओरड देखील सर्वत्र ऐकावयास मिळत होती. मात्र लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेली पंढरपूरची चंद्रभागा आता लवकरच शुध्द होणार आहे.



चंद्रभागेच्या पात्रातील पाणी शुद्धीकरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कंपनीशी करार केला आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दररोज १५ एमएल डी पाणी शुद्धीकरण केले जाणार आहे. येत्या २६ जानेवारी रोजी प्रत्यक्ष चंद्रभागा शुद्धीकरण करण्याचे काम सुरू होणार आहे. या प्रकल्पामुळे लवकरच भाविकांना स्वच्छ आणि शुद्ध पाण्यात स्नान करता येणार आहे. येथील चंद्रभागेचे स्नान हे पवित्र मानले जाते. दररोज हजारो भाविक चंद्रभागेत स्नान करतात. अनेक भाविक चंद्रभागेचे पाणी पवित्र तिर्थ म्हणून देखील प्राशन करीत असतात, ऐवढेच नव्हे तर हे पवित्र जल तिर्थ म्हणून आपल्या बरोबर गावी देखील शेकडो भाविक नेत असतात. अलीकडे चंद्रभागा स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आला होता.

चंद्रभागेचेपाणी शुद्धीकरण करण्यासाठी नदीपात्रात चार ठिकाणी पाणी शुद्धीकरण करणारे यंत्र बसवले आहेत. त्याद्वारे नदीतील पाणी शुद्धीकरण केले जाणार आहे. पाणी शुद्धीकरण प्रकल्पाचे काम जवळपास ९० टक्के पूर्ण झाले आहे. शुद्धीकरण प्रकल्पातून पाण्यामधील घातक बॅक्टेरिया मारायचे काम होणार आहे. येथील चंद्रभागा नदीपात्रात बसवलेला देशातील हा पहिलाच प्रकल्प आहे. सध्या नदीपात्रात पाणी शुद्धीकरण करणाऱ्या चार फ्लोटिंग बोटी बसवण्यात आल्या आहेत. या प्रकल्पासाठी सुमारे ३० कोटी रूपयांचा खर्च करण्यात आला आहे. यातून दररोज जवळपास १५ एमएलडी इतके पाणी शुद्ध करून परत चंद्रभागेत सोडले जाणार आहे. या प्रकल्पामुळे चंद्रभागेतील घातक विषाणू नष्ट होणार आहेत.

#### इंग्लडच्या सेबर टेक्नॉलॉजीचा वापर

चंद्रभागा नदी पात्रातील घाणीमुळे पाणी अस्वच्छ असते. याच अशुध्द आणि घाण पाण्यात भाविक स्नान करतात. त्यामुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न देखील समोर आलेला होता. येथील चंद्रभागा नदी स्वच्छतेचा प्रश्न वारंवार मांडला होता. त्यानंतर आता राज्य सरकारने चंद्रभागेतील पाणी शुद्धीकरण करण्याचे काम हाती घेतले आहे. यासाठी इंग्लंडच्या सेबर टॅक्नालिजीचा वापर केला आहे.

#### २६ जानेवारीला प्रकल्पाचे लोकार्पण

या चंद्रभागेतील पाणी शुध्दीकरण प्रकल्पाचे येत्या २६ जानेवारी रोजी लोकार्पण केले जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेतल्याने चंद्रभागा नदी पात्रातील पाणी शुद्धीकरणाचे काम सुरू झाले आहे.





# अकलूज येथे लेझीम स्पर्धेला प्रारंभ

### ५५ संघांचा सहभाग

### मुलींचे २७ संघही सादर करणार बहारदार खेळ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ९ जानेवारी-**

संग्रामसिंह मोहिते-पाटील मित्र मंडळ व शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या १९ व्या भव्य लेझीम स्पर्धेला मोठ्या दिमाखात प्रारंभ झाला.

विजय चौक येथे अकलूज बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते मैदान पूजन व अकलूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भानुदास निंभोरे, सपोनि विश्वास साळुंखे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून स्पर्धेला सुरुवात झाली. यावेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, मित्र मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील, दीपक खराडे-पाटील, प्रदीप खराडे-पाटील, रामचंद्र सावंत-पाटील, ॲड. प्रकाश पाटील, महादेव अंधारे, रावसाहेब पराडे, अभिजीत रणवरे, हर्षवर्धन खराडे-पाटील यांच्यासह सहकार महर्षी कारखाना, शिक्षण प्रसारक मंडळ व परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी म ोठ्या संख्येने उपस्थित होते. मदनसिंह मोहिते-पाटील म्हणाले, जयसिंह मोहिते-पाटील यांनी लेझीम खेळाला प्रोत्साहन दिले. ही ग्रामीण खेळाची परंपरा जतन करून वाढवण्याची भूमिका घेतली. मोबाईल आणि टीव्हीमुळे मुले मैदानावर खेळत नाहीत. स्पर्धेचा प्रारंभ प्राथमिक गटातील सहकार महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला वेळापूर संघाने आपला खेळ सादर करुन झाला. तीन दिवसात या स्पर्धेमध्ये प्राथमिक ५, मुले २३ व मुली २७ असे एकूण ५५ संघ आपला खेळ सादर करणार आहेत. सूत्रसंचालन किरण सूर्यवंशी, शकील मुलाणी यांनी केले. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकास रुपये ५ हजार, द्वितीय क्रमांक ४ हजार, तृतीय क्रम ांकास रुपये ३ हजार व सन्मानचिन्ह याचबरोबर उत्कृष्ट प्रशिक्षक, उत्कृष्ट हलगी वादक, उत्कृष्ट घुमके वादक, उत्कृष्ट सनई वादक यांनादेखील स्वतंत्र बक्षीस देण्यात येणार आहेत. मोफत भोजनाची सुविधाही देण्यात आली आहे.

#### ६० हजार खेळाडू तयार

मित्र मंडळांने स्पर्धेच्या माध्यमातून सुमारे ६० हजार खेळाडू तयार केले. या खेळाची गिनीज वर्ल्ड ऑफ रेकॉर्डमध्येही नोंद झाली. येणाऱ्या पिढीला हा सांस्कृतिक वारसा प्रेरणादायी ठरेल, असे विक्रम साळुंखे म्हणाले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन ठार, एक गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. ९ जानेवारी-**




अकलूज रोड ,देव वकील वस्ती नजिक पहाटे साडेपाच ते पावणेसहादरम्यान अज्ञात वाहनाच्या जोरदार धडकेने दोन जण जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली.



आज पहाटे साडेपाच ते पावणे सहा या दरम्यान चांगदेव किसन सर्जे (वय ५५, रा. ६१ फाटा, माळशिरस), दिलीप पंढरी कांबळे (वय ४५, रा. नेवरे, ता. माळशिरस), शंकर बळीबा देशमुख (रा. ६१ फाटा, माळशिरस) हे सर्वजण पहाटे अकलूज माळशिरस या रोडवर फिरत असताना सिताराम म हाराज आर्ट्स या दुकानाजवळ देव वकील वस्ती नजिक पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने चांगदेव किसन सर्जे व दिलीप पंढरी कांबळे हे जागीच ठार झाले तर शंकर बळीबा देशमुख हे गंभीररित्या जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी अकलूज येथील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

याबाबत चैतन्य मल्हारी सर्जे यांनी माळशिरस पोलिसात तक्रार दाखल केली आहे. पुढील तपास माळशिरस पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सपोनी जानकर साहेब करत आहेत.

# सांगोला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**सांगोला, दि.९ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या बी.एस्सी. (ई.सी.एस.) गुणवत्ता यादीत पहिले पाच विद्यार्थी सांगोला महाविद्यालयाच्या संगणक विभागातीलच आहेत.

यामध्ये प्रथम भिंगे प्रणाली कैलास, व्दितीय शिंदे पूजा बापूराव, तृतीय चव्हाण दिग्विजय चांगदेव, चतुर्थ पुजारी सरस्वती तुकाराम व पाचव्या स्थानावर म ोरे योगेश संजय आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, प्रा. पी. सी. झपके, खजिनदार नागेश गुळमिरे, सचिव ॲड. उदयबापू घोंगडे, सहसचिव साहेबराव ढेकळे, प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, संगणक विभागाचे प्रमुख डॉ. राजकुमार ताठे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# माळशिरस नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदी विजय देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ९ जानेवारी-**

माळशिरस नगर पंचायतीच्या नगराध्यक्षपदी विजय देशमुख (वस्ताद) यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

नगर पंचायतीच्या नगराध्यक्षा ताई वावरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर आज या रिक्त पदासाठी पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ प्रशांत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली. यामध्ये नगराध्यक्षपदासाठी



विजय बाजीराव देशमुख यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. या पदासाठी विजय देशमुख यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची नगराध्यक्ष पदी निवड झाल्याचे नि. नि. अधिकारी यांनी जाहीर केले. निवडीनंतर नूतन नगराध्यक्ष विजय देशमुख यांचा सन्मान करण्यात आला. या निवडणूक प्रक्रियेस माळशिरस नगरपंचायतीचे डॉ. कल्याणराव हुलगे यांनी मदत केली. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ. आप्पासाहेब देशमुख, महादेव देशमुख, शिवाजी देशमुख, सचिन वावरे, संतोष वाघमोडे, महादेव कोळेकर, शंकर करे, शशिकांत घुले, लाला बाजारे, रघुनाथ चव्हाण, प्रताप देशमुख उपस्थित होते. निवडीनंतर गुलालाची मुक्त उधळण करीत फटाक्यांच्या आतषबाजीत घोड्यावरून मिरवणूक काढण्यात आली.

# आगळगावातील लोकसेवा विद्यालयात मोहरला आंबा, चिंचही जोमात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ९ जानेवारी-**

तालुक्यातील आगळगाव येथील लोकसेवा विद्यालयातील केशर अंबा बाग मोहरली असून प्रतिष्ठान चिंचही जोमात आली आहे. शाळेत आंब्याची बाग असून केशर जातीची एकूण एकशे वीस झाडे तसेच प्रतिष्ठान चिंचेची सात वर्षांची २५ झाडे अतिशय जोमात आलेली आहेत. याच झाडाबरोबर फळांची मोसंबी, संत्री, लिंबोनी, पेरु, चिकू, पोपई, नारळ इत्यादी झाडे बहरात आली असून वड, पिंपळ, करंज, देवधर, काशीद, कडुलिंब, पिंपरण, नांदुर्गी, निलगिरी, शिसव, शिशु इत्यादी ३०० झाडेही जोमात वाढली आहेत.

इमारती समोरील लॉन्ससह सुंदर अशी गार्डन शाळेच्या सौंदर्यात भर पाडते आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागांतर्गत राष्ट्रीय हरित सेनेमध्ये शाळेचा समावेश असून शासनाच्या इको क्लब





व वृक्षारोपण संवर्धनाचे विविध उपक्रम यामध्ये शाळेचा सक्रिय सहभाग असतो. शालेय अभ्यासक्रमाबरोबरच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी शाळेत रेन वॉटर हार्वे स्टिंग, शाळेला विहीर, शाळेमार्फत बंधारा, शोषखड्डा, ओला कचरा, सुका कचरा व्यवस्थापन उपक्रम राबवीत आहे. शाळेच्या बागेत भाज्यांची लागवड केली असून त्याचा शालेय पोषण आहारात वापर केला जातो. शाळेला चार एकर परिसर असून आद्ययावत इमारत, सर्व वर्ग ई-लर्निंग, सहा हजार पुस्तकांचे ग्रंथालय, प्रयोगशाळा, विविध खेळांच्या मैदानासह सुंदर असा २०० मीटरचा ट्रॅक, ओपन जिम, अभ्यासिका आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, जॉईंट सेक्रेटरी अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, शालेय समितीचे अध्यक्ष डी. एम. मोहिते, प्रफुल्ल ओमन, सागर गरड यांचे मार्गदर्शन लाभते. प्रभारी मुख्याध्यापक सचिन उकिरडे, एम. पी. नाईकनवरे, शिक्षक पी. एम. शिंदे, ए. एस. टोपे, एस. सी. बचुटे, एस. डी. मोरे, एस. एम. मिरगणे, एन. बी. कोळेकर, ए. जे. सपाटे, ए. ए. कदम, आर. डी. गरड, आवतार एस. एम., गायकवाड, विठ्ठल लोंढे, एन. एस. हांगे, चंद्रकांत दोडमणी हे परिश्रम घेतात.

> आमच्या संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या विचारातून शाळेची वाटचाल चालू आहे. शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान २०२४ म ध्ये सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. निसर्ग वाचला तरच आपल्या सर्वांचे अस्तित्व आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रात विद्यार्थ्यांची प्रगती होण्याबरोबरच निसर्गपूरक शाळा घडवण्याचा आमचा मानस आहे.
>
> **- सचिन उकिरडे, प्रभारी मुख्याध्यापक, लोकसेवा विद्यालय, आगळगाव**

## संक्षिप्त वृत्त...



### हंजगी आश्रमशाळेचे क्रीडा स्पर्धेत यश

**अक्कलकोट, दि. ९ जानेवारी-**

इतर मागास बहुजन कल्याण विभाग सहाय्यक संचालक कार्यालय सोलापूर यांच्या वतीने सहाय्यक संचालक मनीषा फुले यांच्या प्रेरणेने जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा चिंचोली (ता. सांगोला) या ठिकाणी घेण्यात आल्या. यात हंजगी येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळेन यश मिळविले. भाग्यश्री मानके १७ वयोगट गोळा फेक द्वितीय, ४०० मीटर धावणे अश्विनी निकम द्वितीय, भाग्यश्री कोळी तृतीय, १०० मीटर धावणे प्रथम, भाग्यश्री कोळी द्वितीय रईसा मुल्ला, २०० मीटर धावणे प्रथम योगिता कोळेकर, कैलास राठोड १७ वयोगट गोळा फेक द्वितीय, थाळीफेक महेश कोळी द्वितीय, ४०० मीटर रिले द्वितीय, लांब उडी प्रथम योगिता कोळेकर, तृतीय क्रमांक ईश्वरी पाटील. यशस्वी सर्व खेळाडूंचे क्रीडा शिक्षक पी. बी. पाटील यांनी अभिनंदन केले.



### महसूल कर्मचारी संघटनेच्या मोहोळ तालुकाध्यक्षपदी जयंत कुलकर्णी

**मोहोळ, दि. ९ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या मोहोळ तालुकाध्यक्षपदी जयंत कुलकर्णी यांची तर सचिव म्हणून प्रवीण जगताप यांची निवड करण्यात आली. जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेच्या मोहोळ तालुका कार्यकारणीच्या निवडीसाठी बैठक घेण्यात आली. अध्यक्षस्थानी सावळेश्वर मंडळाधिकारी प्रकाश दळवे होते. अध्यक्ष जयंत कुलकर्णी, उपाध्यक्ष अजीज आवटे, कार्याध्यक्ष बी. एच. फुलारी, कोषाध्यक्ष गणेश सगेल, सचिव प्रवीण जगताप, संघटक अजित वाघमोडे, महिला प्रतिनिधी व्ही. आर. अधटराव, सारिका नवले, वनिता सुरवसे, सल्लागार जे. एफ. नदाफ, आणि बाबा कांबळे, प्रकाश दळवे, बसवराज सालीमठ, एम. एस. लोंढे हे मार्गदर्शक म्हणून काम करणार आहेत. यावेळी टी. डी. अडगळे, रमेश कारंडे, आशिष यादव, संगीता अष्टूळ, शहीदा नाईकवाडी यांनी सत्कार केला.



### आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यावतीने अक्कलकोटमधील पत्रकारांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ९ जानेवारी-**

आ. साचिन कल्याणशेट्टी यांनी पत्रकार दिनानिमित्त नागनहळ्ळी येथील आश्रमशाळेत तालुक्यातील सात पत्रकारांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी यशवंत धोंगडे, महेश हिंडोळे, संस्थेचे सचिव जावेद पटेल, प्राचार्य ईस्माईल मुजावर, मोहन चव्हाण, रजाक सय्यद, ननु कोरबू, प्रतिक मेहता, संस्थेचे उपाध्यक्ष जलील पटेल उपस्थित होते. पत्रकार योगेश कबाडे, नंदकुमार जगदाळे, स्वामीराव गायकवाड, रमेश भंडारी, बाबासाहेब निंबाळकर, चेतन जाधव, मारूती बावडे यांचा सत्कार करण्यात आला. रूद्राक्ष वैरागकर यांनी स्वागतगीत सादर केले. सूत्रसंचालन मनोज जगताप यांनी केले तर प्रास्ताविक मोहन गुरव यांनी केले.



### माणुसकी फाउंडेशनच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**अक्कलकोट, दि. ९ जानेवारी-**

गोविंद बाग येथे माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांच्या हस्ते माणुसकी फाउंडेशन अक्कलकोटच्या २०२५ दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. माणुसकी फौडेशनच्या कार्याचे माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी कौतुक केले. याप्रसंगी राजेफत्तेसिंह चौक गणेशोत्सव मंडळाचे जेष्ठ सदस्य नरसिंहराव क्षीरसागर यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी माणुसकी फाउंडेशन अध्यक्ष अनंत क्षीरसागर, उपाध्यक्ष आकाश शिंदे, सचिव आशिष हुंबे, बारामतीमधील सहकारी महेश गावडे उपस्थित होते.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भाजपा युवा मोर्चाच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात सुरू असलेल्या सदस्यता नोंदणी अभियान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण, युवा मोर्चा प्रभारी विक्रांत पाटील यांच्या आदेशावरून व आ. राणाजगजितसिंह पाटील, माजी आ. सुजितसिंह ठाकुर, जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांच्या मार्गदर्शनाखाली व युवा मोर्चाच्याचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांच्या नेतृत्वात भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रात युवा मोर्चाच्या वतीने सदस्य नोंदणी अभियान संपन झाले.

धाराशिव शहर परिसरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या अभियानात सहभागी होण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले.

यावेळी अरुण पाठक प्रदेश उपाध्यक्ष, राजसिंहा राजेनिंबाळकर जिल्हाध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चा धाराशिव, भाजप सरचिटणीस इंद्रजित देवकते, प्र.का.स. प्रविण पाठक, रमण जाधव, दर्शन कोळगे, धत्तुरे नाना, अमोल राजेनिंबाळकर, महेश बागल, मेसा जानराव, रोहित देशमुख ,गणेश एडके, सचिन लोंढे, तालुकाध्यक्ष अजित खापरे शहराध्यक्ष प्रसाद मुंडे, अतुल कावरे, विद्यार्थी जिल्हा संयोजक धनराज नवले, सुनिल पगुंडवाले, शहर संयोजक चैतन्य माने, सार्थक पाटील, आकाश कानाडे, नवनाथ सोलंकर, सम्यक माळाळे, अभिजीत पवार, यांच्यासह युवा मोर्चातील सहकारी, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



#### विद्यार्थी चित्रकला स्पर्धेत अव्वल

**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
शहरातील श्रीपतराव भोसले हायस्कूल येथील विद्यार्थी पी.एन.जी. आणि सन्स झुर्पुझा आर्ट गॅलरी पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या अंतराळ विषयावर चित्रकला स्पर्धेत ५ वी ते ७ वी गटात प्रथम क्रमांक पलाशा नलावडे ८ वी ते १० वी प्रथम सान्वी भोसले द्वितीय प्रणव कांबळे यास प्रविण्य मिळाल्याबद्दल प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवर, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक राजेंद्र जाधव, सुनील कोरडे, धनंजय देशमुख यांचे हस्ते पदक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. याप्रसंगी कलाध्याक शेषनाथ वाघ क्रीडाशिक्षक चंद्रकांत कवितकर उपस्थित होते. संस्थाध्यक्ष सुधीर पाटील, सरचिटणीस प्रेमा पाटील, मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य पाटील शिक्षक शिक्षकेत्तर यांनी अभिनंदन केले.



#### विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**उमरगा, दि.९ जानेवारी -**
येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरमध्ये वार्षिक आरोग्य तपासणी करण्यात आली. शहरातील स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर मधील इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या एकूण ६९२ मुला मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये उपजिल्हा रुग्णालय उमरगा येथील डॉ. माशाळकर पल्लवी, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर नितेश राठोड, औषध निर्माण अधिकारी फंड अश्विनी, आरोग्यसेविका सातपुते मीरा यांनी काम पाहिले. यामध्ये सर्व विद्यार्थ्यांची संपूर्णपणे आरोग्य तपासणी करण्यात आली व ज्या विद्यार्थ्यांना गंभीर आजार आहेत किंवा होण्याचा संभव आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांना उपजिल्हा रुग्णालय उमरगा येथे तपासणीसाठी व पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले.

# सव्वापाच लाख शेतकऱ्यांना मिळणार २५० रु. कोटींचा दिलासा

**आ. राणाजगजितसिंह पाटील**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
धाराशिव जिल्ह्यातील बहुतांश भागाला यंदाच्या खरिपात पावसाने झोडपून काढले. त्यामुळे जिल्ह्यातील प्रमुख नगदी पीक असलेल्या सोयाबीनच्या क्षेत्राला मोठा फटका बसला. परिणामी सोयाबीनच्या उत्पादनातही मोठ्या प्रमाणात घट दिसून आली आहे. खरिपातील मुख्य नगदी पीक असलेल्या सोयाबीनला सर्वाधिक फटका बसल्याने शेतकरी बांधवही अडचणीत सापडले आहेत. नुकसानीची पूर्वसूचना दिलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विम्यापोटी किमान रु. ६२०० ते ६५०० प्रती हेक्टरी सर्व मंडळांना मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या पावसामुळे शेतीचे आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

अतिवृष्टी आणि सततच्या पावसाने आर्थिक कोंडीत सापडलेल्या जिल्ह्यातील जिल्ह्यातील ५ लाख ४९ हजार ७९१ शेतकऱ्यांनी खरीप हंगामात ओढवलेल्या नैसर्गिक आपत्ती दरम्यान विमा कंपनीच्या निकषानुसार झालेल्या नुकसानीच्या पुर्वसुचना नोंदवल्या होत्या. नोंदविण्यात आलेल्या एकूण ५ लाख ३२ हजार ८२६ शेतकऱ्यांच्या पुर्वसुचना पात्र ठरल्या आहेत. पात्र ठरलेल्या या ५ लाख ३२ हजार ८२६ पूर्वसूचनांपैकी ४ लाख ७० हजार ७२ पुर्वसुचना एकट्या सोयाबीन पिकाच्या आहेत. वरील सर्व पात्र पूर्वसूचनांचा आढावा जिल्हास्तरीय समितीमध्ये घेण्यात आला आहे.

विमाकंपनीने मान्य केलेल्या या सर्व पात्र पूर्वसूचनांचा हेक्टरी रक्कम ६ हजार २०० ते ६ हजार ५०० रुपयांचा प्रस्ताव राज्य सरकारला सादर करण्यात आला आहे. लवकरच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हा हक्काचा विमा मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असून येत्या महिन्याभरात ही रक्कम शेतकरी बांधवांच्या खात्यात एकूण २५० ते २६० कोटी रुपये जमा होतील.

त्यासाठी आपला आग्रही पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.



**तुळजापूर :** शाकंभरी नवरात्रात तुळजाभवानी मातेस आज (दि.९) मुरली अलंकार महापूजा करण्यात आली.

## ग्रामीण भागातील खेळाडू ऑलिंपिकमध्ये चमकावीत : आ. स्वामी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.९ जानेवारी -**
लोहारा तालुक्यातील १२० शालेय विद्यार्थ्यांचे तीन दिवसीय निवासी क्रीडा शिबिर ज्ञान प्रबोधिनी संकुल, हराळी येथे ३ ते ५ जानेवारी या कालावधीत घेण्यात आले. ज्ञान प्रबोधिनी संस्थेच्या निगडी येथील क्रीडासंकुल या खेळाडू तयार करणाऱ्या शाळेतील ३० खेळाडू आणि प्रशिक्षक शिबिरासाठी आले होते.

शिबिरात विविध व्यायाम प्रकार आणि खेळ जसे की कबड्डी, खो-खो, थलेटिक्स, जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, योगासने याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मुलांना देण्यात आले. तसेच खेळाडूंचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य चांगले राखण्यासाठी योग्य आहार, सोपे आयुर्वेदीक उपचार, आरोग्याच्या चांगल्या सवयी आणि खिलाडूवृत्ती याबाबत मुलांना मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराचा समारोप दि.५ जानेवारी रोजी झाला. मुलांनी तीन दिवसात शिकलेल्या खेळांची प्रात्यक्षिके सादर केली. प्रमुख अतिथी आ. प्रवीण स्वामी यांनी मुलांचे कौतुक केले आणि भविष्यात या ग्रामीण मुलांमधून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार होतील, असा विश्वास व्यक्त केला.

## शाकंभरी नवरात्रात तुळजाभवानीस मुरली अलंकार महापूजा



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ जानेवारी -**
महाराष्ट्राची कुलस्वामीनी आई तुळजाभवानी मातेचा शाकंभरी नवरात्र महोत्सव सुरु असून दि.९ जानेवारी गुरुवार रोजी तिसरी माळ असल्यामुळे देवीजींना मुरली अलंकार महापूजा बांधण्यात (मांडण्यात) आली आहे.

पार्वतीचे रूप म्हणजे तुळजाभवानी देवीला तुळजा, तुळजाभवानी, महिषासुर मर्दिनी, अंबाबाई अशी किती तरी नावे आहेत. तुळजाभवानी मातेने महिषासुर दैत्याचा वध केल्यानंतर सर्व ऋषी-मुनी त्रासातून मुक्त झाले, तेव्हा भगवान श्रीकृष्णाने आपली मुरली देवीस अर्पण केली. त्यामुळे त्या क्षणाची आठवण म्हणून आज पण मातेस मुरली अलंकार पूजा बांधली जाते. देवीने मुरली वाजवल्यानंतर स्वर्गातील भयभीत देव-देवता स्वर्गप्राप्तीचा आनंद घेऊ लागले. तर शाकंभरी नवरात्र महोत्सवानिमित्त श्री तुळजाभवानी देवीचा बुधवारी रात्री दुसऱ्या माळेच्या दिवशी वाजत गाजत भक्तीभावाने गरुड वाहनांवरुन छबिना काढण्यात आला.

**तुळजाभवानी मंदिरात बुधवारी रात्री गरुड वाहनावरून देवीचा छबिना...**

यावेळी शाकंभरी नवरात्र महोत्सवाचे मुख्य यजमान, पुजारी, सेवेकरी भाविक-भक्त मंदिर कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

## टॉवर लाइनच्या गुत्तेदाराची शेतकऱ्यास जीवे मारण्याची धमकी



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.९ जानेवारी -**
अणदुर (ता. तुळजापुर) येथील शेतकरी सदानंद खंडेराव येळकोटे यांच्या गट नं. २५०/१ मधील शेतीमध्ये त्यांच्या संमतीविनाच टॉवरचे काम सुरु केले आहे. शेतकऱ्याने याबाबत विचारणा केली असता पोकलेन मशिन चालकाने अरेरावीची भाषण वापरून अंगावर पोकलेन घालण्याचा प्रयत्न केला. यानंतर संबंधीत शेतकरी सदानंद येळकोटे यांनी याबाबत धाराशिव जिल्हाधिकारी व नळदुर्ग पोलिस ठाणे यांना निवेदन देऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सदरील काम B.N.C. पॉवर प्रा. लि. या कंपनीचे आहे. कंपनीचे अधिकारी दुष्यंत यांना या कामासंदर्भात विचारले असता उडवा-उडवीची उत्तरे दिली व शेतकऱ्याकडे खाजगी गुंड पाठवुन दमदाटी केली असे शेतकरी सदानंद येळकोट यांनी माहिती दिली आहे.

राज्यात परळी पॅटर्न गाजत असतानाचं त्याचे लोन आता तुळजापुर तालुक्यात आले आहे की काय असा संशय या घटनेवरून येत आहे. या घटनेमुळे संबंधीत शेतकरी दहशतीखाली असल्याचे दिसुन येत असुन यांच्या जिवीतास धोका असल्याची भिती त्यांनी बोलुन दाखविली आहे.

त्यामुळे कांही विपरीत घडण्याअगोदर जिल्हा प्रशासन व नळदुर्ग पोलिसांनी यासंदर्भात तात्काळ चौकशी करून यामध्ये जे दोषी आहेत त्याच्यावर कडक कारवाई करणे गरजेचे आहे.

## महावितरण सबस्टेशनचा मनमानी कारभार; लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज

**शेतकऱ्यांना मिळते दिवसात तीन ते चार तास वीज... ग्रामस्थ दोन-दोन दिवस अंधारात...**

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.९ जानेवारी -**
राज्यात यंदा समाधानकारक पाऊस झालेला आहे. विहीर, बोर तलावामध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे बळीराजा वरून राजावर आनंदी आहे. चालू रब्बी हंगामातील शेतकऱ्यांची पाण्याची चिंता मिटलेली आहे. आता शेतकऱ्यांनी पिकास पाणी देण्यास सुरुवात केली आहे. मात्र महावितरण कंपनीच्या (सबस्टेशन) च्या भोंगळ आणि मनमानी कारभारामुळे शेतात पाणी असून देखील शेतकऱ्यांना पिकास पाणी देता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील महावितरण कंपनी (सबस्टेशन) च्या भोंगळ कारभारामुळे नागरिक व शेतकरी त्रस्त झाले आहेत. मागील अनेक दिवसांपासून तेरखेडा सबस्टेशन चा वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. या सबस्टेशन वरून वीज पुरवठा खंडित झाल्यास शेतकऱ्यांना अर्धा-अर्धा दिवस वीज पुरवठा मिळत नाही. तर गावकऱ्यांना कधीकधी दोन-दोन दिवस अंधारात राहावे लागत आहे. सध्या कडाक्याच्या थंडीचे दिवस सुरू आहेत. शेतकऱ्यांची पिकांना पाणी देण्याची सुघी सुरू असून रात्रीच्या काळात शेतकऱ्यांना शेतात लाईटची वाट पाहत बसावी लागत आहे. त्यात मागील काही दिवसांपासून बिबट्या, वाघ, रानडुक्करांनी दहशत निर्माण केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. हाता तोंडाशी आलेले पीक पाण्याअभावी हिरावून जाऊन नुकसान होऊ नये म्हणून शेतकरी कितीही मोठे संकट आले. तरी विजेची वाट बघत बसत आहे. परंतु अधिकारी मूग गिळून गप्प बसले आहेत. अधिकारी यांना कसलीच शेतकरी, नागरिकांची चिंता नाही. सतत वीज पुरवठा खंडित होणे, तारा तुटणे, फ्युज जाणे, डिओजाने, विद्युत खांब पडणे यासारख्या अनेक समस्यांना गावकऱ्यांना, शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे. अधिकारी २४ तास ४४० च्या करंट रूम मध्ये राहत आहेत. तर शेतकरी हिकडे चार्जिंगची बॅटरी घेऊन रात्रभर थंडीत पिकांना पाणी देण्यासाठी शेतात विजेची वाट बघत आहेत.

तर गावकऱ्यांना घरत मोबाईलची बॅटरी लावावी लागत आहे. विज नसल्याने कधीकधी मोबाईल देखील दिवस-दिवस बंद असतात. शेतकऱ्यांच्या, नागरिकांच्या या समस्येकडे कोणीही लक्ष देत नसल्याने सर्वत्र संतप्त भावना व्यक्त केले आहे. तेरखेडा सबस्टेशन वरून तेरखेडा, खामकरवाडी, सटवाईवाडी, कडकनाथवाडी, वडजी, इंदापूर, बोरी या गावांना शेतीसाठी आणि गावासाठी वीज पुरवठा होत आहे. वीज पुरवठा खंडित झाल्यात शेतकऱ्यांनी, गावकऱ्यांनी महावितरण सबस्टेशनमध्ये विचारणा केली असता. कळंब येथून लाईट गेली आहे. विद्युत खांब पडला आहे. सबस्टेशन मध्ये जाळ झाला आहे. दोन तासाने येईल, रात्रभर येणार नाही. आता येईल मग येईल अशी उत्तरे मिळत आहेत.

परंतु या निमित्ताने असा प्रश्न निर्माण होतो की, महावितरण कंपनी वर्षभर मेंटेनन्सची कामे खाजगी कंत्राटदारामार्फत करत असते. मग सतत विजेचा प्रश्न का निर्माण होतात? का मेंटेनन्स ची कामे ही ठेकेदार व अधिकारी संगनमत करून कागदावरच केली जातत? अश्या कामांचा शेतकरी व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. आता लोकप्रतिनिधी या प्रश्नाकडे कसे पाहतात हे बघणे गरजेचे आहे.

# तुळजाभवानी मंदिर परिसरात ‘नो बॅनर झोन’ ; डिजीटल बॅनर्स लावण्यासाठी प्रतिबंध

**क्यूआर कोड शिवाय बॅनर लावल्यास कारवाई... विनापरवानगी कोणतीही जाहिरात होर्डिंग बॅनर दिसल्यास फौजदारी गुन्हा दाखल होणार...**



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.९ जानेवारी -**
जनहित याचिका क्र.१५५/२०११ मधील आदेशानुसार शहरातील डिजिटल, पोस्टर, बॅनर यावर कारवाई करणे बाबत दि.७ जानेवारी रोजी नगरपरिषद कार्यालयामध्ये बैठक आयोजित केली होती. या बैठकीमध्ये उपस्थितांना मार्गदर्शक सूचना व नियमावली वाचून दाखवली.

शहराच्या विविध भागांमधे बॅनर, फ्लेक्स लावायचे आहे. ते ठिकाणी निश्चित करून देऊन, त्याबाबतची माहिती दिली. या शिवाय ज्या ठिकाणी अशा प्रकारचे फ्लेक्स डिजिटल बॅनर इत्यादी लावता येणार नाहीत अशा ठिकाणांची यादी सुद्धा उपस्थितांना वाचून दाखवली. अशा प्रकारच्या अस्ताव्यस्त व अनाधिकृत फ्लेक्स, डिजिटल बॅनर यात मोठ्या प्रमाणात जिवीत हानी झालेली आहे. तुळजापूर हे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीचे पवित्र तिर्थक्षेत्र असल्यामुळे येथे मोठ्या प्रमाणावर भाविक-भक्त दर्शनासाठी येतात.

आशा प्रकारे केलेल्या जाहिरातीमुळे शहराच्या विद्रुपीकरणात वाढ होते. तसेच महाराष्ट्रात अनेक ठिकाणी यामुळे अपघात होऊन दुर्घटनाही झाल्या आहेत. भक्तामध्ये नाराजीचा सूर दिसतो. आपले शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी सर्व नागरीक, राजकीय पक्ष, संघटना यांनी सहकार्य करुन त्यांचा सहभाग वाढला पाहिजे असेही मुख्याधिकारी यांनी बैठकीत सांगितले.

क्यूआर कोड शिवाय कोणतीही जाहिरात दिसल्यास संबंधित व्यक्ती व कंत्राटदार यांच्यावर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा केला जाईल. बैठकीमध्ये व्यावसायिक व पत्रकार उपस्थित होते. तर राजकीय पक्ष व संघटना यांना निमंत्रित केलेले असताना सुद्धा, कोणीही या बैठकीस उपस्थित नव्हते.

शेवटी मुख्याधिकारी यांनी जनहित याचिका क्र.१५५/२०११ मधील मार्गदर्शक तत्त्वावर नुसार उचित कार्यवाही करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन नागरिकांना केले आहे.

तुळजापूर शहरात डिजीटल बॅनर्स लावणेसाठी प्रतिबंध करण्यात आलेल्या जागा (NO BNNFR ZONE) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर, भवानी रोड, श्री तुळजाभवानी मंदीर परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, तुळजाभवानी मंदीर ते आर्य चौक ते कमान वेस, वरील भागात कोणीही बॅनर लावल्यास त्यांच्यावरती कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

तुळजापूर शहरात डिजीटल बॅनर्स लावणेसाठी निश्चीत करण्यात आलेल्या जागा गोलाई चौक नळदुर्ग रोड- पंचायत समिती समोर जनता बँक समोर, बोरगांव कॉम्प्लेक्स समोर, एस.टी कॉलनी रोड, लोहिया रोड, श्री. तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय समोर, लातुर रोड-बाजार समिती समोर, नविन बसस्थानक समोर, विश्वनाथ कॉर्नर जवळ धाराशिव रोड-तुळजापूर खुर्द कॉर्नर, उध्वराव पाटील सभागृह समोर, बाबजी लाकडाचा अड्डा कॉर्नर, राज पॅलेस कॉर्नर, इच्छापूर्ती गणपती चौक, अग्निशमन चौक, क कॉर्नर, अपसिंगा रोड कॉर्नर, धाराशिव रोड कॉर्नर, जुना हडको, मारुती मंदीर चौक, घोगरे हॉटेल जवळ, जिजामाता चौक, हनुमान चौक बाजार रस्ता.

धाराशिव
# जिल्हा
**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पी.एन.जी. आणि सन्स, चित्रकला स्पर्धा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
शहरातील सरस्वती विद्यालय येथे चन्द्र, सूर्यमाला, मंगल ग्रह, तारे व तसेच अंतराळ वीर असे अनेक चित्रे बाल चित्रकारानी आपल्या कुंचल्यातुन साकारल्या. निमित्त पी.एन.जी. आणि सन्स व झपूर्झा कला व संस्कृति संग्रहालयाच्या यांच्या संयुक्त विद्यमानाने विविध वयोगटातील विध्यार्थ्यासाठी आयोजित चित्रकला स्पर्धेचे धाराशिव येथे नुकत्याच झालेल्या स्पर्धेस मुलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

सुमारे १६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पु. ना. गाडगीळ आणि सन्स धाराशिव शाखेचे व्यवस्थापक अरुण कोरुलकर, कुलदीपसिंह राजपूत, सर्व कर्मचारी वृंद पालक आदि उपस्थित होते. दोन वयोगटातील स्पर्धेतून विजेते घोषित करण्यात आले. इयत्ता ५ वी ते ७ वी: प्रथम पलाशा नलावडे, द्वितीय करण मोहिते, तृतीय रिदिमा ढेकणे. उत्तेजनार्थ अथर्व कुलकर्णी, श्रेया जाधव ,मनस्वी पडवळ. इयत्ता ८ वी ते १० वी प्रथम सान्वी भोसले, द्वितीय प्रणव कांबळे, तृतीय- ऋषिकेश अंबुरे. उत्तेजनार्थ योगेश्वरी रणदिवे, प्रणिता सोंडे, सारा माने यांना सरस्वती हायस्कूलचे मुख्याध्यापक संजय पवार, श्रीपतराव भोसलेचे कलाध्यापक शेषनाथ वाघ यांच्या हस्ते बक्षीस मिडल व प्रमाणपत्र देण्यात आले.

सुत्रसंचालन अजय गायकवाड यांनी केले तर आभार राजकुमार यांनी मानले.



# व्यक्तिमत्व विकासात अवांतर पुस्तक वाचनाचा खूप मोठा वाटा : प्रा. सुनीता गुंजाळ

**‘वाचन संकल्प महाराष्ट्राचा ‘ या अभियान अंतर्गत अभियांत्रिकी महाविद्यालयात कथन कार्यक्रमाचे आयोजन...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
समाजामध्ये प्रत्येक जण शिक्षित असला तरीही ठराविक व्यक्तिमत्त्वाचीच छाप ही समाजावर पडते. कारण ज्यांना आपले विचार प्रगल्भपणे समाजासमोर मंडता येतात त्याच लोकांना समाज लक्षात ठेवतो. आणि असे विकसित व्यक्तिमत्व घडविण्यात अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर पुस्तकांचा खूप मोठा वाटा असतो, असे प्रतिपादन येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथपाल तथा लेखिका आणि कथाकार प्रा. सुनीता गुंजाळ यांनी केले.

डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्र शिक्षण विद्यापीठ लोणेरे यांनी राबविलेल्या वाचन संकल्प महाराष्ट्राचा या अभियाना अंतर्गत त्या बोलत होत्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, कार्यक्रम समन्वयक व बेसिक सायन्स अँड हुमानिटीच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ. उषा वडणे, प्रा. नाईकवाडी, प्रा. वर्षा पाटील, प्रा. आरती शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या अभियाना अंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये १ जानेवारी २०२५ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा हे अभियान राबविले जात असून यामध्ये महाविद्यालयीन आणि विद्यापीठ स्तरावरचे विद्यार्थी तसेच कर्मचारी यांनी शैक्षणिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर पुस्तकांचे वाचन करणे अपेक्षित आहे.

विद्यार्थ्यांना वाचन प्रेरणा देण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर सद्या अनेक उपक्रम राबविले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून येथील अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत ’कथन या विषयावर प्रा. सुनीता गुंजाळ बोलत होत्या.

यावेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या की समाजामध्ये अनेक इंजिनियर्स, डॉक्टर्स, उच्चपदस्थ अधिकारी आहेत पण जे अवांतर वाचन करून स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करतात त्यांची समाजावर एक वेगळीच छाप पडलेली दिसून येते. प्रत्येक वाचक हा नेता होत नाही पण प्रत्येक नेता हा उत्कृष्ट वाचक असतो. हे आपण निरीक्षण केल्यावर सहज लक्षात येईल. त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचन केले पाहिजे. वाचनाच्या सवयीमुळे आपण दुःखापासून सुद्धा दूर होऊन पुस्तकांच्या दुनियेमध्ये हरवून जातो आणि पुस्तक आपले कधी मित्र बनतात हे आपल्यालाही कळत नाही.

या प्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की सध्याची पिढी ही मोबाईल तसेच इंटरनेट माध्यमातून भरकटत असून अवांतर वाचन हे खूप कमी झालेले आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक विकाराला बळी पडत आहे. त्यांना वेळीच सावरणे गरजेचे आहे.

त्यामुळेच विद्यापीठ स्तरावरून हे उपक्रम राबविले जात आहेत. प्रत्येकाने अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचन करावे हे यामध्ये अपेक्षित आहे. यावेळी कार्यक्रम समन्वयक डॉ. उषा वडणे म्हणाल्या की अभियांत्रिकीचे विद्यार्थी हे निश्चितपणे हुशार असतात, टेक्निकल गोष्टीमध्ये सक्षम असतात त्यामुळे माध्यम कुठलही वापरा पण वाचनाची आवड ही मनापासून जोपासली पाहिजे. पुस्तके सहज उपलब्ध होतात ती विकत घेऊन सुद्धा प्रसंगी वाचली पाहिजेत. यावेळी विद्यार्थ्यांनी वाचलेल्या अनेक पुस्तकांचे रसग्रहण करून कथन करण्याचा प्रयत्न केला त्याचे संकलनही महाविद्यालयीन स्तरावर केले जात आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वर्षा पाटील यांनी केले तर आभार प्रा. आरती शिंदे यांनी मांनले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परंडा येथे रेशन कार्डसाठी सर्वसामन्य नागरिकांचे हेलपाटे

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.९ जानेवारी -**
परंडा शहर व तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना रेशन कार्डसाठी तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. रेशन कार्ड वेळेवर मिळत नसल्याने तहसील पुरवठा विभागाचा सावळा गोंधळ सुरू असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला जात आहे.

परंडा शहर व तालुक्यातील नागरिक हे रेशन कार्ड शिधापत्रिकेसाठी सीएससी सेंटर व महा-ई-सेवा केंद्र येथून ऑनलाईन अर्ज करत असतात. पण नागरिक ऑनलाईन अर्ज करूनही त्यांना दोन-तीन महिने रेशन कार्ड मिळण्यास लागत आहेत. विविध शासकीय कामांसाठी, शैक्षणिक कामांसाठी रेशन कार्डची गरज नागरिकांना असते. गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांना रेशनधान्य मिळविण्यासाठी रेशनकार्डची गरज असते. महा-ई-सेवा केंद्र अथवा सीएससी सेंटर मधून रेशन कार्डसाठी अर्ज करूनही वेळेवर रेशनकार्ड मिळत नसल्याने नागरिकांना रेशन कार्डसाठी तहसील कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना, निराधार महिलांना व घरकूलसाठी रेशन कार्ड वेळेवर मिळत नसल्याने मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. याबाबत सीएससी सेंटर चालकांना विचारणा केली असता शासनाचे सर्वर बंद असल्याने रेशनकार्ड मिळण्यासाठी वेळ लागत आहे असे सांगितले जाते. ऑनलाइन रेशन कार्डला मंजुरी देण्याचे काम तहसील कार्यालय पुरवठा विभागातून केले जाते. उलसूलट चर्चा नागरिकांत सुरू आहे. रेशन कार्ड वेळेवर मिळत नसल्याने सर्व सेवा केंद्रांवर अथवा महा-ई-सेवा केंद्रांवर येऊन नागरिक हे विचारणा करत आहेत.

तहसील कार्यालयातील पुरवठा विभागाने वेळेवर रेशन कार्ड वितरित करण्याची मागणी रेशन कार्ड धारकातून केली जात आहे. तसेच शहरातील दुकाने चालू किंवा बंदचा बोर्ड दुकानावर लावलेला नाही. संबंधित आधिकारी यांनी दुकान चालूची वेळ लिहिण्यासाठी सांगावे, अशी मागणी सर्व सामान्य जनतेतून होत आहे.

## कै.डॉ.के.डी. शेंडगे यांनी वैद्यकीय सेवेचा व समाजकार्याचा आदर्श निर्माण केला : प्रा. बिराजदार



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ जानेवारी -**
उमरगा तालुक्यातील प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक तथा के.डी. शेंडगे इंग्लिश स्कूलचे संस्थापक दिवंगत केळी शेंडगे यांच्या सोळाव्या स्मृतिदिनानिमित्त उमरगा येथील डॉ.के.डी. शेंडगे आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयात डॉ.आर. डी. शेंडगे यांच्या अध्यक्षतेखाली व राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा .सुरेश दाजी बिराजदार यांच्या प्रमुख उपस्थितीत तथा डॉ. सचिन शेंडगे, विनायक माने, आर.एस. पाटील, मीलन पुदाले, दुधभाते प्राचार्य डॉ. नितीन सानप, प्राचार्य व्ही.जी. तडोळगे यांची उपस्थिती होती.

शहरातील शेंडगे आयुर्वेदिक महाविद्यालयात डॉ.के.डी. शेंडगे यांच्या सोळाव्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. के.डी. शेंडगे यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख पाहुणे प्रा. सुरेश दाजी बिराजदार यांच्या व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर धन्वंतरी वंदना घेण्यात आली. अनेक विद्यार्थ्यानी आपले मनोगत व्यक्त करत श्रध्दांजली अर्पण केली.

समाजामध्ये विवीध यशाचीशिखरे पदाक्रांत करत असताना सामाजिक भावना जपने महत्वाची आहे.

ज्यांची कुवत नाही अशा लोकांसाठी काहीतरी केल पाहीजे हीच खरी समाजसेवा. प्रचंड संघर्ष करत आर्थिक संकटांना तोंड देत वैद्यकीय क्षेत्रात सेवा करत समाजाच ऋण फेडण्यासाठी शैक्षणिक संस्थांची निर्मिती केली. अनेक गरजू पिडीत रुग्णांना मदत केली. त्यांच्या या समाजकार्याचा आदर्श आपण सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. आर.डी. शेंडगे यांनी बोलताना कोणताही विद्यार्थी कमी नसतो. वाचन, संघर्ष याला पर्याय नाही. डॉ.के.डी. शेंडगे यांनी शेवटच्या दिवसात हॉंगकॉंग येथे उपचार घेत असताना मला तेथे देण्यात येणाऱ्यां वैदकीय सेवेचा सिस्टीमचा अभ्यास करण्यास सांगीतले यातच त्यांचे वैद्यकीय सेवे बद्दलचे समर्पण आपणास दिसुन येते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन सानप यांनी प्रास्तावीक केले.

विनायक माने यांचे भाषण झाले तर सुत्रसंचलन कृष्णा गोरे आभार प्रा.पी.डी. पवार यांनी मानले. यावेळी मोठया संखेने विद्यार्थी विद्यार्थीनी व शिक्षक स्टाफ उपस्थीत होता.

## परंडा पोलीस ठाणे यांच्या वतीने वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.९ जानेवारी -**
पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य मुंबई मार्फत निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांप्रमाणे पोलीस अधिक्षक संजय जाधव, अपर पोलीस अधिक्षक गौहर हसन, उपविभागीय पोलीस अधिकारी गौरीप्रसाद हिरेमठ यांचे मार्गदर्शनाखाली दि.२. जानेवारी रोजी ते दि.८ जानेवारी या कालावधीत महाराष्ट्र पोलीस दलाचा वर्धापन दिनानिमित्त पोलस ठाणे परंडा कडुन वेगवेगळे उपक्रमाचे आयोजन करून साजरा करण्यात आला.

सदर सप्ताहात पोलीस ठाणे परंडा अधिकारी व कर्मचारी यांचेकडुन शाळा तसेच महाविदयालयास भेटी देवुन, पोलीस विभागाची माहिती देण्यात आली तसेच महिला व मुलीच्या स्वसंरक्षण तसेच महिलांवर होणारे अत्याचार याविषयी माहिती देण्यात आली.

त्याचप्रमाणे परंडा शहरात वर्धापन दिनानिमित्त शालेय विदयार्थ्यांची रॅली काढुन सामाजिक सुरक्षा तसेच वाहतुक सुरक्षा, वाहतुकीचे नियम व सुरक्षित वाहतुक या विषयी जनजागृती करण्यात आली.

सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी पोलीस ठाणे परंडा येथील सर्व अधिकारी व अंमलदार यांनी परिश्रम घेतले.

त्याच बरोबर शिवाजी महाविदयालचे मुख्याध्यापक लोखंडे, ग्लोबल एज्युकेशनल इन्स्टिट्युट प्राथमिक उच्चप्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा,

परंडा परंडाचे संस्थापक गोरख मोरजकर व सचिव तथा मुख्याध्यापिका आशाताई मोरजकर यांनी पोलीस दलाकडुन करण्यात येत असलेल्या कार्याबदल आत्मियता व्यक्त केली.

तसेच खाकी वर्दीतील आदर्श व्यक्तिमत्व म्हणजे विनोद इज्जपवार असे संबोधुन महाराष्ट्र पोलीस दलाचे आभार मानले.

## पत्रकारांच्या निर्भीड कार्याची कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक : सुनिल राठोड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ जानेवारी -**
पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, ज्यामुळे समाजात सत्य, पारदर्शकता आणि जबाबदारी यांची रुजवण होते. सर्व पत्रकार धाडस आणि जिद्द ठेवून प्रत्येक परिस्थितीत सत्याचा पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्नशील असतात ते खरोखरच कौतुकास्पद आहे.

या सत्कार समारंभाचा उद्देश तुमच्या या अमूल्य कार्याला दाद देण्याचा आहे. प्रामाणिक पत्रकारितेचा हा प्रवास असाच चालू राहो, असे मनोगत कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा रोटरी क्लबचे सचिव सुनील राठोड यांनी व्यक्त केले.

मुरूम शहरातील महात्मा बसवेश्वर पतसंस्थेच्या सभागृहात रोटरी क्लब मुरुम सिटीच्या वतीने पत्रकार दिनाच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे सचिव सुनील राठोड होते.

यावेळी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष कवी शिवशरण वरनाळे, मुरूम पत्रकार संघाचे अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष प्रा.डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा.डॉ. अप्पासाहेब सूर्यवंशी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर व समतानायक महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले.



डॉ. नितीन डागा, प्रकाश रोडगे, शिवकुमार स्वामी, डॉ. सुनील टिकांबरे, विजयकुमार कलशेट्टी, भूषण पाताळे, बाबासाहेब पाटील, मल्लिकार्जुन बदोले आदींनी परिश्रम घेतले.

शहर व परिसरातील पत्रकार राजेंद्र घोडके, राजेंद्र कारभारी, रफिक पटेल, प्रा. डॉ. महेश मोटे, रवी अंबुसे, मोहन जाधव, बालाजी व्हनाजे, नहीरपाशा मसुलदार, हुसेन नुरसे, अजिंक्य मुरूमकर, इमरान सय्यद, अमोल कटके सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य कल्लया स्वामी यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार राजेंद्र वाकडे यांनी मानले.

## खामसवाडीच्या बालमेळाव्यातून चिमुकल्यानी विकले जामुन, वडापाव ते दही-धपाटे; हजारो रुपयांची कमाई

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.९ जानेवारी -**
शाळा नसते केवळ खडू आणि फळा,शाळा म्हणजे असते विद्यार्थ्यांचा लळा. जिथे हृदय फुलतात, मने बहारतात ती शाळा म्हणजे सांस्कृतीचा मळा, वेगवेगळ्या कलागुणांचा जमलं येथे मेळा तोच पाहण्यासाठी आनंदमेळ्यात झाले सगळे गोळा. आपल्या लहानाचे कौतुक आपण करावे अस कधी होणार नाही. लेकरांना व्यावहारिक व सामाजिक याचे ज्ञान व्हावे म्हणुन बालआनंद मेळाव्याची संकल्पना पुढे आली.याच हेतूने खामसवाडी ता.कळंब येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत बालआनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या बालमेळाव्याचे उद्घाटन सरपंच अमोल पाटील यांनी केले. यावेळी शालेय समितीच्या अध्यक्षा रोहिणी माळी उपाध्यक्षा सौ.भाग्यश्री रोहिले अब्याकस शिक्षण उपक्रमाच्या कुंदा कोरे (तडवळा), केंद्रप्रमुख अशोक डिकले, प्रशांत निन्हाळ, मुख्याध्यापक शिवराज बाकले, शिक्षक बाबर, माने-माळी, शेळके, मोरे, कराळे, मडके व लोखंडे या शिक्षकांनी नियोजन केले. गावतील नागरिक, पालक विशेषतः महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सर्व प्रकारच्या पालेभाज्या, पेरू, बोरे, केळी यासह आदी प्रकारची फळे बालकांनी विक्रीसाठी ठेवली.

पेढा, बर्फी गुलाबजामुन या स्वीट पदार्थासह भेळ, पाणीपुरी, पोहे, इडली, ढोकळा, भजे, वडापाव हे ऍटम असल्याने खाद्यप्रेमी नागरिक, महिलांनी याचा आस्वाद घेतला हे विशेष.! पाणीपुरी भेळ याची मुलामुलींनी टेस्ट घेतल्याने याची विक्री जास्तच दिसली. या मेळाव्यात जेवणाच पण आल्याने वेगळेपण दिसले. यात आकर्षक, लज्जतदार होते ते दही-धपाटे.! यावर पण खाद्यप्रेमी खुश कांही नागरिकांनी तर हे दही-धपाटेचे पार्सल पण नेहले.

याचबरोबर या मेळाव्यात पापड, लोणचे आदीचे पण विक्रीचे छोटेखानी स्टॉल होते. सदरील बालमेळाव्यातून बालकांना व्यावहारीक, आर्थिक, सामाजिक ज्ञानाचे महत्व कळण्यास मदत झाली. या बालमेळाव्यात अपेक्षेपेक्षा मोठ्या उत्साहात बालकांनी वेगवेगळे खाद्यपदार्थ, स्वीट ऍटम, फळे, पालेभाज्या विक्रीसाठी आणल्या होत्या.

सामाजिक जिवनात आपल्याला पाहुणचार म्हणलं की पाणी चहा हा लागतोच. असाच पाहुणचार हॉटेल चहाचे येथे पहायला मिळाले. यात विशेष होते पाणी बाटली विकणारा बालक. पाणी प्या-बिसलेरी घ्या पाणी प्या असे म्हणत गमतीने किंमत सांगत फिरताना दिसला.

या बालआनंद मेळाव्यातून बालकांनी उधार कोणालाच दिले नाही अगदी शिक्षक, पालक यांनी सुद्धा रोखीनेच व्यवहार केला.बालकांनी यातुन हजारो रुपयांची खरी कमाई केली हे विशेष..!

## एचएमपीव्ही विषाणुबाबत आरोग्य यंत्रणा सज्ञ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.९ जानेवारी -**
सध्या चीनमध्ये कीरपचशींरपिर्शीीोंळपळी एच.पी.एम.वाय विषाणूचा उद्रेक झाल्याच्या बातम्या येत आहेत.या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. आरोग्य यंत्रणेकडून नागरिकांना काय करावे आणि काय करू नये याबाबत आवाहनही करण्यात आले आहे.

मानवी मेटान्यूमोव्हायरस हा एक सामान्य श्वसन विषाणू आहे. ज्यामुळे व श्वसनमार्गाच्या वरील भागातील संसर्गास (सर्दीसारख्या कारणीभूत ठरते. हा एक हंगामी रोग आहे. आरएसव्ही आणि फ्लूप्रमाणेच हिवाळा आणि उन्हाळयाच्या सुरुवातीला उद्भवतो. डीजीएचएस आणि संचालक, एनसीडीसी. दिल्ली यांनी एक निवेदन प्रसिध्द केले आहे.

## युवा नेते किरण गायकवाड यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.९ जानेवारी -**
वाढदिवसानिमीत्त उमरगा तालुका शिवसेनेच्या वतीने उपजिल्हा रूग्णालय, उमरगा येथील रूग्णांना फळे व चादरी पाटप, इंद्रधनु वृध्दाश्रम, उमरगा येथील वृध्दांना फळे व चादरी वाटप व तुळजाभवानी अंध व अपंग मुलांची शाळा येथील विद्यार्थ्यांसाठी क्रिडा साहित्य व अल्पोपहार वाटप करण्यात आले. तसेच उमरगा शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांना बसण्यासाठी सिमेंट बाकडे बसवून देण्यात आले आहेत.

यावेळी विधानसभा संघटक शरद पवार, शहरप्रमुख योगेश तपसाळे, युवा सेना तालुकाप्रमुख विनोद कोराळे, माजी नगरसेवक पंढरीनाथ कोणे, संतोष सगर, साई विभुते, शहाजी येळीकर, राहुल शिंदे, गजानन सुर्यवंशी, संजय माने, उध्दव बिराजदार, काका गायकवाड, माधव पाटील, जमीर मुल्ला, अमर शिंदे, मनोज जाधव, साकीब चौधरी, शुभम सुरवसे, राम सुरवसे, मुर्तुझा मुंगळे, प्रसाद गायकवाड, श्रीहरी जगताप, प्रवीण माशाळकर, रोहित पवार, गोपाळ जाधव, अमीत माने, ओम जगताप, खंडु मुळे, धनराज भोसले आदी जण उपस्थित होते.

# थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ता धारकावर महापालीकेने केली कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ जानेवारी**

नांवामनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या माऊली कॉम्पलेक्स उस्मानगर रोड लगत असलेल्या मधील १६ गाळे धारकाकडून २८ लाख २६ हजार ९९० रूपये मालमता करापोटी येणे असल्याने व संबंधितांनी टाळाटाळ केल्याने सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांच्या पथकाने ९ जानेवारी रोजी संबंधित गाळे जप्त करून कार्यवाही केली. या कार्यवाहीमुळे थकबाकी मालमत्ता धारकात खळबळ उडाली आहे.




प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका कर वसुलीसाठी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशाने व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपाल सिंग संधु, सहाय्यक आयुक्त नरसाळे यांच्या नियंत्रणाखाली कर वसुलीसाठी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयास जप्ती व वसुलीसाठी उद्दिष्ट दिलेले आहे. त्यानुसार आज ९ जानेवारी २५ रोजी क्षत्रिय कार्यालय क्र.६ सिडको याअंतर्गत माऊली कॉम्पलेक्समधील १६ गाळे धारक मालमत्ता धारकांकडे करापोटी रक्कम २८ लाख २६ हजार ९९० एवढी रक्कम येणे बाकी असल्याकारणाने सदरील कराची रक्कम भरण्यासाठी संबंधित मालमत्ता धारकांनी कर भरण्यासाठी असमर्थता दर्शविल्यामुळे संबंधित सदरील कार्यवाही क्षत्रिय अधिकारी डॉ.मिर्झा फरहत उल्ला बेग, कार्यालय अधिक्षक विलास गजभारे यांच्या नियंत्रणाखाली कर निरीक्षक वसंत कल्याणकर, संजय नागापूरकर, वसुली लिपिक मारोती सारंग, मालु एनफळे, रविंद्र पवळे व सतीश महाबळे यांनी केली आहे.

महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ताधारकांनी आपला चालू व थकीत कराचा भरणा करून करुन महापालिकेस सहकार्य करावे व मालमत्ता जप्ती सारख्या अप्रिय घटना टाळाव्यात असे आवाहन अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी केले आहे. तर यापुढेही अशा कार्यवाही सुरुच राहील, असे उपायुक्त स.अजितपालसिंग संधु यांनी सांगितले आहे.

# मच्छीमारीचे कंत्राट भोई समाजालाच मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणार: आ. भीमराव केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०९ जानेवारी**

मागील काळात केलेल्या विकास कामाला प्रभावित होऊन किनवट माहूर मतदारसंघातील प्रत्येक समाज घटकाने मला भरभरून मतदान केले या भागाचा लोकप्रतिनिधी या नात्याने प्रत्येक समाज घटकाच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे असे स्पष्ट करत भोई समाजाच्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा करेन असे आश्वासन आमदार भीमराव केराम यांनी दिले आहे.महायुतीकडून किनवट विधानसभा मतदारसंघातून दुसऱ्यांदा विजयी झाल्याबद्दल दिनांक ९ जानेवारी रोजी भोई समाज संघटनेच्या वतीने भोईगल्ली येथे आमदार भीमराव केराम यांच्या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन केले होते त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. मंचावर माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, अजय चाडावार सतीश बिराजदार, बालाजी धोत्रे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



पुढे बोलताना आ. केराम म्हणाले विकासकामात मी कधीही भेदभाव केला नाही. रस्ते,नाल्या, सभागृह पाणीपुरवठा अशा अत्यावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कोट्यावधी रुपयाचा निधी खेचून आणला. माझ्या विकास कामाला प्रभावित होऊनच किनवट मतदारसंघातील प्रत्येक समाज घटकांनी मला भरभरून मतदान करून विजयी केले. या भागाचा लोकप्रतिनिधी या नात्याने उपेक्षित समाजघटकाच्या विकासासाठी मी कटिबद्ध आहे.

यावेळी भोईसमाज संघटनेच्या वतीने तालुका अध्यक्ष शुभम कोल्हे उपाध्यक्ष सतीश वाघाडे तालुका सचिव गणेश कोल्हे यांनी आमदार भीमराव केराम यांचा शाल श्रीफळ देऊन व भव्यपुष्पहार घालून यथोचित सत्कार केला. या कार्यक्रमास भोई समाज संघटनेचे सहसचिव दत्ता कोल्हे, विजय बावणे,प्राध्यापक अंबादास जुनघरे,गजानन मोहजे, जनार्धन कोल्हे, आनंद बावणे, शंकर बावणे, राजू शिरपुरे, मारोती बावणे,हरी कोल्हे,राजू कोल्हे,सुंदर कोल्हे, प्रभू कोल्हे, ईश्वर बावणे, पवन बावणे,बालाजी कोल्हे, गणेश कोल्हे, शंकर कोल्हे,अक्षय कोल्हे, लक्ष्मण कोल्हे,दिलीप शिरपुरे, विनीत कोल्हे,दत्ता कोल्हे यांच्या नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त





### माध्यमिक आश्रम शाळेत ज्ञान उर्जा प्रकल्प साहित्याचे वाटप

**नायगांव**-तालुक्यातील मरवाळी तांडा येथील माध्यमिक आश्रम शाळेतील विमुक्त जाती भटक्या जमाती विद्यार्थ्या सह ईतर विद्यार्थांना ही ईतर मागास बहुजन कल्याण विभाग व नॅशनल मॅनेजमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मुंबईच्या संयुक्त विद्यमाने ज्ञान उर्जा प्रकल्प साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थांच्या गुणवत्तेत आणि त्यांच्या कौशल्याची वाढ व्हावी.या उद्देशाने ईतर मागास बहुजन कल्याण विभाग नॅशनल मॅनेजमेंट ट्रेनिंग इन्स्टिट्यूट मुंबईच्यावतीने प्राचार्य विजयकुमार देशमुख, साईनाथ निटुर यांच्या उपस्थितीत सेवानिवृत्त माजी. प्राचार्य किशनराव रतन राठोड यांच्या हस्ते शाळेतील विमुक्त जाती भटक्या जमातीसह ईतर सर्व मुला मुलींना ज्ञान उर्जा प्रकल्पाचे साहित्य वाटप करण्यात आले. या ज्ञान उर्जा साहित्य वाटपावेळी शाळेतील शिक्षक वृंद सुर्यकांत जाधव,आनंदराव सुर्यवंशी, नागनाथ येल्लूरे, संभाजी मेहेत्रे, देविदास राठोड, गुणवंत कंदूर्के, सुभाष राठोड, पांडुरंग जाधव,सुरेश पवार,महेंद्र सारवले, सुभाष कदम, दिपक बि-हाडे, सचिन राठोड सह,आदि शाळेतील शिक्षक वृंदा सह शिक्षकेतर कर्मचारी शिवाजी नारे, हाणमंत सिंगवाड, बालाजी राठोड, शरद पवार आदी कर्मचारी यावेळी संख्येने उपस्थित होते.

### माजी शिक्षण सभापती शिवराज होटाळकर यांचा वाढदिवस विविध उपक्रमाने साजरा

**उमरी**-नायगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय नेते तथा माजी शिक्षण व अर्थ सभापती शिवराज पाटील होटाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त उमरी शहरात विविध उपक्रम राबविण्यात आले, यावेळी ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटप करण्यात आली तर, तर शहरातील सावित्रीबाई फुले मतिमंद विद्यालयात, व मूकबधिर विद्यालय व्यंकटेश नगर उमरी येथे



विद्यार्थ्यांना फळे व खाऊचे वाटप करून शिवराज पाटील होटाळकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. अशोक पाटील शिंदे, गोविंद पाटील जिगळेकर, विलास दादा लोहगावे योगेश पाटील मोरे, अरुण पाटील हंबर्डे, अनसाजी पाटील जिगळेकर, शिवाजी मामा हेमके शिवाभाऊ पांचाळ, माधव पाटील हातणीकर श्रीकांत पाटील धनंजकर युवराज चव्हाण योगेश पाटील ढगे,शुभम पाटील करकाळेकर आदीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे आयोजन शिवराज पाटील होटाळकर मित्र मंडळाच्या वतीने गोवर्धन पाटील ढगे व राजेश पाटील मोरे यांनी केले.

### तथागत भगवान बुद्ध मूर्तींची प्रतिष्ठापना

**नवीन नांदेड**-पौष पौर्णिमा निमित्त दिनांक १३ जानेवारी रोजी सम्यक बुद्ध विहार दाताळा येते तथागत भगवा बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना पूज्य भदंत पय्याबोधी थेरो आणि भिकू संघ यांच्या हस्ते समाज बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. यावेळी महाराष्ट्राचे विद्रोही शाहीर कैलास राऊत यांचा प्रबोधनाचा कार्यक्रमाचे ही आयोजन करण्यात आले आहे. दाताळा येथे पौष



पौर्णिमेच्या निमित्ताने तथागत भगवान बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचे दिनांक १३ जानेवारी रोज सोमवारी आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमानुसार दि. १३ जानेवारी रोजी सोमवारी स. १० वा. पंचशील धम्म ध्वजाचे ध्वजारोहण बोधू कसबे यांच्या हस्ते होईल तर निळ्या धम्म ध्वजाचे ध्वजारोहण दाताळा नगरीचे सरपंच प्रदीप शिंदे यांच्या हस्ते करण्याचे आयोजीत करण्यात आले आहे. त्यानंतर लगेचच सकाळी ११ ते १२ वाजता भिकू संघास भोजनदान करण्यात येईल. दुपारच्या सत्रात बारा वाजता तथागत भगवान बुद्ध मूर्तीची मिरवणूक दाताळा नगरीतील मुख्य रस्त्याने काढून मिरवणुकीनंतर लगेच पूज्य भदंत पय्याबोधी थेरो आणि भिकू संघ यांच्या हस्ते मूर्तीची प्रतिष्ठापना होईल. याचवेळी सदरील कार्यक्रमास गावातील सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, चेअरमन यांच्यासह सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती आपणास लाभणार आहे तरी दाताळा परिसरातील समाज बांधवांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन समस्त भीम जयंती मंडळ दाताळा यांनी केले आहे.

# तुरूंगातील कैद्यांना मिळणार उद्योग उभारणीचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ जानेवारी**

कारागृहातून सुटून गेल्यानंतर बंधीवासांना ( तुरूंगातील कैद्यांना ) त्यांच्या स्व:ताच्या स्वबळावर उद्योग स्थापन करुन समाजात स्थान मिळावे, या उद्देशाने जिल्हा उद्योग केंद्रामार्फत नांदेड जिल्हा कारागृहातील ३० बंद्याना उद्योग उभारणीबाबतचे ३० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात यावे, असे निर्देश प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सुरेखा कोसमकर यांनी दिल्या.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुरेखा कोसमकर यांचे अध्यक्षेतेखाली मा. सर्वोच्च न्यायालय, सुकन्या विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर या प्रकरणात दिलेल्या निर्देशानुसार व मॉडल प्रिझन मॅन्युअल सन २०१६ नुसार नांदेड कारागृहामध्ये नुकतीच बैठक संपन्न झाली. यावेळी त्यांनी कारागृहाची पाहणी करुन बंद्याची विचारपूस केली. तसेच कारागृहात बंद्याना जातीनिहाय काम दिले काय याबाबत त्यांची माहिती घेतली. यावेळी बंद्यानी स्वच्छेने हे काम स्विकारल्याचे तसेच शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे मासिक वेतन मिळते याबाबतची माहिती दिली.

या बैठकीस जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, न्यायाधीश-१ चंद्रशेखर मराठे, जिल्हा विधी सेवा प्राधिकारणाच्या सचिव व न्यायाधीश दलजीत कौर जज, अतिरिक्त पोलीस अधिक्षक

**जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ३० दिवसांचे प्रशिक्षण**

सुरज गुरव व संबंधित विभागाचे अधिकारी, अशासकीय सदस्य यांची उपस्थिती होती. या बैठकीस सर्वोच्च न्यायालयानी दिलेल्या निर्देशाप्रमाणे कारागृहात बंद्याना देण्यात येणाऱ्या कामाची, स्वच्छता, साफसफाई, कुंडाकाम, स्वयंपाक काम, धान्यगोडाम इ. कामाची समितीपुढे बंद्याना देण्यात आलेल्या कामाची तपासणी केली. यावेळी कारागृहाचे अधिक्षकांनी कारागृहात येणाऱ्या अडी-अडचणी, समस्या व जिल्हा कारागृहात बंद्यासाठी नव्याने शिक्षण व प्रशिक्षण चालू करण्याबाबत जिल्हा विधी सेवा प्राधिकारणाच्या अध्यक्षा व जिल्हाधिकारी यांच्याकडे विनंती केली.

# शेतकऱ्यांच्या मागण्या तात्काळ पूर्ण करा अन्यथा तीव्र आंदोलन करू : कैलास कावळगावकर

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. ०९ जानेवारी**

मागील अतिवृष्टी अनुदान २०२४ चा निधी मंजूर होऊनही कृषी व महसूल यंत्रणेच्या ढिसाळ कारभारामुळे आजतागायत याद्या पूर्ण झाल्या नाहीत. अनेक गावांच्या याद्या या अर्धवट बनविण्यात आल्या. यामुळे अतिवृष्टीग्रस्त शेतकरी अनुदानापासून वंचित राहतील अशी भीती ग्रामीण भागात निर्माण झाली आहे. त्याचबरोबर अनेक तांत्रिक अडचणींमुळे २०२३ चे अतिवृष्टीचे अनुदानही आजतागायत अनेक शेतकऱ्यांना मिळाले नाही. या पार्श्वभूमीवर शेतकरी नेते तथा काँग्रेस पार्टीचे जिल्हा प्रवक्ते कैलास येसगे कावळगावकर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदार भरत सूर्यवंशी यांना शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले.



अतिवृष्टीच्या अनुदानासोबतच पीएम किसान सन्मान योजनेतील त्रुटी तात्काळ दूर करून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा, खरीप २०२३ चे पिकविम्याचे पैसे शेतकऱ्यांना तात्काळ अदा करण्याचे विमा कंपनीला आदेश द्यावे अश्या मागण्या यावेळी करण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या वरील मागण्या तात्काळ पूर्ण करा; अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडू असा धमकीवजा इशारा यावेळी कैलास येसगे कावळगावकर यांनी प्रशासनाला दिला. वरील मागण्या तात्काळ मार्गी लावू असा शब्द यावेळी तहसीलदार भरत सुर्यवंशी यांनी निवेदनकर्त्यांना दिला.

याप्रसंगी कैलास येसगे यांच्यासह गोविंदराव पाटील, शिवकुमार शेटकर, सुभाष कदम, गंगाधर आऊलवार, मारोती पाशमवार, मारोतराव लख्खेकर, गोपाळ मोरे, अँड. महेश देशमुख, अनिल राठोड, विजय पाटील नरंगलकर, महादयाप्पा मठपती, संतोष मिनके, विनोद थडके, संदीप पाटील, कावळगावचे बसवंत पटणे, योगेश बिरादार, शंकर हेडगुळे, सदाशिव झेंगाडे, शेषराव घंटे, संतोष लंजवाडे, राजू देशमुख व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नायगाव शहरातुन ऊस कामगाराचे अपहरण

## पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०९ जानेवारी**

लातूर जिल्ह्यातील वैशालीनगर निवळी ता. जि. लातूर येथील विलास सहकारी साखर कारखानातील ऊसतोड कामगार व ट्रॅक्टर पुरवठादार वडार समाजातील बालाजी पवार यांचे ऊसतोड ठेकेदारांनी त्यांचे दोन ट्रॅक्टरसह चार दिवसापासून अपहरण केले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन नायगाव पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करीत कारवाई सुरू केली आहे.



नायगाव तालुक्यातील कांडाळा येथील रहिवासी वडार समाजातील बालाजी बाबा पवार यांच्याकडे दोन ट्रॅक्टर असून ते ऊस तोड कामगार म्हणून देखील मजूर पुरवठा करत असतात. त्यांनी मुखेड तालुक्यातील ऊसतोड ठेकेदार मधुकर दिगंबर बरगे यांच्याकडून दोन ट्रॅक्टर व दहा मंजुर (कोयते) ऊस तोडीसाठी कामास लावले होते. मोबदल्यात बरगे यांनी पवार यांना काही रक्कम देऊ केली होती. परंतु सदर कामात अडथळा आल्यामुळे बंद झाले. त्यामुळे ऊसतोड ठेकेदार बरगे व त्यांच्या सहा साथीदारांनी दि. ०५ जानेवारी २०२५ रोजी नायगाव बसस्थानक समोरून अपहरण केले आहे.

याप्रकरणी अपहर्त्याची पत्नी सारजाबाई बालाजी पवार यांनी नायगाव पोलीस ठाणे येथे दिलेल्या तक्रारीवरून बजरंग मधुकर बर्गे, मधुकर दिगंबर बर्गे, गोविंद जयसिंग टेकाळे, अंकुश श्रीराम खनपट्टे, सर्व रा. डोंगरगाव ता. मुखेड व संभाजी आनेराय रा. शेळगाव ता. नायगाव, सुभाष कल्याणकर यांचे विरोधात गु.र नं. ०७/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता १४० (३) ३५१(२), ३५१(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.कॉ. साईनाथ नागोराव सांगवीकर करीत आहेत.

# शासकीय कामाच्या नावाखाली फुलवळ जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकाची दांडी



**तभा वृत्तसेवा**
**फुलवळ,दि. ०९ जानेवारी**

होनाजी शेळगावे सरकारी कामांच्या नावाखाली फुलवळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बालाजी केंद्रे सतत गैरहजर राहत आहे. केंद्रप्रमुख व वरिष्ठांने याकडे बारकाईने लक्ष घालून विद्यार्थ्यांची होत असलेली हेळसांड थांबवणे गरजेचे आहे.

शिक्षण विभागाच्या विविध कामांच्या नावाखाली फुलवळ येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बालाजी केंद्रे शाळेत उपस्थिती न राहता दररोजच फिरतीवर राहत असल्याचे उघड झाले आणि येथील एक शिक्षक रजेवर आहे. मुख्याध्यापक व एक शिक्षकाच्या गैरहजेरीमुळे शाळेमध्ये मर्यादित शिक्षकावर विद्यार्थ्यांना शिकवण्याची वेळ आली आहे. सरकारी कामांच्या नावाखाली विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने, याला जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक ही पहिली ते चौथीपर्यंत आहे.या शाळेमध्ये १५९ विद्यार्थी संख्या असून बरेचसे विद्यार्थी हे गोरगरीब, शेतकरी व शेतमजुरांचे लेकर आहे. शाळेमध्ये एकूण सहा शिक्षकाची पदे आहेत त्यामध्ये एक मुख्याध्यापक आणि पाच सहशिक्षक त्यापैकी मुख्याध्यापक हे शासकीय कामाचे कारण सांगून सतत बाहेरगावी असतात आणि गेल्या दोन दिवसापासून एक शिक्षक रजेवर आहे. त्यामुळे या चार शिक्षकांवर एकूण विद्यार्थ्यांना शिकवण्याची जबाबदारी येऊन पडली आहे. अगोदरच शिक्षकांची कमी असतानाच ही मंडळी सरकारी कामांचे दाखले देऊन विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी उपस्थित राहत नसतील, तर विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम कसा पूर्ण होणार, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.विद्यार्थ्यांना शिकवण्याच्या वेळेत शिक्षक जर बाहेर जात असतील तर त्यांना कोणत्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे अभय आहे का ?असाही प्रश्न पालक वर्गातून चर्चेला जात आहे. शाळेच्या वेळेत शासकीय किंवा इतर कामे करणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षक यांना तातडीने वरिष्ठांनी समज देऊन शाळेत हजर राहण्यास सांगण्यात यावे, अशी मागणी पालक वर्गातून केली जात आहे.

# भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शरद पाटील पवार, बालाजी पांडागळे यांचा जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. ०९ जानेवारी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या उपस्थितीत माजी आ. अमर राजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा तालुका काँग्रेस पक्षाचे शरद पाटील पवार व कंधार तालुका काँग्रेस पक्षाचे बालाजी पांडागळे यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन मुंबई येथील भाजप पक्ष कार्यालयात असंख्य कार्यकर्त्यासह पक्षात जाहिर प्रवेश केला.



लोहा-कंधार तालुक्यात काँग्रेस पक्षाला गळती तर भाजप पक्षाला भरती आल्याचे पक्ष प्रवेशावरुन दिसुन येत आहे.

लोहा-कंधार विधानसभेचे आ.प्रताप चिखलीकर यांनी महायुतीमधील घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडुन निवडणूक लढवून विजय मिळवला आहे. यापुर्वी भाजपमधून नांदेड लोकसभेत विजय मिळवला होता माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण व आ.प्रताप चिखलीकर एकाच पक्षात काम करत असताना विधानसभा निवडणुकी वरुन वेगवेगळ्या पक्षात दाखल झाले . नांदेड जिल्ह्यात पक्षवाढीसाठी रस्सीखेच सुरु झाली आहे. मतदारसंघात भाजप पक्ष वाढीचे काम माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली माजी आ.आमर राजुरकर करत आहेत.जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यासह कार्यकर्त्यानी भाजप पक्षात प्रवेश घेत आहे.

लोहा नगर परिषदेचे माजी उपनगराध्यक्ष शरद पाटील पवार यांची आक्रमक भुमिका आ.प्रताप चिखलीकर यांचे कटर विरोधक मानत आसल्याने यापूर्वी भारतीय काँग्रेस पक्षामधील माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी शरद पाटील पवार यांना पाठबळ देऊन स्थानीक पातळीवरची पक्ष वाढीची जबाबदारी दिली होती. त्यांच्या पाठबळाने लोहा कृर्षी उत्पन्न बाजार समितीवर घटक पक्षांची मोट बांधून सत्ता हास्तगत केली आ.प्रताप चिखलीकर यांना ढक्का मानला जात होता पण माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेस पक्षाला सोडुन भाजपमध्ये दाखल झाले. काही काळानंतर शरद पवार व बालाजी पांडागळे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन मुंबई येथील भाजप पक्ष कार्यालयात असंख्य कार्यकर्त्यासह जाहिर प्रवेश केला. यावेळी कृउबाचे संचालक भास्करराव पाटील ढगे, भास्करराव पाटील जोमेगावकर, उद्धव पाटील ढेपे, कृउबा संचालक मधुकर डाकोरे, नागोराव पाटील, कमलाकर शिंदे, सतीश ढाकणिकर, गोविंद पाटील याच्या सह लोहा-कंधार विधानसभा मतदार संघातील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रवेश केला.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातुरात निमंत्रितांचे कवी संमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** भारतीय बौद्ध महासभा लातूर जिल्हा पश्चिम शाखा, लातूर तालुका व महिला शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्रीमुक्ती दिन व भीमा कोरेगाव शौर्य दिनाचे औचित्य साधून मुलगंध कुटी, बुद्धविहार, सुभेदार रामजीनगर, लातूर येथे कविता क्रांतीच्या हे निमंत्रितांचे कवी संमेलन उत्साहात झाले.

अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध ज्येष्ठ कवी व गझलकार संजय घाडगे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा.डॉ. क्रांती मोरे आणि राजेंद्र माळी यांनी केले.

नरसिंग इंगळे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्रा. युवराज धसवाडीकर, डॉ. लहू वाघमारे, शैलजा कारंडे, प्रा. कल्याण राऊत, रामदास कांबळे, सुनीता मोरे, विलास घारगावकर, दिलीप गायकवाड, हसीन पटेल, प्रा. मीना घुमे, ऋचा पत्की, अभिमन्यू लामतुरे, सय्यद तहसीन, रमेश हणमंते, विमल मुदाळे, सुरेखा भालेराव, छाया ओव्हळ, सुनीता हिरवे, प्रा. विश्वंभर इंगोले इ. कवींनी उपस्थित राहून परिवर्तनवादी मूल्ये, महापुरुषांचे व्यक्तिमत्त्व व कार्य, स्त्रीमुक्ती विचार, भीमा कोरेगाव शौर्यगाथा, जयभीम अभिवादनाचे महत्त्व, महापुरुषांच्या विचारांची प्रासंगिकता अशा विविध क्रांतिकारी व परिवर्तनवादी विषयांवर आपल्या कविता सादर केल्या. क्रांतीच्या कविता लक्षवेधी होत्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. लहू वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाला एम.एम.बलांडे, आयु, अशोक शिंदे, प्रा.डॉ. लहू वाघमारे, हिराचंद गायकवाड, राजाराम साबळे, हणमंत कांबळे, प्रा. गौतम बनसोडे, प्रसेनजित जोगदंड, गोरोबा कांबळे, भीमराव साबळे, बळीराम लोकरे, अभिजित कोकाटे, दिग्गज वाघमारे, दिगंत वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.



## संक्षिप्त वृत्त...

### वेगात वाहन चालविल्याने अपघात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** भरधाव वेगात वाहन चालवून ओव्हरटेक करीत जोराची धडक देऊन गंभीर जखमी केल्याची घटना धायगुडे नगर येथे घडली. याबाबत कारचालकाविरुद्ध शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, कालचालकाने स्वतःच्या व इतरांच्या जीविताला धोका होईल, अशा स्थितीत वाहन चालविले, दुचाकीला ओव्हरटेक करून जोराची धडक दिली. या अपघातात फिर्यादी गंभीर जखमी झाले. फिर्यादीच्या उजव्या हाताला मार लागला असून उजव्या पायाचे हाड मोडले आहे. ही घटना धायगुडे नगर परिसरात घडली. याबाबत अभिषेक दादाराव गिरी (रा. सदाशिवनगर खाडगाव रोड, लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात कारचालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. कार चालकाने भरधाव आणि निष्काळजीपणे कार चालवून अपघात केला. पुढील तपास पोलिस हवालदार पवार करीत आहेत

### कर वसुलीसाठी महापालिकेचे कॅम्प

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** यावर्षीच्या कराची वसुली करण्यासाठी महापालिका चांगलीच कामाला लागली आहे. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे तीन महिने शिल्लक असतानाही आतापर्यंत केवळ ५० कोटींच्या मालमत्ता क्राची वुसली झाली आहे. उर्वरित वसुलीसाठी पालिका आता ॲक्शन मोडवर येताना दिसत आहे. शुक्रवार, दि. १० पर्यंत शास्ती माफी योजना लागू करण्यात आली आहे. त्यासाठी महापालिकेच्यावतीने ठिकठिकाणी वसुली कॅम्पचे आयोजन केले आहे.

नागरिकांनी आपल्याकडील कराचा भरणा जवळच्या कॅम्पच्या ठिकाणी जाऊन करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी केले आहे. कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या सुरूवातीपासूनच मालमत्ता धारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारच्या सवलतींच्या योजना लागू करण्यात आल्या होत्या. या वर्षातील शेवटची संधी म्हणून दि. १० जानेवारीपर्यंत व्याज / शास्तीत ७५ टक्के सवलत देण्यात आली आहे. मालमत्ताधारकांना कर भरणा करणे सुलभ व्हावे, यासाठी महापालिकेमार्फत क्षेत्रीय कार्यालय अ, ब, क, ड, च्या कार्यक्षेत्रात ९ जानेवारी रोजी मालमत्ताकर वसूलीच्या कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. क्षेत्रीय कार्यालय अ चे कार्यालय सरस्वती शाळा पाण्याची टाकी, जुना औसा रोड, एमजीपी पाण्याची टाकी, केशवराज विद्यालय, श्याम नगर, एलआयसी ऑफिस जुना रेणापूर नाका, महानगरपालिका, अग्निशामक कार्यालय एमआयडीसी येथे कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

### बाजार समितीत सोयाबीन, तुरीची उलाढाल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** चक्काजाम आंदोलनामुळे मंगळवारी येथील बाजार समितीमध्ये सौदेच निघाले नाहीत. परिणामी बुधवारी शेतीमालाची आवक वाढल्याचे चित्र होते. खरीप हंगामातील मुख्य पीक असलेल्या सोयाबीन आणि तुरीच्या दरात घट झाली असली तरी या शेतीमालाच्या आवकवरच बाजार समितीची उलाढाल होत आहे. बुधवारी सोयाबीनची २२ हजार तर तुरीची आवक ८ हजार क्विंटल होती.

सध्या शेतशिवारात रब्बी हंगामातील पिके बहरात आहेत. शेतीकामेही अंतिम टप्प्यात असताना शेतकऱ्यांनी साठवलेले सोयाबीन विक्रीसाठी काढल्याचे दिसून येत आहे.

### ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१० जानेवारी -** ज्येष्ठ नागरिक महासंघाचे ३४ वे राज्यस्तरीय अधिवेशन लातूर येथे ११ व १२ जानेवारी असे दोन दिवस आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन शनिवार, ११ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट व स्वागताध्यक्ष म्हणून खासदार डॉ. शिवाजी काळगे हे राहणार आहेत. येथील दिवाणजी व श्याम मंगल कार्यालय, सावेवाडी येथे दोन दिवस हे अधिवेशन होणार आहे. या दोन दिवसांमध्ये जीवन कसे जगावे, ज्येष्ठांचे आरोग्य, ज्येष्ठांच्या कायदेशीर समस्या, महिलांचा कर्करोग आदि विषयी मार्गदर्शन केले जाणार आहे.

## ७ लाखांची रोकड लुटणाऱ्यास अटक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** बँकेमध्ये भरणा करण्यासाठी ७ लाख रुपये दुचाकीवरून घेऊन जात असताना दुचाकीच्या डिक्कीवर ठेवलेली पैशाची बॅग सिनेस्टाईल हिसकावून चोरट्यांनी धूम ठोकली होती. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सात जणांच्या टोळीतील एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून रोख रक्कम व दुचाकी असा ७ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

काही दिवसांपूर्वी एका शोरूममधील कर्मचारी बाभळगाव ते बसवेश्वर चौक जाणाऱ्या रिंग रोडने दुचाकीवरून ७ लाख २१ हजार रुपये बँकेत भरणा करण्यासाठी घेऊन जात होता. त्यावेळी सिकंदरपूर चौकाजवळ दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी दुचाकीच्या डिक्कीवर ठेवलेली पैशाची बॅग हिसकावून पोबारा केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्त्वात पथक तयार करण्यात आले होते. सदर पथकामार्फत गुन्हेगारांची माहिती एकत्र करून त्याचे विश्लेषण करण्यात येत होते. तसेच गोपनीय बातमीदारांकडून माहिती घेण्यात येत होती. दरम्यान, पैशाची बॅग लुटणाऱ्या गुन्ह्यातील एक आरोपी रिंग रोडवरील मळवटी चौक परिसरात थांबला आहे, अशी माहिती मंगळवारी (दि. ७) दुपारी पथकाला मिळाली. पथकाने संशयित अनिकेत विठ्ठल सगरे (वय २४, रा. मळवटी रोड, नाथनगर, लातूर) याला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली. तो आणि त्याच्या सहा साथिदारांनी बाभळगाव ते बसवेश्वर चौकाकडे जाणाऱ्या रिंग रोडवरून एका दुचाकीस्वारास अडवून त्याच्याकडील पैशाची



बॅग हिसकावल्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरलेल्या रकमेपैकी ५ लाख ६० हजार रुपये रोख व गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी असा ७ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी अनिकेतचे साथिदार विष्णू मांगीलाल प्रजापती, शुभम शिंदे (दोघेही रा. इक्बाल चौक, मळवटी रोड, लातूर), पवन लक्ष्मण बोयने (रा. अराफत चौक, मळवटी रोड, लातूर), अमन आदम सूर्यवंशी (रा. आझाद शाळेच्या पाठीमागे, मळवटी रोड, लातूर) व अमरदीप रवी काळे (रा. म्हाडा कॉलनी, लातूर) यांचा पोलीस शोध घेत आहेत.

## मी वाहतूकदार टोपी घालून वेधले लक्ष: प्रादेशिक परिवहनसमोर आंदोलन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील कारभाराची चौकशी करण्यात यावी अशी मागणी करीत जिल्ह्यातील सर्व वाहतूकदार संघटनांनी एकत्र येत बुधवारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण आंदोलन केले. मी वाहतूकदार अशा टोप्या घालून आंदोलकांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसह वाहतूकदारांना त्रास दिला जात आहे. त्यामुळे येथील कारभाराची चौकशी करण्यात यावी. तसेच परिवहन कार्यालयात अनावश्यक फिरणाऱ्या नागरिकांचा बंदोबस्त करावा, अशा प्रमुख मागण्यांसाठी बुधवारी हे एकदिवसीय लाक्षणिक उपोषण आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशन, जिल्हा युवा मोटार मालक संघ, लोकनायक मोटार चालक मालक संघ, जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटना, टायगर ऑटोरिक्षा संघटना, आझाद मोटार चालक मालक मेकॅनिक संघ, प्रहार जनशक्ती पक्ष, भाजयुमो, कामगार मोर्चा आदी संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. येत्या २० जानेवारीपर्यंत आंदोलनाची दखल घेत शासनाने कारवाई न केल्यास मुंबई येथील परिवहन आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करणार असल्याचे आंदोलक जुगलकिशोर तोष्णीवाल, संदीप जाधव, उत्तम लोंढे, विश्वास कुलकर्णी, जाकेर सय्यद यांच्यासह इतर आंदोलनकर्त्यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले.

## ज्ञानवृद्धीसाठी वाचन संस्कृतीची गरज

### वाचन संकल्प महाराष्ट्राचा ज्ञान, सुसंस्कृत अन् सर्वगुणासाठी वाचन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** सध्याचे युग हे स्पर्धेचे असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याने वाचन संस्कृतीची जोपासना केली पाहिजे. वाचनाने माणूस ज्ञानसंपन्न, सुसंस्कृत आणि बौद्धिकदृष्ट्या सर्वगुणसंपन्न होतो. अभ्यासक्रमांच्या पुस्तकांबरोबर अवांतरही वाचन केले पाहिजे. सध्याच्या युगात तरुणाईने ग्रंथालयाचा उपयोग करून भावी आयुष्य घडवावे, असे प्रतिपादन दयानंद शिक्षणसंस्थेचे सहायक सचिव अजिंक्य सोनवणे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमांतर्गत बुधवारी आयोजित ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी दयानंद शिक्षणसंस्थेचे संयुक्त सचिव विशाल लाहोटी, प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य भाऊसाहेब सरवदे, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव, ग्रंथपाल प्रा. किरण भिसे, प्रा. मेघा पंडित, डॉ. गजानन बने, डॉ. रामशेट्टी शेटकार यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे म्हणाले, २१वे शतक हे डिजिटल संस्कृतीचे आहे.

सध्याच्या युगात विद्यार्थी हा मोबाइल, फेसबुक, इंटरनेटच्या आभासी युगात जास्त रमला आहे. मोबाइलमुळे वाचन संस्कृती, परिवार संस्कृती व सामाजिक बांधिलकी कमी होत आहे. ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्रंथांची ओळख विद्यार्थ्यांना होईल व वाचनाने विद्यार्थी हा ज्ञान संपन्न होईल, असेही ते म्हणाले. या प्रदर्शनात मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील दुर्मीळ ग्रंथ, नियतकालिके, जर्नल्स, विश्वकोश, भारतीय संविधान, शैक्षणिक, धार्मिक ग्रंथ, अभ्यासपूरक व इतर ग्रंथांचा समावेश आहे. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ७१ हजार २९१ पेक्षा जास्त ग्रंथ आहेत. सूत्रसंचालन प्रा. मेघा पंडित यांनी केले. आभार डॉ. गजानन बने यांनी मानले. याप्रसंगी प्रा. अनिलकुमार माळी, पर्यवेक्षक डॉ. संध्या वाडीकर, जय भोले, प्रा. बळवंत सूर्यवंशी, डॉ. जमन अंगुलवार, डॉ. अण्णाराव चौगुले आदी उपस्थित होते.

## मेडिकलच्या दुकानाचा पत्रा उचकटून केली चोरी

### शेजारचे दुकानही फोडले : ६७ हजार रुपये लंपास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** औसा रोड परिसरातील एका मेडिकल दुकानाचा पत्रा उचकटून दुकानात प्रवेश करून गल्लयात ठेवलेले रोख ५० हजार रुपये तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याची डीव्हीआर अंदाजे किंमत दहा हजार रुपये, शेजारील दुकानाच्या गल्लयातील ७ हजार असे एकूण ६७ हजार रुपयांची चोरी झाल्याची घटना ६ जानेवारी रोजी घडली. याबाबत शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद आहे.

औसा रोड परिसरात असलेल्या विश्व मेडिकल या दुकानाचा पत्रा उचकटून चोरट्याने दुकानात प्रवेश करून गल्लयात ठेवलेले रोख ५० हजार रुपये तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा डीव्हीआर जुन्या वापरातील अंदाजे दहा हजार रुपये, तसेच फिर्यादीच्या शेजारी असलेल्या बजाज फूट मॉलच्या दुकानाचाही पत्रा काढून आत प्रवेश करून गल्लयात ठेवलेले रोख ७००० रुपये असे एकूण ६७ हजार रुपये चोरल्याची घटना घडली. याबाबत दिलीप विश्वनाथ मुदकन्ना (रा. छत्रपती चौक लातूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. फिर्यादीच्या दुकानातील साहित्याची तोडफोड करून दुकानाचे नुकसान केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यानुसार गुन्हा नोंद आहे.

## .....घाबरु नका, पण सतर्क रहा

### लातूर शहर महानगरपालिकेचे नागरिकांना जाहीर आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** ह्युमन मेटापन्यूमो (एचएमपीव्ही) व्हायरसच्या रुग्णांमध्ये चीन देशात वाढ होत आहे. या विषाणूची लागण झालेल्या रुग्णांमध्ये सर्दी, खोकल्याच्या त्रासासोबत फ्लूसारखी लक्षणे आणि गंभीर स्वरूपात श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे दिसून येतात. मुख्यतः प्रतिकारशक्ती कमी असणारे रुग्ण, लहान मुले आणि वृध्दांना याचा धोका अधिक आहे.

चीनमध्ये या व्हायरसच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याने शेजारील देशांनी काळजी घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने लातूर महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे व उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'एचएमपीव्ही' संसर्गाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक उपाययोजना महापालिका स्तरावर राबविण्यात येत आहेत.

'एचएमपीव्ही' संसर्गाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचा आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. घाबरू नका, पण सतर्क रहा, अशा सूचना आरोग्य विभागाने दिल्या आहेत. तसेच सर्दी, खोकल्याच्या रुग्णांचे नियमित सर्वेक्षण करण्याचे निर्देश आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी दिले आहेत. यासोबत स्वच्छतेची नियमावली पाळण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

चीनमध्ये नोंदवलेल्या 'एचएमपीव्ही' प्रकरणांबाबत घाबरण्याची गरज नाही. हा व्हायरस साधारण स्वरूपाचा आहे. यामध्ये सर्दी, खोकला, ताप असू शकतो, फ्लूसारखी लक्षणे असतात. काही रुग्णामध्ये प्रतिकार शक्ती कमी असल्याने हा आजार लवकर होऊ शकतो. आवश्यक त्या खबरदारीच्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. जनतेत भीतीचे वातावरण निर्माण होऊ नये, या पार्श्वभूमीवर महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी आरोग्य यंत्रणेला सर्दी खोकलाचे रुग्ण सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अशा स्वरूपाची लक्षणे आढळल्यास नागरिकांनी महापालिका अंतर्गत कार्यरत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आयुष्मान नागरी आरोग्य केंद्र येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार उपचार घ्यावेत, असे आवाहन डॉ. भारती यांनी केले आहे.

**नागरिकांनी हे करावे**

जेव्हा आपल्याला खोकला किंवा शिंका येत असेल तेव्हा आपले तोंड आणि नाक रुमाल किंवा टिश्यू पेपरने झाका. साबण आणि पाणी किंवा अल्कोहोल आधारित सॅनिटायझरने आपले हात वारंवार धुवा. ताप, खोकला आणि शिंका येत असल्यास सार्वजनिक ठिकाणांपासून दूर रहा. भरपूर पाणी प्या. पौष्टिक खा संक्रमण कमी करण्यासाठी सर्व ठिकाणी पुरेसे व्हेंटिलेशन होईल, याची दक्षता घ्या. दररोज स्वच्छ रुमाल वापरा. मास्कचा वापर करावा. जर ताप, खोकला आणि शिंका येत असेल तर तत्काळ वैद्यकीय सल्ला घेऊन उपचार घ्यावेत.

**नागरिकांनी हे करू नये**

हस्तांदोलन टिश्यू पेपरचा पुनर्वापर करू नये. आजारी लोकांशी जवळचा संपर्क टाळा. डोळे, नाक आणि तोंडाला वारंवार स्पर्श करणे टाळा. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषध (सेल्फ मेडिकेशन) घेणे अशा सूचना पालिकेने दिले आहे.

## शहरात एक लाखाचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कव्हा गावाकडे जाणाऱ्या रोडवर विक्री करण्यात येणारा प्रतिबंधित केलेला एक लाख रुपयांचा गुटखा व सुगंधित पानमसाला जप्त करून एकाविरुध्द गुन्हा नोंद केला आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. महात्मा बसवेश्वर चौक ते कव्हा गावाकडे जाणाऱ्या रोडच्या डाव्या बाजूस संभाजीनगर परिसरात एक इसम शासनाने प्रतिबंधित केलेल्या तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करत आहे, अशी माहिती मंगळवारी पथकाला मिळाली.



पथकाने कव्हा रोडवरील संभाजीनगर परिसरातून अण्णाराव भीमराव बिरादार याला ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली. त्याच्याकडे वेगवेगळ्या कंपनीचा १ लाख ४ हजार ४५० रुपयांचा गुटखा, सुगंधित पानमसाला आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुध्द विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या नेतृत्त्वात पोलीस अंमलदार रियाज सौदागर, मनोज खोसे, साहेबराव हाके, नितीन कठारे, राहुल कांबळे यांनी ही सेवा बजावली.

## महाविद्यालयांमध्ये वाहतूक नियमांचे धडे देण्यासाठी मोहीम राबवावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.९ जानेवारी -** रस्ते अपघातामुळे होणारे मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी वाहतूक नियमांचे पालन आवश्यक आहे. त्यामुळे वाहतुक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे दिले जावेत. त्यांना आपत्कालीन सेवांची आणि त्यासाठी असलेल्या टोल फ्री क्रमांकाची माहिती द्यावी. यासाठी शिक्षण विभाग, वाहतूक पोलीस आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाने संयुक्तपणे मोहीम हाती घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

राज्य रस्ता सुरक्षा अभियानाच्या उद्घाटनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, गणेश क्षीरसागर अलका डाके, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अशिषकुमार अय्यर, शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

अपघाती मृत्यूच्या घटना पाहिल्यानंतर आपण काही काळ गांभीर्याने वाहतूक नियमांचे पालन करतो. वाहने चालविताना काळजी घेतो. मात्र, काही काळानंतर पुन्हा या नियमांकडे आपले दुर्लक्ष होते. हे दुर्लक्ष अपघाताचे कारण ठरू शकते असे यावेळी सागण्यात आले.

**जाहिरनामा**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

**जा.क्र. २०२४/एमएजी/कावि** — **दिनांक २६/१२/२०२४**

**अर्जदार :- श्री/श्रीमती. कदम किशोर गिरीधर**
**विरूध्द**
**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय बोरगाव (बु.)**
**अर्ज :- कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात **श्री/श्रीमती कदम किशोर गिरीधर रा. बोरगाव (बु.) ता. चाकूर, जि. लातूर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा यांची बहीण **कदम मिनाक्षी गिरीधर जन्म दि.३०/०४/१९९५** रोजी झाला राहत्या घरी बोरगाव (बु.) येथे झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय बोरगाव (बु.), ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय बोरगाव (बु.), ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

**दि. २६/१२/२०२४** — **पुढील तारीख ३०/०१/२०२५**

**आदेशावरून**
**स्वाक्षरित /-**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, तहसील कार्यालय, चाकुर**